जुलै २०२५/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## नवी मुंबईत साकारणार आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे देशातील पहिले संकुल!



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

महाराष्ट्र शासन




देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

# शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी

- हवामान विभागाचा २०२५-२६ साठी सरासरी किंवा त्याहून अधिक पावसाचा अंदाज
- खरीप हंगामासाठी पुरेसे आणि दर्जेदार बियाणे उपलब्ध,१९.१४ लाख क्विंटल आवश्यक शासनाकडे २५.०८ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध
- 'साथी' पोर्टलच्या माध्यमातून चांगल्या प्रतीचे बियाणे मिळवा पारदर्शक व्यवहारातून फसवणूक टाळा
- बनावट खते, औषधांवर कारवाई साठी ३९५ भरारी पथके तैनात
- ३४ आधुनिक कृषी मोहिमेतून माती परीक्षण ते डिजिटल शेतीशाळा उपक्रम तुमच्या बांधावर
- महाडीबीटी योजनांचा लाभ मिळणार आता 'प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य' वरती
- कृषी योजनांसाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य
- आधुनिक शेतीचे ज्ञान आता डिजिटल शेतीशाळेच्या माध्यमातून
- ठिबक सिंचन, कृषी यांत्रिकीकरण, फळबाग लागवड (५०,००० हेक्टरचे उद्दिष्ट) आणि स्मार्ट प्रकल्पांतर्गत ६०% अनुदान
- सेंद्रिय व नैसर्गिक शेतीसाठी विविध मिशनची अंमलबजावणी
- पीक कापणी आधारित पीक विमा आणि गोपीनाथ मुंडे सानुग्रह अनुदान योजना
- पोक्रा आणि स्मार्ट प्रकल्पांमुळे गोदामांची संख्या वाढली
- कृषि क्षेत्रासाठी महाॲग्री-एआय (MahaAgri-AI) धोरण





देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

माणिकराव कोकाटे
कृषीमंत्री

आशिष जयस्वाल
कृषी राज्यमंत्री

## कृषी विभाग, महाराष्ट्र शासन

## ६ नवी मुंबई होणार वैश्विक ज्ञाननगरी!

जागतिक दर्जाच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक पायाभूत सुविधा, राज्य शासनाचे सहकार्य आणि प्रोत्साहन, विविध उद्योगक्षेत्रांचा सहभाग, प्रयोगशाळा, प्रेरणा देणारे शिक्षणक्षेत्र यामुळे भारत शिक्षणक्षेत्रात जगात अग्रस्थान मिळवणार आहे. यात मुंबई आणि नवी मुंबई प्रमुख भूमिका बजावणार असून मुंबई आणि नवी मुंबई जागतिक ज्ञाननगरी बनणार आहे.

## ९ शाश्वत गृहनिर्माणाची दिशा!

आजच्या घडीला घरांच्या किमती गोरगरीब आणि मध्यमवर्गीयांच्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत. हाच विचार करून राज्य शासनाने सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचे शिवधनुष्य उचलले आहे. शासनाच्या नव्या गृहनिर्माण धोरणामुळे सर्वसामान्यांचे हे स्वप्न साकार होताना दिसेल.

## १७ टाळ–मृदुंगाची साथ, प्रशासन देई मदतीचा हात...

महाराष्ट्राला पंढरपूरच्या वारीची शेकडो वर्षांची परंपरा लाभली आहे. महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा म्हणून या वारीची जगभरात ओळख आहे. या वर्षी ६ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशी आहे. यावेळी पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक अशा विविध ठिकाणांहून पंढरपूरकडे मार्गक्रमण करणाऱ्या पायी दिंड्यांमध्ये लहान थोर लाखो भाविक सहभागी होतात.

## ३४ सागरी अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण

किनारपट्टीवरील धोरणात्मक स्थानांचा वापर करून राज्याला एक प्रमुख जहाज बांधणी, दुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर केंद्र व समृद्ध हरित, शाश्वत सागरी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी संशोधन आणि विकासाद्वारे आधुनिक पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि उद्योग कौशल्यास प्रोत्साहन देण्यासाठी या धोरणाचा उपयोग होणार आहे.


प्रशासकीय सुधारणांतून विकसित महाराष्ट्राचे ध्येय — ११
डॉ. किरण मोघे

पुणे ॲग्री हॅकॅथॉन शेतीकडून समृद्धीकडे! — १३
सचिन गाढवे

दिलासा, विश्वास आणि परिवर्तनाचीही चाहूल! — १५
गजानन जाधव

अमृतस्नानांची पर्वणी! — २२
गोपाळ साळुंखे

डिजिटल युगातील आघाडीसाठी महाॲग्री — २४
संध्या गरवारे-खंडारे

शाश्वत शेतीसाठी सज्ज! — २७
संध्या गरवारे-खंडारे

घराच्या स्वप्नपूर्तीसाठी राज्य गृहनिर्माण धोरण! — २९
नंदकुमार वाघमारे

समृद्ध महाराष्ट्राची भाग्यरेषा! — ३१
वंदना थोरात - वारेगावकर

सशक्त विद्यार्थी : सक्षम समाज! — ३६
शैलजा पाटील

केंद्राच्या योजनांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर! — ३८
वर्षा फडके-आंधळे

प्लास्टिकमुक्तीच्या दिशेने! — ४१
नंदकुमार वाघमारे

आपत्कालीन परिस्थितीसाठी शासनाचे प्रभावी नियोजन — ४३
एकनाथ पोवार

उद्योगाभिमुख अभ्यासक्रम — ४६
काशीबाई थोरात-धायगुडे

महिलांची वनशक्ती — ४८
राजेश येसनकर

एक जिल्हा : एक नोंदणी! — ५०
ब्रिजकिशोर झंवर

ईव्ही युगाच्या दिशेने वाटचाल! — ५२
निलेश तायडे

‘धरती आबा’ जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान — ५४
शैलजा पाटील

सागरी पर्यटनाला चालना — ५८
संध्या गरवारे-खंडारे

वर्ष ७६ वे | अंक ६ | जुलै २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक ब्रिजेश सिंह
- व्यवस्थापकीय संपादक हेमराज बागुल
- संपादक केशव करंदीकर
- सहसंपादक अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मुखपृष्ठ सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट शैलेश कदम
- मुद्रितशोधन भाग्यश्री पेठकर
- मुद्रण मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा.लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई - ४०००११.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# राज्याच्या मुख्य सचिवपदी राजेश कुमार यांची नियुक्ती

राज्याच्या मुख्य सचिवपदी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांची नियुक्ती झाली आहे. मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात मावळत्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून त्यांनी ४९वे मुख्य सचिव म्हणून पदभार स्वीकारला.

राज्य शासनाच्या सर्व विभागांच्या योजनांना अधिक गती देऊन सर्वसामान्यांना आपल्या कामांसाठी मंत्रालयापर्यंत येण्याची आवश्यकता भासू नये, यासाठी काम करणार असल्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी यावेळी सांगितले.



## मुख्य सचिव राजेश कुमार यांचा अल्पपरिचय व भूषविलेली पदे

मूळचे राजस्थानमधील सवाई माधोपूर येथील असलेले मुख्य सचिव राजेश कुमार (भा.प्र.से.१९८८) यांचा जन्म ३ ऑगस्ट १९६५ रोजी झाला. २५ ऑगस्ट १९८८ रोजी ते भारतीय प्रशासकीय सेवेत रूजू झाले. त्यांनी इतिहास या विषयात पदव्युत्तर पदवी मिळविलेली आहे.

राजेश कुमार यांनी २४ जुलै १९८९ रोजी सोलापूर येथे सहायक जिल्हाधिकारी पदापासून कारकिर्दीस सुरुवात केली. त्यानंतर सातारा येथे सहायक जिल्हाधिकारी, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती येथे आदिवासी विकास अपर आयुक्त, धाराशीव व जळगाव जिल्हाधिकारी, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री यांचे खासगी सचिव, नाशिक येथे आदिवासी विकास आयुक्त, नवी मुंबई येथे एकात्मिक बालविकास आयुक्त, मंत्रालयात पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव; तसेच महसूल व वन विभागाचे अपर मुख्य सचिव आदी महत्त्वपूर्ण पदांवर त्यांनी काम केले आहे.

# विकसित महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल...

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर (Gross Enrollment Ratio - GER) ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. महाराष्ट्रात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई येथे पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांची कॅम्पसेस 'एज्युसिटी'च्या माध्यमातून उभारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. देशातील उच्च शिक्षण क्षेत्रात हा मैलाचा दगड ठरेल.

'मुंबई रायझिंग : क्रिएटिंग ॲन इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी' या नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात राज्य शासनाने पाच जागतिक विद्यापीठांना (एलओआय) आशयपत्रे प्रदान केली.

भारतीय विद्यार्थ्यांना आता परदेशातील विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी जाण्याची गरज राहणार नाही. भारतीय विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाचे शिक्षण, संशोधन संधी आणि अनुभव परदेशी न जाता देशातच उपलब्ध होतील. हे शिक्षण केवळ परदेशी अभ्यासक्रमांची प्रतिकृती न राहता, भारतातील स्थानिक गरजांशी सुसंगत व रोजगारक्षम असेल.

सिडकोमार्फत उभारल्या जाणाऱ्या या आंतरराष्ट्रीय 'एज्युसिटी'मुळे संपूर्ण भारतातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची संधी मिळणार असून, याद्वारे आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे भारतातील पहिले शैक्षणिक हब नवी मुंबईत उभारण्यात येत आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात ही विद्यापीठे उभी राहणार आहेत. याच परिसरात येत्या काही वर्षात मेडिसिटी, स्पोर्टस सिटी आणि इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे. या विद्यापीठांमुळे नवी मुंबई आता 'जागतिक ज्ञाननगरी' होईल.

*विद्यापीठे ही केवळ शिक्षणसंस्था आणि अभ्यासक्रम यांचे पर्यवेक्षकीय व प्रशासकीय नियोजन करणारी संस्था ठरू नये, तर संशोधन, नावीन्यता आणि स्टार्टअप सुरू करणारी केंद्रे व्हावीत, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने सुरू केलेल्या उत्कृष्टता केंद्र आणि कंपनी कायद्यांतर्गत सुरू केलेले 'चक्र' (सेंटर फॉर हेल्थ, अप्लाइड नॉलेज अँड रिसर्च ऑटोनॉमी) च्या भूमीपूजनप्रसंगी केले. हे या निमित्ताने आवर्जून अधोरेखित करावेसे वाटते. जगातल्या विद्यापिठांप्रमाणेच आपली विद्यापीठे स्वयंपूर्ण होत आहेत. परदेशांतील विद्यापीठांप्रमाणे विद्यापीठांनी संशोधनाला चालना द्यावी, वेगवेगळ्या विषयांचे संशोधन केंद्र, उत्कृष्टता केंद्र, इन्क्युबेशन केंद्र, स्टार्ट अप आणि विविध क्षेत्रात मार्गदर्शन करणारी केंद्रे म्हणून विद्यापीठांनी काम करावे, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.*

'एज्युसिटी' हा प्रकल्प नवी मुंबईला जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देईल आणि राज्याचे एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट व भारताचे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे लक्ष्य २०२९ पर्यंत साध्य करण्यासाठी एक महत्त्वाचा घटक व 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वज्ञानाचा शैक्षणिक अविष्कार ठरेल. देशाच्या ज्ञानाधिष्ठित विकासाची दिशा दर्शवणारे आणि 'विकसित भारत २०४७'साठी हे महत्त्वाचे पाऊल ठरेल.

राज्य शासनाने सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचे धोरण निश्चित केले आहे. याबाबत उपमुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी या अंकात भूमिका मांडली आहे. शेतीला समृद्धीकडे नेणाऱ्या 'पुणे ॲग्री हॅकेथॉन'च्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भविष्यातील शेतीच्या दिशा स्पष्ट केल्या आहेत.

तसेच खरीप हंगाम आणि शाश्वत शेतीसाठी महाराष्ट्र सज्ज असल्याची ग्वाही कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. याबरोबरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा गडचिरोली जिल्ह्यातील कवंडे गावातील ऐतिहासिक दौरा, आषाढी वारीसाठी प्रशासनाची सज्जता, केंद्राच्या योजनांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर, अमृतस्नानांची पर्वणी, महाॲग्री : डिजिटल युगात अग्रेसर ठेवणारे धोरण, समृद्ध महाराष्ट्राची भाग्यरेषा, महाराष्ट्र प्लास्टिकमुक्तीच्या दिशेने, आपत्कालीन परिस्थितीसाठी शासनाचे प्रभावी नियोजन, महिलांची वनशक्ती, एक जिल्हा एक नोंदणी, महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण, 'धरती आबा' जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान, सागरी पर्यटनाला चालना व जहाज बांधणी धोरण, प्रशासकीय सुधारणांतून विकसित महाराष्ट्राचे ध्येय, सशक्त विद्यार्थी सशक्त समाज या विषयावरील लेखांचाही समावेश आहे. नेहमीप्रमाणेच 'लोकराज्य'चा हा अंकदेखील वाचकांच्या पसंतीस नक्कीच उतरेल, असा विश्वास आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

**जागतिक दर्जाच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक पायाभूत सुविधा, राज्य शासनाचे सहकार्य आणि प्रोत्साहन, विविध उद्योगक्षेत्रांचा सहभाग, प्रयोगशाळा, प्रेरणा देणारे शिक्षणक्षेत्र यामुळे भारत शिक्षणक्षेत्रात जगात अग्रस्थान मिळवणार आहे. यात मुंबई आणि नवी मुंबई प्रमुख भूमिका बजावणार असून नवी मुंबई जागतिक ज्ञाननगरी बनणार आहे.**

# नवी मुंबई होणार वैश्विक ज्ञाननगरी!

**वर्षा फडके-आंधळे**

परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेणे हे विद्यार्थ्यांचे स्वप्न असते. परदेशात शिक्षणासाठी प्रवास करण्याची, नवीन संस्कृती शिकण्याची, नवीन लोकांना भेटण्याची संधी परदेशी शिक्षणातून मिळते आणि यातून त्या विद्यार्थ्यांचा जागतिक दृष्टिकोन बदलतो.

गेल्या काही वर्षांत भारत आणि महाराष्ट्रातून परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. परदेशी विद्यापीठात शिक्षणासोबतच तिथे राहणे, विमा, अभ्यासाचे साहित्य या सर्वांवरदेखील मोठ्या प्रमाणात खर्च होत असतो. या खर्चामुळे पालकांवर आर्थिक ताण येत असला, तरीदेखील पालक मुलांचे उज्ज्वल भविष्य निश्चित करण्यासाठी हा आर्थिक ताण पेलण्यास तयार असतात.

आता ही परिस्थिती हळूहळू बदलणार आहे. शासनाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार परदेशातील विद्यापीठे भारतात येणार आहेत. यामध्ये महाराष्ट्राने पुढाकार घेतला आहे. नवी मुंबईत पाच परदेशी विद्यापीठे सुरू होत आहेत. विशेष म्हणजे महाराष्ट्रात एकाच वेळी पाच परदेशी विद्यापीठे नवी मुंबईच्या एकाच ठिकाणी येणे ही पहिलीच वेळ आहे. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे भारतातील पहिले शैक्षणिक हब एज्युसिटी नवी मुंबईत आकाराला येत आहे. नवी मुंबईत सिडको साकारत असलेल्या शैक्षणिक हबमध्ये पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठे असणार आहेत. यामुळे भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक आणि मानाचा क्षण निर्माण झाला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP), २०२० अंतर्गत भारतात उच्च शिक्षण क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांना मुंबईत संकुल स्थापन करण्यासाठी LOI (आशयपत्र) प्रदान करण्याची पहिलीच ऐतिहासिक घटना असून यामुळे मुंबईचा



मिळवणार आहे. यात नवी मुंबई प्रमुख भूमिका बजावणार आहे.

## परदेशी विद्यापीठांचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान

- **University of Aberdeen (स्कॉटलंड)** : भारतामध्ये कॅम्पस स्थापन करणारे पहिले स्कॉटिश विद्यापीठ. जागतिक समस्यांवर उपाय शोधणाऱ्या अभ्यासक्रमांवर विशेष भर.
- **University of Western Australia (Go8)** : STEM, व्यवसाय आणि संशोधन क्षेत्रातील अभ्यासक्रम. भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक कार्यबलासाठी सक्षम करणे हे मुख्य उद्दिष्ट.
- **University of York (UK - Russell Group)** : एआय, सायबर सुरक्षा, बिझनेस आणि क्रिएटिव्ह इंडस्ट्रीजसाठी विशेष अभ्यासक्रम. जागतिक उद्योगांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम डिझाईन.
- **Illinois Institute of Technology (USA) :** इंजिनीअरिंग, संगणक विज्ञान आणि बिझनेस क्षेत्रात अग्रगण्य. Elevate प्रोग्रामच्या माध्यमातून संशोधन, इंटर्नशिप आणि रिअल-वर्ल्ड अनुभव.
- **Istituto Europeo di Design (IED - इटली)** : फॅशन, प्रॉडक्ट डिझाईन आणि व्हिज्युअल कम्युनिकेशन क्षेत्रात जागतिक शैक्षणिक नकाशावर ठसा उमटणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आशयपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम पार पडला. यात युनिव्हर्सिटी ऑफ ॲबर्डीन (स्कॉटलंड, यु.के.), युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क (यु.के.), युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (ऑस्ट्रेलिया), इलीनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अमेरिका), इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन (इटली) यांचा समावेश आहे. जागतिक दर्जाच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक पायाभूत सुविधा, राज्य शासनाचे सहकार्य आणि प्रोत्साहन, विविध उद्योगक्षेत्रांचा सहभाग, प्रयोगशाळा, प्रेरणा देणारे शिक्षणक्षेत्र यामुळे भारत शिक्षणक्षेत्रात जगात अग्रस्थान




“ भारत हा प्राचीन काळापासून शिक्षण क्षेत्रात आघाडीवर आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये विकसित भारताची स्वप्ने साकारण्यासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. नवीन शैक्षणिक धोरणामुळे जागतिक पातळीवरच्या विद्यापीठांनादेखील आपल्या संस्था भारतात सुरू करता येणार आहेत. त्याचबरोबर भारतातील शिक्षण संस्थांना परदेशामध्ये आपल्या शाखा उघडता येणे शक्य होणार आहे. भारतात जागतिक दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना कमी खर्चात उपलब्ध होईल. आज भारतातील आयआयटी, आयआयएम, आयएफ, सिम्बॉयसिस यांसारख्या संस्था परदेशामध्ये सुरू झाल्या आहेत.

**- धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय शिक्षण मंत्री** ”

“ नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ एज्युसिटी निर्माण होत असून, यामध्ये पाच परदेशी विद्यापीठे एकत्र येत आहेत. यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात शिकवले जाणारे अभ्यासक्रम भारतातच शिकायला मिळणार आहेत. यासाठी विद्यार्थ्यांना देश न सोडता कमी खर्चात परदेशी विद्यापीठात शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. राज्य शासनाने राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत पाच परदेशी विद्यापीठांसोबत आशयपत्र नुकतेच प्रदान केले आहे. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे भारतातील पहिले शैक्षणिक हब नवी मुंबईत उभारण्यात येत आहे.

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री** ”

“ देशाच्या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत भारतात शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तन होणार आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर (Gross Enrollment Ratio - GER) ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. नवीन शैक्षणिक धोरणात प्रामुख्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण, तंत्रज्ञानाधारित अध्यापन, विद्यार्थ्यांना प्रवेशाची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना मिळणार आहे.

**- चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** ”

कौशल्याधारित, क्रिएटिव्ह शिक्षण देणारी प्रतिष्ठित संस्था.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात पाच विद्यापीठे उभी राहणार आहेत. याच परिसरात येत्या काही वर्षांत मेडिसिटी, स्पोर्टस् सिटी आणि इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे. आगामी कालावधीत दहा विद्यापीठे एकत्र येतील अशी संकल्पना राबविण्यात येणार आहे. सध्या या पाच विद्यापीठांमुळे हा परिसर पूर्ण शिक्षण आणि संशोधनासाठी ओळखला जाईल. मुंबईची सध्या वित्तीय, औद्योगिक आणि मनोरंजन उद्योगाचे शहर म्हणून ओळख आहे. आता शैक्षणिक शहर अशीही ओळख होईल 'विकसित भारत २०४७' मध्ये ही बाब महत्त्वाची भूमिका बजावेल.

## अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये

- जागतिक दर्जाच्या पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश
- परदेशातील अभ्यासक्रम भारतातच उपलब्ध होणार
- भविष्यात आणखी पाच विद्यापीठांचा समावेश होणार




## विद्यार्थ्यांसाठी फायदे

- जागतिक पातळीवरील शिक्षणाचा अनुभव
- विद्यार्थ्यांना विविध देशांतील विद्यार्थ्यांसोबत शिकण्याची संधी उपलब्ध होणार
- कमी खर्चात आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे शिक्षण उपलब्ध होणार

नवी मुंबई येथे अटल सेतू कार्यरत असून आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित होत आहे. पायाभूत सुविधांच्या व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटी यामुळे एज्युकेशनल हब निगडित सर्वांना उपयुक्त ठरेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशातील अनेक विद्यापीठांनी भारतात येण्यासाठी उत्सुकता दाखवली आहे. ज्या भारतीय तरुणांना परदेशी जाऊन शिक्षण घेणं शक्य नाही, त्यांचे स्वप्न आता देशात राहूनच पूर्ण होणार आहे. हा प्रकल्प नवी मुंबई व मुंबईला जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देईल आणि महाराष्ट्र राज्याचे एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट व भारताचे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे आर्थिक लक्ष्य २०२९ पर्यंत साध्य करण्यासाठी एक महत्त्वाचा घटक ठरेल.

भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण, अभ्यासक्रम, संशोधन संधी आणि अनुभव हे परदेशी न जाता देशातच उपलब्ध होणार आहे. हे शिक्षण केवळ परदेशी अभ्यासक्रमांची प्रतिकृती न राहता, भारतातील स्थानिक गरजांशी सुसंगत व रोजगारक्षम असेल. हे अभ्यासक्रम स्थानिक औद्योगिक गरजांनुसार अनुकूल केले जातील. संशोधन, स्टार्टअप्स् आणि उद्योग सहकार्याला चालना मिळेल. विद्यार्थ्यांना एक्सचेंज प्रोग्राम्स, सेमिस्टर ट्रान्सफर, ग्लोबल इंटर्नशिप्स यांसारख्या संधी उपलब्ध होतील. प्राध्यापक व संशोधक यांचाही आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभाग वाढेल.

पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांना नवी मुंबईत शैक्षणिक संकुल स्थापन करण्यासाठी आशयपत्र (LOI) प्रदान करण्यासाठी विद्यापीठ अनुदान योजना (UGC) अधिकृत मान्यता मिळाली आहे. यामुळे नवी मुंबई हे जागतिक दर्जाचे शिक्षण व नवोन्मेषाचे केंद्र बनणार आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना, भारताच्या उच्च शिक्षणात ऐतिहासिक बदल, गुणवत्ताधारित शिक्षण व संशोधनाला प्रोत्साहन, नवी मुंबईचा जागतिक शैक्षणिक नकाशावर ठसा आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP) अंतर्गत परदेशी विद्यापीठांचे भारतात आगमन यामुळे साध्य होणार आहे. परदेशी विद्यापीठे भारतात सुरू होणे म्हणजे 'वसुधैव कुटुंबकम्'चा शैक्षणिक आविष्कार आहे आणि म्हणूनच महाराष्ट्राची ही वाटचाल केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून, ती नव्या भारताच्या ज्ञानाधिष्ठित विकासाची दिशा दर्शवणारी आहे.

येत्या काही वर्षांत नवी मुंबईची ज्ञाननगरी म्हणून जागतिक नकाशावर नवी ओळख होईल, हे नक्की!

(उपसंचालक (वृत्त), मा.व.ज.स. मंत्रालय, मुंबई.)

**आजच्या घडीला घरांच्या किमती गोरगरीब आणि मध्यमवर्गीयांच्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत. हाच विचार करून राज्य शासनाने सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचे शिवधनुष्य उचलले आहे. शासनाच्या नव्या गृहनिर्माण धोरणामुळे सर्वसामान्यांचे हे स्वप्न साकार होताना दिसेल.**

# शाश्वत गृहनिर्माणाची दिशा!

**एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री

सर्वसामान्यांच्या आयुष्यात 'हक्काचे पक्के घर' ही सर्वाधिक मानसिक समाधान आणि स्थैर्य देणारी बाब आहे. नेमकी तीच अनेकांच्या आवाक्याबाहेर आहे. नगरविकास, गृहनिर्माण आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आणि आता उपमुख्यमंत्री म्हणून काम करताना या प्रश्नाची तीव्रता लक्षात आली. सध्या माझ्याकडे गृहनिर्माण खाते असल्याने, सर्वसामान्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला हक्काच्या घरांचा हा प्रश्न मी मार्गी लावण्याचा दृढ संकल्प केला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर झालेले नवे गृहनिर्माण धोरण त्याच संकल्पाचा महत्त्वाचा भाग आहे.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'प्रधानमंत्री आवास योजने'मुळे लाखो कुटुंबांची स्वप्ने साकार झाली आहेत. श्री. मोदी यांनी तिसऱ्यांदा प्रधानमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर कॅबिनेटच्या पहिल्याच बैठकीत PMAY अंतर्गत आणखी तीन कोटी घरे बांधण्याचा निर्णय घेतला. यावरून सर्वसामान्यांची घरे त्यांच्यासाठी किती जिव्हाळ्याची आहेत, हे स्पष्ट होते. राज्य शासनदेखील याच दिशेने मार्गक्रमण करत असल्यामुळे नव्या गृहनिर्माण धोरणाचे ब्रीदवाक्य 'माझे घर - माझा हक्क' असे बोलके आणि स्वयंस्पष्ट आहे.

महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक नागरीकरण असलेले राज्य आहे आणि आपला शहरीकरणाचा वेग इतर कोणत्याही राज्यांपेक्षा जास्त आहे. या वेगाला अनुसरून शहरांचे नियोजित, सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचे नियोजन करणे हे मोठे आव्हान आहे. नव्या गृहनिर्माण धोरणात याचे प्रतिबिंब आपल्याला दिसेल. या धोरणामुळे बांधकाम व्यवसायाला चालना मिळेल. लाखो हातांना काम मिळेल. गृहनिर्माण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येईल. केवळ सर्वसामान्यांच्या घराचे स्वप्न साकार होणार नाही, तर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलर्सची होण्यास मोठे बळही मिळणार आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटांसाठी परवडणारी, शाश्वत आणि सर्वसमावेशक घरे मिळवून देण्यासाठी हे




धोरण निर्णायक आहे. राज्य शासनाने २०३० पर्यंत ३५ लाख घरे उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक त्यात केली जाणार आहे. विशेष म्हणजे सर्वसामान्यांच्या गरजा लक्षात घेऊन यात विशेष उपाययोजना केल्या आहेत. नोकरदार महिला, विद्यार्थी, औद्योगिक कामगार, पत्रकार, दिव्यांग आणि माजी सैनिक यांच्या घरांचा विचारही यात केला आहे. गृहनिर्माण धोरणात ज्येष्ठ नागरिकांचा विचार करणारे महाराष्ट्र हे देशातले एकमेव राज्य आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'वॉक-टू-वर्क' ही संकल्पना मांडली. ज्यात कामाच्या ठिकाणाजवळ घरे असावीत. या संकल्पनेच्या अनुषंगाने या धोरणात रोजगार केंद्रांच्या जवळ, विशेषतः औद्योगिक क्षेत्रांतील घरांच्या विकासावर भर दिला आहे. MIDC क्षेत्रातील सुविधा भूखंडांसाठी आरक्षित २० टक्के जागेपैकी १० ते ३० टक्के जागा केवळ निवासी वापरासाठी राखीव ठेवली जाईल. वाढते शहरीकरण पाहता, साधारणतः १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकाच नव्हे, तर सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांना सर्वसमावेशक गृहनिर्माणाचे आदेश देण्यात आले आहेत.

मुंबईची ४० टक्के लोकसंख्या धारावी, कुर्ला, गोवंडी यांसारख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहते. १९९५ मध्ये तत्कालीन शासनाने मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्याचे स्वप्न पाहिले होते. या शासनाच्या कार्यकाळात मी हे शिवधनुष्य उचलण्याचे ठरवले. धारावी - आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी, तसेच बीडीडी नायगाव, मोतीलाल नगर, म्हाडा वसाहती, हजारो एसआरए प्रकल्प आणि १६ हजारांहून अधिक उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास रखडला होता. या शासनाच्या काळात करण्यात येणाऱ्या ठोस नियोजनामुळे आता या पुनर्विकासाला गती मिळत आहे.

नव्या धोरणात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांसाठी केंद्र सरकारच्या जमिनीचा वापर कसा करता येईल, याचे नियोजन करण्यात येत आहे. एसआरए प्रकल्पांमध्ये पारदर्शकता, रिअल-टाइम मॉनिटरिंग आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी हे धोरण माहिती तंत्रज्ञानावर आधारित असेल. यामुळे लाभार्थ्यांची निश्चिती, प्रकल्पाची सद्यःस्थिती आणि निधी व्यवस्थापन शक्य होईल. झोपडपट्ट्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी क्लस्टर पुनर्विकासाला प्रोत्साहन दिले आहे. प्रगती न झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये नवीन सक्षम विकासकांची निवड निविदा प्रक्रियेद्वारे केली जाईल, जेणेकरून विलंब आणि गैरप्रकार पूर्णपणे थांबतील.



मुंबई ही खऱ्या अर्थाने कष्टकऱ्यांची नगरी आहे. कोळी बांधव, कामगार, श्रमिक हे इथले भूमिपुत्र आहेत. त्यामुळे त्यांना आणि गरिबांना स्वस्त; तसेच हक्काची घरे देणे हा त्यांचा अधिकारच आहे. मुंबईतून बाहेर गेलेल्या मुंबईकरांना पुन्हा मुंबईत आणण्यासाठी गृहनिर्माणाच्या नवनवीन योजना आणल्या जात आहेत. CIDCO, MMRDA, MSRDC, महाप्रित, BMC, MHADA, SRA या सर्व संस्थांना एकत्र करून रखडलेले प्रकल्प मार्गी लावले जात आहेत. मुंबईच्या विकासात मोठे योगदान असलेल्या गिरणी कामगारांनादेखील हक्काच्या घरांच्या चाव्या देणारे आमचे सरकार आहे.

अनधिकृत आणि धोकादायक इमारतींचा पुनर्विकास हे सर्वच प्रमुख शहरांतील मोठे आव्हान आहे. १० वर्षांच्या संघर्षानंतर सर्वसमावेशक क्लस्टर धोरण मंजूर करून घेण्यात मला यश मिळाले. ठाण्यात आशियातील सर्वात मोठ्या क्लस्टर गृहनिर्माण योजनेचा शुभारंभ केला आहे. ही योजना शहरांचा कायापालट करणारी ठरेल हा विश्वास मला आहे. क्लस्टरमुळे व्यापक पुनर्विकासाला चालना मिळत आहे आणि लाखो कुटुंबांच्या डोक्यावरील टांगती तलवार दूर झाली आहे.

नगरविकास विभागात २०२० मध्ये Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) ही क्रांतिकारी नियमावली लागू केली. यामुळे दिलेल्या अतिरिक्त एफएसआयमुळे जुन्या शहरांतील रखडलेल्या पुनर्विकासाला चालना मिळाली. मेट्रो आणि रेल्वे स्टेशनजवळ ट्रान्झिट - ओरिएंटेड डेव्हलपमेंटला प्रोत्साहन मिळाले आहे. परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीला प्राधान्य मिळाले असून बांधकाम परवानग्या आणि मंजुरीप्रक्रिया ऑनलाइन झाल्याने प्रकल्पांमधील विलंब टळत आहे.

मी स्वतः सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून आलो आहे. सातारा जिल्ह्यातील दरे गावातून शिकण्यासाठी ठाण्याला आलो. मुंबई-ठाण्यासारख्या ठिकाणी पोटा-पाण्यासाठी येणाऱ्या कुटुंबांना किती अडचणींचा सामना करावा लागतो, हे मी जवळून अनुभवले आहे. एक-दोन नव्हे, तर अनेक प्रश्नांना सामोरे जाताना ते हतबल होतात आणि स्वतःच्या घराचे स्वप्न पाहण्याची हिंमतही अनेकांना होत नाही. हे नवीन गृहनिर्माण धोरण अशा लोकांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठीच तयार केले आहे.

**शब्दांकन : अजय जाधव**
(मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी)

**मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवस कार्यक्रमांच्या यशस्वितेनंतर १५० दिवसांच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७'चे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रशासकीय सुधारणा, व्यावसायिक सेवा अधिक सुलभ करणे आणि विविध विभागांशी समन्वय महत्त्वाचा ठरणार आहे. नियोजनबद्ध कार्यक्रमाच्या माध्यमातून हे उद्दिष्ट साकार करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रयत्न आहे. तंत्रज्ञान युगातील जगाच्या विकासाचा वेग लक्षात घेता महाराष्ट्राची प्रगती या वेगाशी सुसंगत असावी आणि त्यासाठी आवश्यक प्रशासनाची फळी तयार व्हावी, याच हेतूने त्यांनी या कार्यशाळेला महत्त्व दिल्याचे दिसून येते.**

# प्रशासकीय सुधारणांतून विकसित महाराष्ट्राचे ध्येय

**डॉ. किरण मोघे**

पुणे शहर सध्या प्रशासकीय सुधारणांचे केंद्र बनले आहे. गेल्या काही दिवसांत मुख्यमंत्री, संबंधित खात्याचे मंत्री, राज्यमंत्री आणि सचिवांच्या उपस्थितीत शहरातील ऑर्किड हॉटेल येथे महसूल कार्यशाळा, तर यशवंतराव चव्हाण प्रशासन विकास प्रबोधिनी येथे ग्रामविकास आणि नगरविकास विभागाशी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळांमधून प्रशासकीय सुधारणेविषयी झालेले मंथन लक्षात घेता अशा सुधारणांचे नवे पर्व सुरू झाले आहे, असेच म्हणता येईल.

अभ्यासू मुख्यमंत्री म्हणून ओळख असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यशाळांना दिलेले महत्त्व आणि त्यांचा अधिकाऱ्यांसमवेतचा खुला संवाद, यामुळे या कार्यशाळांचे वेगळेपण ठळकपणे उठून दिसले. प्रशासनातील नवे प्रवाह, तंत्रज्ञानाचा वापर, कार्यपद्धती, विविध जिल्ह्यांतील चांगले उपक्रम, अडचणी यावर अत्यंत सविस्तर आणि साधकबाधक चर्चा इथे करण्यात आली. यशदा येथील प्रशिक्षणासाठी अनुकूल असणारे वातावरण आणि कार्यशाळेतील विविध सत्रातून झालेले मार्गदर्शन, यामुळे गतिमान आणि कल्याणकारी प्रशासनाची पायाभरणी या तिन्ही कार्यशाळांमधून झाली.

तीनही कार्यशाळांचे एकंदरीत स्वरूप सारखेच, चर्चेतील विषय तेवढे वेगळे होते. ई-गव्हर्नन्स, ईज ऑफ डुइंग बिझनेस, ईज ऑफ वर्किंग, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर, शासकीय सेवा अधिक सुलभ करणे, शासकीय योजनांची परिणामकारक अंमलबजावणी, काळानुरूप प्रशासनातील बदल या भोवती कार्यशाळा केंद्रित होती. यशदा येथील तीन दिवसांतील चर्चा एवढ्यापुरते स्वरूप मर्यादित न ठेवता अनुकूल प्रशासकीय बदलांसाठी अभ्यासगटांची नियुक्ती आणि अभ्यासगटांकडून कालमर्यादेत येणाऱ्या अहवालांवर आधारित धोरण निश्चितीपर्यंत हा विस्तार असल्याने प्रशासकीय क्षेत्रात सकारात्मक बदलांची आशा आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यशाळेसाठी दिलेला वेळ लक्षात घेतला तर या आयोजनामागचे गांभीर्य लक्षात येते. प्रत्येक कार्यशाळेला मुख्यमंत्र्यांनी सहा ते आठ तास वेळ दिला आणि विशेष म्हणजे यातील बहुतांशी वेळ हा अधिकाऱ्यांशी वैयक्तिकरीत्या चर्चा करण्यासाठी होता. महसूल कार्यशाळेत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी विविध प्रशासकीय सुधारणांविषयी संवाद साधला. ग्रामविकास कार्यशाळेत ८ ते ९ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे आणि नगरविकास कार्यशाळेत १० महापालिका आयुक्त आणि मुख्याधिकाऱ्यांचे गट तयार करून प्रत्येक गटाला त्यांनी किमान एक ते दीड तास चर्चेसाठी दिला. या चर्चेदरम्यान प्रशासनात येणाऱ्या अडचणी, नव्या सुधारणा, शासनाकडून अपेक्षित सहकार्य, नावीन्यपूर्ण उपक्रम आदींविषयी श्री. फडणवीस यांनी मोकळेपणाने संवाद साधला. अशा स्वरूपाचा संवाद प्रथमच होत असल्याच्या उत्स्फूर्त



प्रतिक्रियाही यावेळी ऐकायला मिळाल्या. हा संवाद प्रशासनाला नवी दिशा देणारा आणि प्रगत महाराष्ट्राची पायाभरणी करणारा ठरू शकेल.

या संवादादरम्यान मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे वेगळेपण पाहायला मिळाले. मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेत चर्चा न करता एक 'टीम लिडर' या भूमिकेत ते अधिक वावरले आणि असे करताना अधिकाऱ्यांकडून त्यांची मते, कल्पना शांतपणे ऐकूनही घेतल्या. संवादातून त्यांची दूरदृष्टी, राज्याच्या विकासाबाबत असणारा व्यापक विचार, महाराष्ट्राला जागतिक नकाशावर मानाचे स्थान मिळवून देण्याची महत्त्वाकांक्षा दिसून आली. अर्थातच त्यामागे असलेला त्यांचा अभ्यास आणि कल्पकता अधिकाऱ्यांना प्रभावित करून गेली.

वरिष्ठ अधिकाऱ्यांपेक्षा भारतीय प्रशासकीय सेवेतील तरुण अधिकाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी त्यांनी दिलेला अधिक वेळ हे दुसरे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. भविष्यातील आधुनिक आणि विकसित महाराष्ट्राचे चित्र साकार करण्यासाठी ही चर्चा उत्तम सुरुवात ठरावी. या संवादादरम्यान संबंधित खात्याचे मंत्री, राज्यमंत्री, सचिव उपस्थित असल्याने धोरणात्मक बदलांच्या दृष्टीनेही सकारात्मक चर्चा झाल्याचे दिसून आले. अधिकाऱ्यांमधील माहिती आणि अनुभवांचे आदानप्रदानही तेवढेच महत्त्वाचे होते. प्रशासनात वेगाने बदल घडवून आणण्यासाठी ही एकत्रित चर्चा उपयुक्त ठरणार आहे.

प्रत्येक कार्यशाळेत अधिकाऱ्यांशी विविध गटांमध्ये झालेल्या चर्चेतील मुद्यांना मूर्तरूप देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी समारोपाच्या भाषणात भविष्यातील वाटचालीची दिशा स्पष्ट करण्यासोबत प्रशासकीय सुधारणांबाबत शिफारशी करण्यासाठी विविध गटांची घोषणा केली. प्रत्येक गटासाठी मार्गदर्शक म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आणि गटाला निश्चित विषय ठरवून देण्यात आला. हे सर्व गट विहित कालावधीत आपला अहवाल शासनास सादर करतील आणि त्या आधारे धोरणात्मक बदल करण्यात येतील.

महसूल विभागासाठी महसूल प्रशासनाच्या अध्यक्षतेखाली गठित विविध समित्यांचा आढावा घेऊन सुसूत्रीकरण करणे, अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या कामकाजासाठी 'की परफॉर्मन्स इंडिकेटर्स' निश्चित करणे, उत्कृष्ट कार्यपद्धतींचे एकत्रिकरण आणि राज्यभर विस्तार, नागरिकांचे जीवनमान सुकर करण्याबाबत उपाययोजना, जिल्हा नियोजन समित्या परिणामकारक करणे, महसूल विभागाच्या संरचनेचा अभ्यास आणि त्यात सुधारणा अशा सहा समित्या गठित करण्यात आल्या.

ग्रामविकास व पंचायतराज विभागासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भूमिका आणि जबाबदाऱ्या निश्चित करणारे मॅन्युअल तयार करणे आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कामकाजासाठी 'की परफॉर्मन्स इंडिकेटर' निश्चित करणे, गटविकास अधिकारी, ग्रामसेवक यांच्यासाठी प्रभावी कार्यपद्धती निश्चित करणे, कार्यक्षमता वाढविण्यासाठी उत्तम संकल्पना आणि उपक्रम, नागरिक सेवांचे मॅपिंग, गुंतवणूक आकर्षित करणे व रोजगार निर्मितीसाठी उपाय सुचवणे अशा सहा समित्या गठित करण्यात आल्या आहेत.




नगरविकास विभागासाठी (शहरी स्थानिक स्वराज्य संस्था) नागरिकांचे सुकर जीवनमान, गुंतवणूक आकर्षित करणे आणि रोजगार, ईज ऑफ वर्किंग, उत्तम संकल्पना आणि तंत्रज्ञानाचा उपयोग, नागरिकस्नेही मूलभूत सुविधा, अधिकाऱ्यांसाठी प्रभावी कार्यपद्धती अशा सहा समित्या गठित करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री कार्यालयाच्या संनियंत्रणात या सर्व समित्यांचे कामकाज वेगाने सुरू आहे. प्रशासन हे नागरिकांच्या कल्याणासाठी आहे, ही भावनाच या सुधारणांचा आधार आहे. एक ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साकार करण्यासाठी आवश्यक गतिशील, पारदर्शक आणि कार्यक्षम प्रशासन या माध्यमातून उभे करण्याचा मुख्यमंत्र्यांचा प्रयत्न आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे, तर एखाद्या अधिकाऱ्याची बदली झाल्यानंतर त्याने सुरू केलेला उपक्रम बंद पडू नये, यासाठी चांगल्या संकल्पना राज्यभरात रुजवण्यासाठीचे हे विचारमंथन आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या कालबाह्य पद्धती बाजूला सारताना तंत्रज्ञानाच्या आधारे कामकाजातील टप्पे कमी करणे, तंत्रज्ञानाद्वारे नागरिकांना सुलभतेने सेवा देणे आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी निश्चित करण्यासाठी या कार्यशाळेतील चर्चा महत्त्वाची ठरणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवस कार्यक्रमाच्या यशस्वितेनंतर १५० दिवसांच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७'चे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रशासकीय सुधारणा, व्यावसायिक सेवा अधिक सुलभ करणे आणि विविध विभागांशी समन्वय महत्त्वाचा ठरणार आहे. नियोजनबद्ध कार्यक्रमाच्या माध्यमातून हे उद्दिष्ट साकार करण्याचा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचा प्रयत्न आहे. तंत्रज्ञान युगातील जगाच्या विकासाचा वेग लक्षात घेता महाराष्ट्राची प्रगती या वेगाशी सुसंगत असावी आणि त्यासाठी आवश्यक प्रशासनाची फळी तयार व्हावी, याच हेतूने त्यांनी या कार्यशाळेला महत्त्व दिल्याचे दिसून येते. कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून प्रतिमा असलेले मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्या सूक्ष्म नियोजनामुळे या कार्यशाळेच्या माध्यमातून विकासाचा रोडमॅप ठरवण्याच्या दिशेने दमदार पाऊल टाकले जात आहे. त्यासोबतच मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतील प्रशासकीय सुधारणांचे एक नवे पर्व सुरू होऊन राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारी 'टीम' उभी राहील हे निश्चित!

(उपसंचालक (माहिती), पुणे विभाग)

**हवामान बदल, पर्यावरणीय समस्या, जमिनीच्या वाटण्यांमुळे घटत असलेले शेतीचे क्षेत्र, रासायनिक खते, कीडनाशकांचा अतिवापर, मुबलक पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी पारंपरिक सिंचन पद्धतीमुळे क्षारपड होत असलेली जमीन, शेतमजुरांचा तुटवडा आदी समस्यांच्या पार्श्वभूमीवर त्यावरील उपाययोजना शोधण्यासाठी पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी नावीन्यपूर्ण अशी 'पुणे ॲग्री हॅकॅथॉन' आयोजित करण्याची संकल्पना समोर आणली. शेतीच्या उन्नतीसाठी कोणत्याही नव्या कल्पनेच्या पाठीशी संपूर्ण ताकद उभी करणारे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी या कल्पनेला आवश्यक पाठबळ उभे केल्याने ती मूर्तस्वरूपात आली.**

# पुणे ॲग्री हॅकॅथॉन शेतीकडून समृद्धीकडे!

**सचिन गाढवे**

आज शेती आणि शेतकऱ्यांसमोर असलेल्या समस्यांवर कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), यांत्रिकीकरण, सूक्ष्म सिंचन आदी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेतल्यास निश्चित मात करता येऊ शकते. त्या दृष्टीने शेतीमधील समस्या शोधणे, त्यांच्यावरील उपाययोजनांची साधने निर्माण करण्यास प्रोत्साहन देणे गरजेचे असते. त्या दृष्टीने पुणे जिल्हा प्रशासनाने देशातील पहिल्या 'ॲग्री हॅकॅथॉन'चे १ ते ३ जून दरम्यान आयोजन करून एक महत्त्वाचे पाऊल उचलले. या ठिकाणी प्रदर्शित झालेल्या शेतीसाठीच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाकडे सर्वांचेच लक्ष वेधले गेले. हे तंत्रज्ञान प्रत्यक्षात शेतीमध्ये राबविण्याचे सूतोवाचही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. भविष्यातील शेतीकडे वाटचाल सुरू झाल्याचे हे द्योतक आहे, असेच म्हणावे लागेल.

हवामान बदल, पर्यावरणीय समस्या, जमिनीच्या वाटण्यांमुळे घटत असलेले शेतीचे क्षेत्र, रासायनिक खते, कीडनाशकांचा अतिवापर, मुबलक पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी पारंपरिक सिंचन पद्धतीमुळे क्षारपड होत असलेली जमीन, शेतमजुरांचा तुटवडा आदी समस्यांच्या पार्श्वभूमीवर त्यावरील उपाययोजना शोधण्यासाठी पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी नावीन्यपूर्ण अशी 'पुणे ॲग्री हॅकॅथॉन' आयोजित करण्याची संकल्पना समोर आणली. शेतीच्या उन्नतीसाठी कोणत्याही नव्या कल्पनेच्या पाठीशी संपूर्ण ताकद उभी करणारे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी या कल्पनेला आवश्यक पाठबळ उभे केल्याने ती मूर्तस्वरूपात आली.




जिल्हाधिकाऱ्यांनी कृषी विभाग, कृषी महाविद्यालय, कृषी विज्ञान केंद्रातील संशोधक, प्रगतिशील शेतकरी यांच्याशी चर्चा करून मार्च महिन्यापासून हॅकॅथॉनचे नियोजन सुरू केले होते. कृषी क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कंपन्या, संशोधक, नवकल्पनांचे स्टार्टअप अर्थात नवोद्योग, नवोपक्रम, कृषी संशोधक, संगणक अभियंते, कृषी व तंत्रज्ञान शाखांचे विद्यार्थी आदींचा सहभाग घेऊन समस्या व त्यांचे पर्यावरणपूरक, आर्थिकदृष्ट्या परवडणारे आणि वैज्ञानिकदृष्ट्या वापरात आणण्यायोग्य समाधान शोधण्यास प्रोत्साहित करण्याचे ठरले होते.

स्पर्धेसाठी कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता, मृदा, सिंचन आणि मृदा आरोग्य व्यवस्थापन, सूक्ष्म सिंचनातून खत व्यवस्थापन व रोग कीड व्यवस्थापन, कृषी यांत्रिकीकरण, पीक काढणी तंत्रज्ञान आणि अवशेष व्यवस्थापन, कृषी अर्थशास्त्र व बाजारपेठ जोडणी आणि इतर कोणतीही नवकल्पना असे विभाग करून त्यातील विजेत्यांना पुरस्कार वितरण करण्याचे ठरले होते. या हॅकॅथॉनमध्ये सहभागासाठी ऑनलाइन नोंदणीचे संकेतस्थळ तयार करण्यात आले होते.

हॅकॅथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आणि प्रत्यक्ष प्रदर्शनात सादरीकरणासाठी १४० नवकल्पनांची निवड केली होती. हॅकॅथॉनच्या शेवटच्या दिवशी त्यातून अंतिम १६ जणांची पहिल्या व दुसऱ्या स्थानासाठी निवड करून यातील बऱ्याच नवकल्पना आधुनिक शेती आणि उत्पादकता वाढविण्यासाठी उपयुक्त

### शेतकऱ्यांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान

शेतीचा वाढता उत्पादन खर्च आणि आवश्यक मनुष्यबळाची अनुपलब्धता पाहता शेतीत उन्नत तंत्रज्ञानाचा वापर करणे महत्त्वाचे आहे. हॅकॅथॉनमध्ये मांडलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. हे उपाय शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्याचे उत्तम उत्पादनात रूपांतर करून ते बाजारापर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. त्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घेऊन कृषी महाविद्यालयांमध्ये इन्क्युबेशन केंद्रे तयार करावीत आणि हे तंत्रज्ञान व्यावसायिक उत्पादनाच्या रूपात विकसित करून शेतकऱ्याला लाभ द्यावा.

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

### नाविन्यपूर्ण उपक्रम

'ॲग्री हॅकॅथॉन'च्या आयोजनाने शेतीमध्ये एआय, रोबोटिक्स तंत्रज्ञान, जीआयएस, आयओटी, ड्रोन तंत्रज्ञान, मशीन लर्निंग आदी अत्याधुनिक तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. हा उपक्रम टप्प्याटप्प्याने राज्यभरात राबविण्यात येईल. कृषी क्षेत्रात एआयच्या वापरासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आलेले तंत्रज्ञान प्रत्यक्ष शेतीवर पोहोचावे, यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

**- अजित पवार, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री (जि. पुणे)**

### सुरक्षित व संरक्षित शेती...

भविष्यात शेती सुरक्षित व संरक्षित कशी करता येईल, या दृष्टीने शासन प्रयत्न करत आहे. उत्तम शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना विविध सुविधा उपलब्ध करून दिल्यास कृषी क्षेत्रात महाराष्ट्र अधिक प्रगतिशील होईल. या कृषी हॅकॅथॉनच्या माध्यमातून शेतीसाठी नवतंत्रज्ञान आत्मसात करून शेतकऱ्यांनी त्याचा फायदा इतरांनाही होण्यासाठी प्रयत्न करावेत.

**- ॲड. माणिकराव कोकाटे, कृषी मंत्री**



ठरणाऱ्या होत्या.

या स्पर्धेसाठी निधीची तरतूद जिल्हा नियोजन समितीमार्फत करण्यात आली होती. स्पर्धेकरिता कृषी विद्यापीठे, भारतीय कृषी अनुसंधान संस्था, संशोधन केंद्रे यांचे तज्ज्ञ मार्गदर्शन घेण्यात आले. बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री आणि मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ऑफ इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर आदी संस्थांनी हॅकॅथॉनमध्ये मोलाचा सहभाग नोंदविला.

जलसिंचन, पीक काढणी, पिकांवर फवारणीचे तंत्रज्ञान, एआय कंन्ट्रोल रोव्हर्स, कीड व्यवस्थापनासाठी मशिन लर्निंग एकीकरण, अन्नभेसळ ओळखण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञान, शेल्फ लाईफ वाढवणारे ड्रायर्स, औषध फवारणीसाठी ड्रोन, परागीभवन प्रक्रियेसाठी ड्रोनचा वापर, बाजरीच्या पिठाची साठवण क्षमता वाढवण्यासाठी हायड्रोथर्मल प्रक्रिया व नियर इन्फ्रारेड स्पेक्ट्रोस्कोपी तंत्रज्ञान, शेतमालाचे प्राण्यांपासून संरक्षण, विविध पिकांची काढणी, कापूस वेचणी यंत्र, काढणीपश्चात प्रक्रियेचे तंत्रज्ञान, शेतमालाच्या बाजारभावाचा नेमका अंदाज वर्तवण्यासाठी एआयचा वापर आदी अनेक उत्कृष्ट तंत्रज्ञान येथे मांडण्यात आले. या ठिकाणी प्रदर्शित झालेल्या एआय, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) आधारित तंत्रज्ञान, अत्याधुनिक कृषी उपकरणे, अवजारे याकडे सर्वांचेच लक्ष वेधले गेले.

तीन दिवसात अनेक शेतकरी आणि कृषी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी हॅकॅथॉनला भेट देऊन नवकल्पनांची माहिती घेतली. या निमित्ताने शेतीसाठी आवश्यक नवे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. येथे प्रदर्शित झालेल्या नवकल्पना, शेतीतील कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग पाहून अशा उपक्रमाच्या माध्यमातून शेतीचे चित्र बदलणे शक्य असल्याचे मत भेट देणाऱ्या विविध मान्यवरांनी व्यक्त केले, त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे 'मी असे केले पाहिजे' ही भेट देणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेली भावना हेच या हॅकॅथॉनचे यश आहे.

**(माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, पुणे.)**

गडचिरोली हे नकाशावरचे एक दुर्गम, नक्षलग्रस्त जिल्ह्याचे ठिकाण. अनेक वर्षे दहशत आणि अनिश्चिततेच्या सावलीत जगणाऱ्या येथील नागरिकांसाठी ६ जून २०२५ हा दिवस इतिहासात कोरला गेला. या दिवशी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिसंवेदनशील नक्षलग्रस्त कवंडे गावात प्रत्यक्ष भेट देत नागरिकांशी संवाद साधला. गडचिरोली-छत्तीसगड सीमेवर नक्षलवाद्यांच्या या बालेकिल्ल्यात आजवर कोणीही मंत्री किंवा अधिकारी पोहोचले नव्हते. तेथे प्रथमच थेट पोहोचून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी एक नवा इतिहास घडवला.

# दिलासा, विश्वास आणि परिवर्तनाचीही चाहूल!

**गजानन जाधव**

कवंडे गावात नुकतेच चार नक्षलवादी पोलीस चकमकीत ठार झाले होते. आजवर दहशतीमुळे जेथे शासकीय कर्मचारी जाण्यासही धजावत नव्हते, अशा ठिकाणी मुख्यमंत्री स्वतः पोहोचतात, नागरिकांशी थेट संवाद साधतात, त्यांना शासकीय योजनांचा लाभ स्वत: वितरण करतात, हे दृश्य नागरिकांमध्ये नक्षल्यांच्या भीतीऐवजी शासनावरील विश्वास निर्माण करणारे ठरते, हीच परिवर्तनाची खरी नांदी आहे.

## कवंडे गावात मुख्यमंत्री शासन जमिनीवर

नक्षलवाद्यांचा प्रभाव असलेल्या कवंडे गावात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी 'धरती आबा' अभियानांतर्गत आयोजित लाभार्थी मेळाव्यात सहभाग घेतला. त्यांनी कोणताही दिखावा न करता अगदी साधपणाने जमिनीवर बसून आदिवासी महिलांशी संवाद साधला, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. आम्ही जनतेचे सेवक आहोत, असे सांगत त्यांनी शासन-जनता संबंधात नवसंवादाचा एक सकारात्मक अध्याय सुरू केला.

## नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या उपस्थितीत गडचिरोली पोलीस मुख्यालयात कोट्यवधींचे बक्षीस असलेल्या १२ कुख्यात नक्षलवाद्यांनी शस्त्रांसह शरणागती पत्करली. शस्त्रांसह आत्मसमर्पण करण्याची ही पहिलीच वेळ होती. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी त्यांचे स्वागत करत भारतीय संविधानाच्या प्रती भेट दिल्या. संविधानावर विश्वास ठेवा, आत्मसमर्पण करा, नाहीतर कठोर कारवाईला सामोरे जा, असा स्पष्ट संदेश त्यांनी इतर





छायाचित्र : विरेंद्र तेलंग



छायाचित्र : विवेक मेटे

नक्षलवाद्यांना देत संविधानाने दाखविलेल्या शांततेच्या मार्गावर येण्याचे आवाहन केले.

## नक्षलमुक्त गडचिरोलीचा निर्धार

केंद्र व राज्य शासनाच्या एकत्रित प्रयत्नातून २०२६ पर्यंत गडचिरोली जिल्हा पूर्णपणे नक्षलमुक्त करण्याचा निर्धार मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला. गेल्या दीड वर्षांत २८ नक्षलवादी ठार, ३१ जणांना अटक आणि ४४ जणांचे आत्मसमर्पण यामुळे नक्षल चळवळीचे कंबरडे मोडले असून नक्षलवादाविरुद्धची ही लढाई आता अंतिम टप्प्यात असल्याचे त्यांनी सांगितले.

## सी–६० जवानांचा सन्मान

नक्षलवादाविरुद्धच्या लढ्यात मोलाची कामगिरी बजावणाऱ्या सी-६० जवानांच्या शौर्याची श्री. फडणवीस यांनी प्रशंसा केली आणि त्यांचा सत्कार केला. त्यांना अत्याधुनिक एके-१०३ शस्त्रे, एएसएमआय पिस्तूल, बुलेटप्रुफ जॅकेट्स व बुलेटप्रुफ वाहने प्रदान करण्यात आली. यातून पोलीस दलाचे बळ वाढवण्याबरोबरच, नक्षलवादाविरोधातील लढ्यात शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे स्पष्ट संकेत देण्यात आले.

कवंडे येथे अवघ्या २४ तासांत उभारलेल्या पोलीस आऊटपोस्टचे उद्घाटन करताना श्री. फडणवीस म्हणाले, ही केवळ पोलीस ठाणी नाहीत, तर शासनाचा जनतेपर्यंत पोहोचण्याचा हा प्रयत्न आहे. गेल्या दोन वर्षांत अशा सहा आऊटपोस्ट उभारण्यात आल्या आहेत. ज्याच्या माध्यमातून या नक्षलग्रस्त क्षेत्रातील नागरिकांना शासनाचे विविध लाभ पोहोचवून त्यांच्या सुरक्षेसह विकासाचा मार्ग खुला झाला आहे.

## आत्मसमर्पित नक्षल्यांच्या रेशीमगाठी

यापूर्वी आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांच्या १३ जोडप्यांच्या सामूहिक विवाह सोहळ्यासही मुख्यमंत्री उपस्थित राहिले. नवदाम्पत्यांना शुभेच्छा देत त्यांनी पुनर्वसन आणि मुख्य प्रवाहात सामील होण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले. हा प्रसंग नक्षलवाद सोडून नवे जीवन स्वीकारण्याचा संदेश देणारा ठरला.

## 'पोलाद शहर' आणि निसर्गाचे संतुलन

जिल्ह्याला रोजगारयुक्त आणि 'भारताचे पोलाद शहर' म्हणून विकसित करताना येथील निसर्गसंपदा, जल, जंगल, जमीन सुरक्षित ठेवूनच नव्या उद्योगांची उभारणी केली जाईल आणि स्थानिकांना प्राधान्याने रोजगाराच्या संधी दिल्या जातील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी दिला.

## विकासाच्या अजेंड्यात अग्रक्रमावर

मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या विकासाच्या अजेंड्यावर गडचिरोली जिल्हा अग्रक्रमांकावर आहे. सर्व मंत्रालयीन विभागांनी या जिल्ह्यावर लक्ष केंद्रित करून येथे प्राधान्याने विकास कामे करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## आत्मविश्वासाच्या बीजारोपणातून भयमुक्तता

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा गडचिरोली दौरा हा नक्षलग्रस्त भागातील नागरिकांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देणारा, पोलीस दलाचे मनोबल वाढवणारा आणि जिल्ह्याला नक्षलमुक्त करून औद्योगिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा शासनाचा दृढ संकल्प दर्शवणारा होता. या दौऱ्यामुळे नक्षल दहशतीच्या सावलीत जगणाऱ्या नागरिकांमध्ये नव्या आत्मविश्वासाचे बीज पेरले गेले, हे नक्की.

(जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली.)

**महाराष्ट्राला पंढरपूरच्या वारीची शेकडो वर्षांची परंपरा लाभली आहे. महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा म्हणून या वारीची जगभरात ओळख आहे. या वर्षी ६ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशी होणार आहे. यावेळी पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक अशा विविध ठिकाणांहून पंढरपूरकडे मार्गक्रमण करणाऱ्या पायी दिंड्यांमध्ये लहान थोर लाखो भाविक सहभागी होतात. या वारीसाठी येणाऱ्या सर्व भाविक, वारकरी यांना प्रशासनाच्या वतीने विविध प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. या सर्व सुविधांमुळे वारकऱ्यांचा थकवा कमी होऊन ते श्रीविठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतात व तेवढ्याच उत्साह व आनंदाने परतीच्या प्रवासाला निघतात. भाविक, वारकरी यांना पंढरीत येऊन प्रशासनाच्या सोयी-सुविधांमुळे मिळणारा आनंद, उत्साह व त्यातून त्यांच्यात संचारला जाणारा भक्तीचा भाव हेच प्रशासनाच्या कामाचे यश असणार आहे.**

# टाळ-मृदुंगाची साथ, प्रशासन देई मदतीचा हात!

**सुनील सोनटक्के**

श्रीक्षेत्र पंढरपूरला वर्षभरात आषाढी, कार्तिकी, चैत्र, माघी अशा चार मुख्य यात्रा भरतात. त्यामध्ये आषाढी यात्रा ही महायात्रा समजली जाते. या यात्रेमध्ये २४ तास दर्शन उपलब्ध असते. या वारीला ७५० वर्षांची परंपरा आहे. आषाढी यात्रा दरवर्षी आषाढ शुद्ध एकादशी या दिवशी भरते. या वर्षी आषाढी यात्रा ६ जुलै २०२५ रोजी भरणार आहे. त्याचा कालावधी हा २६ जून ते १० जुलै २०२५ असा आहे. आषाढी यात्रेनिमित्ताने महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यातून साधारण १५ ते १८ लाख भाविक पंढरपूरमध्ये येत असतात. श्रीक्षेत्र आळंदी व देहु येथून श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज व श्रीसंत तुकाराम महाराज यांच्या पालख्या; तसेच प्रमुख इतर आठ संतांच्या पालख्यांसोबत वारकरीदेखील मोठ्या संख्येने पायी येतात. या आषाढी वारीत आषाढ शुद्ध एकादशी ६ जुलै २०२५ पहाटे २.२० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मानाचे वारकरी यांच्या हस्ते शासकीय महापूजा केली जाणार आहे.



## मानाच्या पालख्या

दशमीच्या दिवशी म्हणजेच ५ जुलै २०२५ रोजी पालखीचे आगमन, ६ जुलै २०२५ देवशयनी आषाढी एकादशी, १० जुलै २०२५ पौर्णिमा गोपाळपूर येथे गोपाळकाला, ११ जुलै २०२५ रोजी महाद्वारकाला होऊन आषाढी वारीची सांगता होते.

**पंढरपूर आषाढी यात्रेसाठी येणाऱ्या प्रमुख मानाच्या पालख्या :** १. श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज (आळंदी, जिल्हा-पुणे), २. श्रीसंत तुकाराम महाराज, (देहू, जिल्हा-पुणे), ३. श्रीसंत मुक्ताबाई, (मुक्ताईनगर, जिल्हा- जळगाव), ४. श्रीसंत सोपान महाराज, (सासवड, जिल्हा- पुणे), ५. श्रीसंत निवृत्तीनाथ महाराज, (त्र्यंबकेश्वर, जिल्हा - नाशिक), ६. श्रीसंत एकनाथ महाराज, (पैठण, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर), ७. श्री संत नामदेव महाराज, (पंढरपूर), ८. श्री विठ्ठल-रुख्माई संस्थान, (कौंडण्यपूर, जिल्हा- अमरावती), ९. श्रीसंत



चांगावटेश्वर देवस्थान, (सासवड, जिल्हा - पुणे), १०. श्रीसंत निळोबाराय महाराज, (पिंपळनेर, जिल्हा - अहिल्यानगर).

### मुख्यमंत्र्यांकडून तयारीचा आढावा

वर्षभरातील चार वाऱ्यांपैकी आषाढी वारी ही सर्वात मोठी वारी असते. २६ जून ते १० जुलै या कालावधीत महाराष्ट्रसह अन्य राज्यातील भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे दाखल होतात. सोलापूर जिल्हा प्रशासन ही वारी यशस्वी होण्यासाठी सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय ठेवून कामकाज करते. तसेच येथे येणाऱ्या भाविक व पालखी दिंड्यांसोबत येणाऱ्या वारकऱ्यांसाठी पालखी मार्ग, पालखी तळ, विसावा ठिकाणे येथे त्यांच्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देत असते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सर्व मानाच्या पालख्या प्रमुख; तसेच विविध विभागांचे प्रमुख, विभागीय आयुक्त, सोलापूर, पुणे व सातारा जिल्ह्याच्या सर्व प्रशासकीय यंत्रणा यांच्यासमवेत आषाढी वारी पूर्वतयारीची बैठक घेऊन मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वतीनेही आषाढी वारी यशस्वी होण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व संबंधित विभागाचे मंत्री; तसेच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आषाढी वारी यशस्वी करण्यासाठी वेळोवेळी प्रशासकीय यंत्रणेसमवेत बैठका घेऊन मार्गदर्शक सूचना देऊन नियंत्रणही ठेवत आहेत.

### अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती

आषाढी वारी कालावधीत पंढरपूर येथे सुमारे १५ लाख भाविक श्रीविठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येण्याची शक्यता गृहित धरून जिल्हा प्रशासन अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करत असते. वारी निर्विघ्न होण्यासाठी अधिकारी-कर्मचारी दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडत असतात. यामध्ये विविध विभागांचे व मंदिर समितीचे असे एकूण १,०६५ अधिकारी, तर २४,४३५ कर्मचारी असे एकूण २५,५०० अधिकारी-कर्मचारी वारी कालावधीत आपली जबाबदारी पार पाडतात.

यामध्ये महसूल विभाग ५७०, पोलीस विभाग ८९५, आरोग्य विभाग ७९८, जिल्हा परिषद ३,७६४, नगरपालिका विभाग ५१२, वीज वितरण कंपनी २०७, परिवहन महामंडळ ११,२००, सार्वजनिक बांधकाम विभाग ८२, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर २००२ अशा पद्धतीने प्रत्येक विभागाच्या वतीने अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच राज्यातील विविध स्वयंसेवी संस्थांच्या वतीने १,८६० स्वयंसेवक आपली सेवा अहोरात्र बजावत असतात.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे एरिया कमांडर म्हणून संपूर्ण वारी कालावधीत सोलापूर जिल्ह्यासाठी अविरतपणे कार्यरत असतात, तर अप्पर जिल्हाधिकारी हे इन्सिडेंट कमांडर; तसेच उपविभागीय अधिकारी, तहसीलदार हे डेप्युटी इन्सिडेंट कमांडर म्हणून वारी कालावधीत संपूर्ण घडामोडींवर लक्ष ठेवून कामकाज करतात.

### पाणीपुरवठा व्यवस्था

पाणीपुरवठा टँकरची एकूण संख्या १०७ आहे, तर पाणी भरण्याच्या ठिकाणांची एकूण संख्या ५१ आहे. संत श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर पाणी भरण्याच्या ठिकाणांची संख्या ३८, संत श्री तुकाराम महाराज पालखी मार्गावर पाणी भरण्याच्या ठिकाणांची संख्या १३ इतकी असून संत निवृत्तीनाथ महाराज पालखी मार्गावर पाणी भरण्याच्या ठिकाणांची संख्या आठ इतकी आहे. पालखी विश्वस्ताकडून करण्यात आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या टँकरच्या वाढीव मागणीनुसार खासगी कंत्राटदार यांच्याकडून पुरवठा

### स्वच्छतेची वारी होण्यासाठी प्राधान्य

आषाढी यात्रेसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासह अन्य संतांच्या पालखी सोहळ्यासोबतही मोठ्या प्रमाणात वारकरी चालत येतात. येणाऱ्या वारकरी, भाविकांना पालखी मार्ग, तळ व विसावा या ठिकाणी सुविधा देण्यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध केला जाणार आहे. तसेच ही आषाढी वारी, स्वच्छतेची वारी होण्यासाठी प्राधान्य दिले जात आहे. यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीपात्र कायम स्वच्छ राहील, यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात येणार आहे. तसेच वारीपूर्वी पंढरपूर शहरात लोकसहभागातून स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. संपूर्ण वारी कालावधीत भाविकांना उत्कृष्ट सोयी-सुविधा देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

**- जयकुमार गोरे, पालकमंत्री, जि. सोलापूर.**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ६ जुलै २०२५ रोजी होणार असून, आषाढी यात्रा सोहळ्याच्या अनुषंगाने यापूर्वी पालखी मार्ग, पालखी तळ व रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पालखी सोहळा प्रमुखांकडून काही मागण्या व सूचना करण्यात आलेल्या होत्या. त्या सूचनांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. तसेच पालखी सोहळ्याच्या विश्वस्तांकडून काही पालखी मार्ग व तळासंबंधी नवीन सूचना व मागण्या प्राप्त झाल्या असून, त्या सर्व मागण्यांची पूर्तता पालखी सोहळा जिल्ह्यात दाखल होण्यापूर्वी करण्यात येणार आहे.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी, जि. सोलापूर**

करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या कालावधीत वापराचे पाणी व पिण्याचे पाणी वारकऱ्यांना कमी पडणार नाही, या अनुषंगाने प्रशासनाने नियोजन केले आहे.

### आरोग्य सेवा

पालखी मार्गावर ५८ उपचार केंद्रे, पालखी मार्गावरील ४० प्राथमिक आरोग्य केंद्रे, तर खाटांची संख्या २४०, पालखी मार्ग ग्रामीण रुग्णालय नातेपुते, माळशिरस व करकंब येथे ९० खाटा, पालखी मार्गावरील उपजिल्हा रुग्णालय अकलूज, पंढरपूर व करमाळा येथे २०० खाटा अशा पद्धतीने आरोग्य विभागाच्या वतीने वारकऱ्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. आरोग्य विभागाने एकूण १,१३५ अधिकारी कर्मचारी नियुक्त केलेले असून १०२ रुग्णवाहिका ४४, तर प्रत्येक मुक्कामी १०८ रुग्णवाहिका १४, तर फिरते वैद्यकीय पथक २२ नियुक्त केले आहेत.

### आषाढी वारीत 'एआय'चा वापर

प्रत्येक वर्षी आषाढी वारीला पंढरपूर येथे लाखो भाविक उपस्थित राहतात. मागील वर्षी सुमारे १२ ते १५ लाख भाविक



श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आले होते. यावर्षीही साधारणतः १५ लाख भाविक येण्याची शक्यता आहे; परंतु येथे येणाऱ्या भाविकांची अधिकृत संख्या काढता येत नव्हती. येथे येणाऱ्या भाविकांची अधिकृत संख्या काढता येईल, त्याची गणना व्हावी यासाठी प्रथमच पोलीस विभागाच्या वतीने आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा (एआय) वापर करण्यात येणार आहे. पंढरपूर शहरात विविध ठिकाणी २५० सीसीटीव्ही कॅमेरे बसवले असून या कॅमेऱ्यांना या तंत्रज्ञानाची जोड दिली जाणार आहे. तसेच सहा ड्रोनचा वापर करण्यात येणार आहे. याद्वारे हेड काऊंटिंग अर्थात व्यक्तीची गणना होणार असून वारीमध्ये किती भाविक आले, याची निश्चित संख्या आपल्याला मिळणार आहे. या तंत्रज्ञानाचा वापर प्रयागराज येथे नुकत्याच झालेल्या कुंभमेळ्यातदेखील करण्यात आलेला होता. या नवीन तंत्रज्ञानाचा वापर मागील दोन महिन्यांपासून पोलीस प्रशासन करत आहे, या तंत्रज्ञानामुळे वारीतील गर्दीवर नियंत्रण ठेवता येणे शक्य आहे. तसेच भाविकांच्या सुरक्षेलाही मोठ्या प्रमाणावर प्राधान्य देण्यासाठीही यंत्रणा सक्षम आहे. शहराच्या कोणत्या भागात किती भाविक आहेत याचीही माहिती यातून प्रशासनाला मिळणार आहे.

### पाच हजार बसगाड्यांचे नियोजन

या वर्षीच्या आषाढी वारीसाठी १५ लाख भाविक येण्याची शक्यता पोलीस विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे एसटी महामंडळाने राज्यभरातून वारकरी पंढरीत येण्यासाठी पाच हजार बसगाड्यांचे नियोजन केलेले आहे. पंढरपूर शहरात वारीसाठी चार बस स्थानके कार्यरत राहणार असून राज्यभरातून पंढरपुरात येणाऱ्या वारकऱ्यांच्या सोयी-सुविधांसाठी चांगल्या सुस्थितीतील बस गाड्या पुरवण्याचे नियोजन आहे. एकाच गावातून किंवा परिसरातून ४० वारकरी येणार असतील, तर त्यांच्यासाठी त्यांच्या गावातूनच बस गाडी उपलब्ध केली जाणार

आहे. म्हणजेच एसटी महामंडळामार्फत थेट गावातूनच वारकऱ्यांना पंढरीला आणण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

## प्रमुख मार्ग व बस स्थानक

- **चंद्रभागा बसस्थानक -** पुणे, मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सांगली, सातारा
- **भिमा बसस्थानक -** सोलापूर, औरंगाबाद, नांदेड, नागपूर, चंद्रपूर, अमरावती, अकोला, यवतमाळ
- **विठ्ठल बसस्थानक -** अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगाव
- **पांडुरंग बसस्थानक -** कोल्हापूर, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, सांगोला

## पालखी मार्गावर जलरोधक मंडप

या वर्षी पावसाने लवकर सुरुवात केली असल्याने राज्यातील शेतकरी वर्ग त्यांची मशागतीचे कामे मार्गी लावून आषाढी वारीला मोठ्या प्रमाणावर येण्याची शक्यता आहे. मागील वारीचे अनुभव लक्षात घेता पाऊस आल्यानंतर वारकऱ्यांच्या निवासाचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे आषाढी वारीत पावसामुळे वारकऱ्यांना त्रास होऊ नये, यासाठी पालखी मार्गावर, पालखी मुक्कामी ठिकाणे, ६५ एकर परिसरात असे नऊ जर्मन हँगर पद्धतीचे २०,००० स्क्वेअर फुटांपेक्षा जास्त क्षमतेचे मंडप उभारले जाणार आहेत, दोन मुक्कामाच्या ठिकाणांच्या दरम्यान बारा मंडप, तर पालखी मार्गावरील मुक्कामालगत २६ ठिकाणी जलावरोधक मंडप टाकले जाणार आहे. ठिकठिकाणी मुरमीकरण मजबुतीकरण सुरू आहे. पालखी मार्ग, पालखी मुक्कामतळ, पालखी विसावा ठिकाणी पावसामुळे पाणी साचून चिखल होऊ नये, यासाठी प्रशासन दक्षता घेत आहे.

## दर्शन रांगेत तारेची जाळी

वारीत वारकऱ्यांना विविध सुविधा देण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे, त्याबरोबरच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीदेखील भाविकांच्या सुरक्षेसाठी प्रयत्न करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून समितीने श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये, यासाठी तारेची जाळी बसवण्याचा निर्णय घेतला असून त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. समितीच्या वतीने दर्शन रांगेत चार ते पाच किलोमीटरपर्यंत तारेची जाळी बसवल्यामुळे घुसखोरी टाळली जाणार आहे. तसेच अनुचित प्रकार घडू नये, म्हणून ठरावीक अंतरावर भाविकांना दर्शन रांगेत प्रवेश देण्यासाठी गेटही ठेवण्यात आलेले आहेत. त्यामुळे दर्शन रांगेत चार पाच तास उभे राहणाऱ्या भाविकांना दर्शन घेण्यात कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. त्याप्रमाणेच आपत्ती जनक परिस्थिती उद्भवल्यास तारेच्या जाळीत प्रवेशासाठी ठेवलेल्या गेटमधून भाविकांना सुखरूप बाहेर काढणे शक्य होणार आहे.



## टोकन दर्शन पद्धतीचा शुभारंभ

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना जलद व सुलभ दर्शन व्हावे, यासाठी मंदिर समितीमार्फत टोकन दर्शन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. दरवर्षी वारकरी भाविकांची वाढती संख्या पाहता, भविष्यात दर्शन रांग आणि भाविकांच्या सोयी-सुविधांच्या व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. टोकन दर्शन प्रणालीच्या बुकिंगची सुविधा मंदिर समितीच्या www.vittalrukminimandir.org या अधिकृत संकेतस्थळावर असून, त्यासाठी सकाळी १० ते रात्री ८ च्या दरम्यान ६ स्लॉट निश्चित करून प्रति स्लॉटमध्ये २०० प्रमाणे एकूण १२०० भाविकांना याचा लाभ मिळणार आहे.

## मंदिर परिसर वाहन प्रतिबंध क्षेत्र

**अति महत्त्वाच्या व्यक्तींसाठी मंदिर समितीने पर्यावरणपूरक वाहनांची व्यवस्था करावी :** आषाढी शुद्ध एकादशीला पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. आषाढी यात्रा सोहळ्यासाठी अंदाजे १० ते १५ लाख भाविक पंढरपूरला येतात. पंढरपूर शहरात येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता, श्रीकृष्ण मंदिर, चौफाळा ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर पश्चिमद्वार, मंदिर परिसर, पुढे महाद्वार चौक परिसर या भागात भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. या भाविकांना पार्किंग केलेल्या वाहनांची अडचण येते. तसेच वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मंदिर परिसर वाहन प्रतिबंध क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ (ब) नुसार हा आदेश १३ जून ते २५ जून या कालावधीत सकाळी ५

वाजेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत, तर २६ जून ते १० जुलै कालावधीत २४ तास लागू राहणार आहे.

### चंद्रभागेत जलप्रवासासाठी नोंदणी

संपूर्ण आषाढी यात्रा कालावधीत आलेल्या वारकरी व भाविकांसाठी चंद्रभागेत स्नान करणे अत्यंत पवित्र मानले जाते. त्यामुळे स्नानासाठी चंद्रभागा नदीत भाविकांची मोठी गर्दी होते. तसेच नदीत नौकाविहारही भाविक मोठ्या प्रमाणात करतात. भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सर्व होडीचालक व मालक यांनी होडीची नोंदणी करणे बंधनकारक आहे. तसेच होडी दुरुस्ती व प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक साहित्य होडीवर ठेवणेही अनिवार्य आहे. वारी कालावधीत चंद्रभागा नदी पात्रात पाण्याचा विसर्ग मोठा असतो. तसेच हा विसर्ग सहा ते आठ हजार क्युसेक असल्यास जलप्रवासी वाहतूक पूर्णपणे बंद ठेवणे आवश्यक असते. सूर्यास्तानंतर जलप्रवास वाहतूक बंद ठेवण्याचेही निर्देश प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेले आहेत.

### भाविकांसाठी शौचालयांची व्यवस्था

सर्व पालखी मार्गावर सोलापूर जिल्हा परिषदेसह पुणे, नाशिक, जळगाव व अहिल्यानगर जिल्हा परिषदेकडून ३३ हजार ६५० तात्पुरत्या स्वरूपाच्या शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच या सर्व शौचालयांची स्वच्छता योग्य पद्धतीने राहावी, याकरिता पुरेशा प्रमाणात साफसफाई कर्मचारी नियुक्त करण्यात येत आहेत. मैला उपसा करण्यासाठी २० सक्शन मशीन, तर शौचालय स्वच्छता करण्यासाठी २० जेटिंग मशीन पुरवण्यात आले आहेत.

### पंढरपूर नगरपरिषद

पंढरपूर नगरपरिषदेने शहराची स्वच्छता करण्यासाठी कायम ३४८, तर एक हजार ठेका सफाई कर्मचारी यांची नियुक्ती केली आहे. वाढ शिपाई व मुकादम यांच्यामार्फत दररोज पाण्याच्या नमुन्याची तपासणी केली जात आहे. नगरपरिषदेने सहा ठिकाणी ४,४१२ कायमस्वरूपी शौचालये, तर या व्यतिरिक्त फ्री फॅब्रिकेटेड १,८०० शौचालये उभारलेली आहेत. नगरपालिकेकडे एकूण ५६ कचरा वाहने उपलब्ध असून यामध्ये ४१ घंटागाडी, आठ टिपर, चार ट्रॅक्टर ट्रॉली, एक ऊपर प्लेसर व दोन कॉम्पॅक्टर यांचा समावेश आहे. या माध्यमातून नगरपरिषद आषाढी वारी कालावधीत पंढरपूर शहरात येणाऱ्या भाविक व नागरिकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

### महिलांसाठी विशेष सुविधा

महिला वारकऱ्यांसाठी स्वतंत्र बाथरूम व शौचालयांची व्यवस्था; तसेच पालखी तळाच्या प्रत्येक ठिकाणी हिरकणी कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. सॅनिटरी पॅडची उपलब्धता, क्लॉक रूम, आरोग्य केंद्रावरती महिला चिकित्सक व महिला आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती. महिलांसाठी हेल्पलाइन; तसेच निर्भया पथकाची नियुक्ती आणि मुक्कामाच्या ठिकाणी विशेष महिला पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करण्याचे नियोजन झाले आहे.



### शासनाकडून प्रत्येक दिंडीला अनुदान

मागील वर्षापासून राज्य शासनाने प्रमुख मानाच्या पालख्या यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या प्रत्येक दिंडीसाठी २० हजार रुपयांचे अनुदान देण्यास सुरुवात केली आहे. यावर्षीही ते अनुदान दिंड्यांना देण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात पालख्या समितीकडे येणाऱ्या दिंड्यांची नोंदणी करण्यात येते. विहित पद्धतीने नोंदणी करण्यात आलेल्या दिंड्यांना थेट त्यांच्या बँक खात्यावर अनुदान उपलब्ध करून दिले जाते. तसेच वारकऱ्यांसाठी समूह विम्याप्रमाणेच वारकऱ्यांच्या वाहनांना टोल नाक्यावर टोल सवलतही लागू आहे. साडेसातशे वर्षांची परंपरा असलेल्या पंढरीच्या या वारीत मानाच्या पालख्यांसह अन्य पालख्यांसमवेत येणाऱ्या लाखो वारकरी भाविकांना उत्कृष्ट सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने नियोजन केले आहे. शेकडो किलोमीटरचे अंतर पायी चालत श्रीविठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनाने प्रसन्न होणाऱ्या वारकरी भाविकांच्या चेहऱ्यावर जो भक्तिभाव निर्माण होतो, त्यासाठी शब्दही अपुरे पडतील. त्याचप्रमाणे पंढरपूर शहरात; तसेच पालखी मार्गावर दर्जेदार सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन त्याच वारकरी भाविकांच्या चेहऱ्यावर समाधान व हास्यभाव निर्माण करण्यासाठी शासन व प्रशासन कटिबद्ध आहे.

***बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल***
***करावा विठ्ठल जीवभाव...***

**(जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर)**

**दक्षिण गंगा अशी ओळख असलेल्या गोदावरी नदीच्या काठावरील तपोभूमी नाशिक आणि देशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये भारतीय संस्कृतीतील श्रद्धेचा सर्वात मोठा सोहळा अर्थात सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. या निमित्त होणाऱ्या अमृतस्नानाच्या तारखा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विविध आखाड्यांचे साधू-महंतांच्या उपस्थितीत नाशिक येथे जाहीर करण्यात आल्या. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राज्य शासनाने प्राधिकरणही स्थापित केले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने कुंभमेळ्याचा शंखनाद झाला आहे.**

# अमृतस्नानांची पर्वणी!

**गोपाळ साळुंखे**

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तयारीचा पहिला टप्पा म्हणून जिल्हा प्रशासनाकडून नियोजनाला सुरुवात करण्यात आली आहे. याचाच एक भाग म्हणून अधिक कालावधी लागणाऱ्या कामांच्या निविदाप्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या सर्व तयारीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १ जून २०२५ रोजी नाशिक जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना आढावा घेऊन कुंभमेळ्याचे ध्वजारोहण व अमृतस्नानाच्या तारखाही जाहीर केल्या.


छायाचित्र : मनोज अहिरे

कुंभमेळा तयारीचा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेतला. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन, विशेष साहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, अन्य लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आणि साधू-महंत उपस्थित होते. साधू-महंतांच्या उपस्थितीत होणाऱ्या या सोहळ्याच्या नियोजनाची सुरुवात करताना मुख्यमंत्री यांनी उपस्थित साधू-महंतांचा त्यांच्या जागेवर जाऊन आदर सन्मान केला. संस्कृती आणि अध्यात्माच्या महासोहळ्याच्या नियोजनाला साजेशी ही सुरुवात होती.

आगामी कुंभमेळा सुरक्षित, निर्मळ आणि पवित्र वातावरणात होण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना सर्व प्रकारच्या सोयी-सुविधांच्या अनुषंगाने निधीची उपलब्धता करून देण्यात येईल. कुंभमेळा भारतीय सनातन संस्कृतीचे प्रतीक असल्याने संपूर्ण जगाचे लक्ष याकडे आहे. त्यामुळे सर्वांच्या सहकार्याने जग स्तिमित होईल, असे भव्य-दिव्य आणि स्मरणीय आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्यातील अमृतस्नानाचे दिवसही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी जाहीर केले.

कुंभमेळ्याचे संचालन आखाडे, साधू-महंत करतात, असे नमूद करतानाच साधू-महंतांच्या सूचना लक्षात घेऊन मागील कुंभमेळ्याप्रमाणेच यावेळीदेखील शासनातर्फे उत्तम सुविधा उभारण्यात येतील, अशीदेखील ग्वाही मुख्यमंत्री महोदयांनी दिली. गोदावरी नदी प्रदुषणमुक्त, निर्मळ आणि प्रवाही राहावी, यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

सिंहस्थ कुंभमेळ्यातील अमृतस्नान आणि इतर महत्त्वाच्या पर्वणींचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर कुंभमेळा प्राधिकरणाची ही घोषणा शासनाने केली. नाशिक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली हे प्राधिकरण कुंभमेळ्याचे नियोजन करणार आहे. विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी प्राधिकरणात असल्याने या महापर्वाच्या नियोजनाला गती मिळणार आहे. स्वतः मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातल्याने नियोजनाला वेग आला आहे. जगभरातील भाविकांना आता प्रतीक्षा असेल, ती अमृतस्नानाच्या दिवसाची. त्यांना पावित्र्य आणि निर्मळतेचा अनुभव मिळावा,



छायाचित्र : मनोज अहिरे

सोहळ्याचा आनंद घेता यावा यासाठी प्रशासनही कामाला लागले आहे. साधू-महंतांनी नियोजन बैठकीत केलेला मंत्रोच्चार ही खऱ्या अर्थाने या महापर्वाची सुरुवात म्हणावी लागेल.

### नाशिक अमृतस्नान तारखा

**सिंहस्थ ध्वजारोहण शुभारंभ -** शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६, दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी (स्थळ - रामकुंड पंचवटी)

**प्रथम अमृतस्नान -** सोमवार २ ऑगस्ट २०२७, आषाढ सोमवती अमावस्या.

**महाकुंभस्नान / द्वितीय अमृतस्नान -** मंगळवार ३१ ऑगस्ट २०२७, श्रावण अमावस्या

**तृतीय अमृतस्नान -** शनिवार ११ सप्टेंबर २०२७, भाद्रपद शुद्ध एकादशी

### त्र्यंबकेश्वर अमृत स्नान तारखा

**सिंहस्थ ध्वजारोहण शुभारंभ -** शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६

**प्रथम अमृतस्नान -** सोमवार २ ऑगस्ट २०२७, दर्श अमावस्या.

**महाकुंभस्नान / द्वितीय अमृतस्नान -** मंगळवार ३१ ऑगस्ट २०२७, श्रावण अमावस्या

**तृतीय अमृतस्नान -** रविवार १२ सप्टेंबर २०२७, भाद्रपद शुद्ध द्वादशी (वामन द्वादशी).

याशिवाय सिंहस्थ पर्वकालातील सर्व एकादशी, पौर्णिमा, अमावस्या, वैधृती-व्यतिपात योग इ. दिवस हे भाविकांसाठी तीर्थस्नान- दर्शन पर्व असतील. नाशिक येथे कुंभमेळा २०२७ मध्ये मुख्य तीन पर्वण्यांव्यतिरिक्त पर्वस्नानाचे एकूण ४४ मुहूर्त असून त्र्यंबकेश्वर येथे पर्वस्नानाचे एकूण ५३ मुहूर्त आहेत.

(माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक)



छायाचित्र : मनोज अहिरे

**सर्वच क्षेत्रात आज इंटरनेटचा प्रभावी वापर केला जात आहे. शेतकऱ्यांनाही तत्काळ शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन अधिक सक्षम करण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे. महाराष्ट्राला विकासाच्या अग्रस्थानी ठेवण्यात कृषी विभागाची मोलाची भूमिका आहे. हेच लक्षात घेऊन राज्याच्या कृषी क्षेत्राला डिजिटल युगात अग्रेसर ठेवणाऱ्या महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय (MahaAgri - AI) धोरण २०२५-२०२९ या धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.**

# डिजिटल युगातील आघाडीसाठी महाॲग्री

**ॲड. माणिकराव कोकाटे,** कृषिमंत्री



कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता (Generative AI), इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoTs), ड्रोन, संगणकीय दृष्टिक्षमता (Computer Vision), रोबोटिक्स आणि पूर्वानुमान विश्लेषण (Predictive Analytics) यांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या मदतीने शाश्वत व विस्तारयोग्य (Scalable) उपाययोजना राबविता येणार आहेत. राज्यातील ॲग्रीस्टॅक, महा-ॲग्रीस्टेक, महावेध, क्रॉपसॅप, गमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी त्रिस्तरीय प्रशासकीय संरचना असेल. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पहिल्या तीन वर्षांसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षेत्र वेगाने बदलणारे आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षांत या धोरणामध्ये आवश्यक ते बदल किंवा सुधारणा करण्यात येतील. त्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती, राज्यस्तरीय तांत्रिक समिती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रीटेक नावीन्यता केंद्र, कृषी विद्यापीठांतर्गत कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व नावीन्यता केंद्र काम करतील.



या धोरणाच्या माध्यमातून राज्यात कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता व नावीन्यतेसाठी एक अग्रगण्य केंद्र निर्माण होईल. या धोरणामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा शेतकरी-केंद्रित वापर, संशोधन, डेटा देवाण-घेवाण वाढेल, स्टार्ट-अप्सना पाठबळ मिळेल आणि यातून महाराष्ट्र डिजिटल कृषी नावीन्यतेमध्ये आघाडीवर राहील, अशी अपेक्षा आहे.

या धोरणाद्वारे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा शेतकरीकेंद्रित वापर करण्यास स्टार्टअप्स, खासगी कंपन्या, तंत्रज्ञान कंपन्या, कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था, कृषी विज्ञान केंद्रे, खासगी संस्था, शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था (FPOs) आदींना चालना मिळेल, असे उपक्रम हाती घेतले जातील. यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रीटेक नावीन्यता केंद्राची संस्थात्मक उभारणी केली जाईल. हे केंद्र या धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी स्वतंत्र, पूर्णवेळ कार्यान्वयन यंत्रणा म्हणून कार्य करेल. ही यंत्रणा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत भागीदारी, नवकल्पनांना प्रोत्साहन, प्रकल्पांची निवड, अंमलबजावणी व अर्थसाहाय्य, समन्वय, क्षमता बांधणी इ. धोरणांतर्गत विविध बाबींवर काम करेल.

आयआयटी, आयआयआयएससीसारख्या संस्थांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता नावीन्यता आणि इन्क्युबेशन केंद्रे स्थापण्यात येतील.

डेटा-आधारित शेती आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरासाठी उपयोगी ठरतील अशा डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारल्या जातील. या सुविधा राज्यव्यापी, सुरक्षित, सुसंगत व संमती-आधारित डेटा



देवाण-घेवाण सुलभ करतील. क्लाऊड आधारित कृषी डेटा एक्सचेंज (A-DeX) आणि सँड बॉक्सिंग सुविधा उपलब्ध केली जाईल. या डिजिटल प्लॅटफॉर्मशी केंद्र व राज्य शासनाचे शेती संबंधित सर्व डेटाबेस जोडण्यात येतील. (उदा. ॲग्रीस्टॅक, महावेध, महा-ॲग्रीटेक, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डीबीटी इ.) या एक्सचेंजद्वारे शेतकरी, त्यांची जमीन, पीक माहिती, स्थानिक हवामान, मृदा आरोग्य, इ. डेटा कृत्रिम बुद्धिमत्ता प्रकल्पांसाठी उपलब्ध करून दिला जाईल.

कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम सुदूर संवेदन (AI - Enabled Remote Sensing) आणि Geo - Spatial Intelligence यांनी युक्त एकात्मिक इंजिन विकसित करण्यात येईल. याद्वारे उपग्रह प्रतिमा, ड्रोन सर्वेक्षण, UAVs आणि IoT आधारित उपकरणांद्वारे संकलित केलेल्या विविध स्रोतांतील स्थानिक माहितीचे विश्लेषण करून निर्णय घेण्यासाठी मदत करेल. ही प्रणाली MahaVedh, FASAL, Bhuvan इ. राष्ट्रीय व राज्य प्लॅटफॉर्मशी -PI द्वारे जोडण्यात येईल. या प्लॅटफॉर्मचा कृषी, जलसंपदा, महसूल व आपत्ती व्यवस्थापन इ. विभागांना विविध प्रयोजनांसाठी उपयोग करता येईल.

### शेतकऱ्याचा मित्र : 'महाविस्तार – AI'

कृषी विस्तार सेवा अधिक प्रभावी व शेतकरीकेंद्रित बनवण्यासाठी VISTAAR उपक्रम राबवण्यात येईल. या उपक्रमाच्या माध्यमातून जनरेटिव्ह AI आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतकऱ्यांना मराठीतून वैयक्तिक सल्ला दिला जाईल. या उपक्रमांतर्गत मराठीत कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित चॅटबॉट्स, व्हॉईस असिस्टंट्स यांची मदत घेतली जाईल. त्याद्वारे पीक उत्पादन, रोग-कीड व्यवस्थापन, हवामान अंदाज, बाजारभाव व शासकीय योजनांची माहिती देण्यात येईल. शेतकऱ्यांसाठी उपयुक्त अशी सिम्युलेशन टूल्स विकसित केली जातील. यासोबतच Agristack आणि Bhashini यांसारख्या राष्ट्रीय प्लॅटफॉर्मशी याची जोडणी करण्यात येईल. क्षेत्रीय विस्तार कर्मचाऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता वापराचे प्रशिक्षण देण्यात येईल.

महाॲग्री धोरणाच्या अनुषंगाने; तसेच महाराष्ट्र शासनाच्या डिजिटल भारत, आत्मनिर्भर महाराष्ट्र या संकल्पनेला अनुसरून कृषी विभाग राज्यातील शेतकरी बंधू-भगिनींसाठी काम करीत आहे. कृत्रिम बुद्धिमतेच्या मदतीने शासन अधिक सक्षम, लोकाभिमुख आणि पारदर्शक करण्याच्या मुख्यमंत्री यांच्या सूचनांना अनुसरून कृषी विभागातर्फे नुकतेच 'महाविस्तार AI' चे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्यास शास्त्रशुद्ध आणि रिअल टाइम कृषिविषयक सल्ला देऊन सक्षम करणे ही महाविस्तार मागील संकल्पना आहे. केंद्र शासनाच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या (MoAFW) राष्ट्रीय विस्तार फ्रेमवर्क अंतर्गत महाविस्तार हे महाराष्ट्राचे कृषी नेटवर्क राज्य शासनाच्या कृषी विभागाने विकसित केले आहे. त्यावर हवामान, माती, मंडई; तसेच शासकीय योजनांची माहिती एकत्रितपणे उपलब्ध आहे. मराठी तसेच इंग्रजी भाषेतील चॅटबॉटमार्फत शेतकऱ्यांना स्थानिक आणि त्यांच्या गरजेनुसार सल्ला अत्यंत सहज मिळू शकतो. क्लिष्ट माहिती आणि शेतीतील व्यवहार्य निर्णय यातील दरी दूर करण्याचे काम 'महाविस्तार' करते.

'महाविस्तार' ॲप डाऊनलोड करण्यासाठी गुगल प्ले स्टोअरवर MahaVISTAAR - AI असे सर्च करावे. ॲप इन्स्टॉल केल्यावर शेतकऱ्यांना खालील विषयांवर माहिती बघता येईल.

- **पीक सल्ला** : पिकाच्या पूर्वमशागती पासून काढणीपर्यंत विविध टप्प्यांसाठी शास्त्रीय सल्ला बघता येईल.
- SOP (प्रमाणित कार्यपद्धती) विविध पिकांच्या मशागतीच्या प्रमाणित कार्यपद्धती बघता येतील.
- **मृदा आरोग्यपत्रिका** : शेतकऱ्यांना मृदा आरोग्यपत्रिकांची माहिती उपलब्ध होईल.
- खत मात्रा गणक पिकाचे क्षेत्र आणि नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश यांच्या उपलब्धतेनुसार खत देण्याची गणना करून माहिती दिली जाते.
- बदलत्या हवामानास अनुकूल शेती पद्धती, हवामान अनुकूल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकरी आव्हानांचा सामना करण्याची माहिती उपलब्ध आहे.
- **कीड आणि रोग** : पीकनिहाय कीड आणि रोग यांची माहिती व उपाययोजना.
- **बाजारभाव** : जिल्हानिहाय आणि पीकनिहाय रिअल टाइम बाजारभावाची

माहिती.

- **गोदाम उपलब्धता :** जिल्हानिहाय गोदामांची उपलब्धता आणि त्यासाठी संपर्क क्रमांक.

### महाविस्तार - AI चॅटबॉट

सद्य:स्थितीत विविध आंतरराष्ट्रीय IT कंपनींतर्फे उपलब्ध केलेले चॅटबॉट वापरले जातात. मात्र महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी येथील स्थानिक विद्यापीठांच्या मार्गदर्शनाचा त्यामध्ये समावेश नव्हता. तसेच हवामान, मृदा, मंडई, शेती उपकरणे, गोदाम आणि शासकीय योजना यांच्या माहितीचा डेटा शेतकऱ्यांना सहज उपलब्ध असल्यास त्यांना योग्य निर्णय घेता येतील. ही गरज लक्षात घेऊन महाविस्तार - AI चॅटबॉट विकसित करण्यात आला आहे. त्यासाठी महाविस्तार - AI app मधून किंवा www.vistaar.maharashtra.gov.in/ या लिंकवर जाऊन शेतकरी चॅट करू शकतात.

मराठी किंवा इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये शेतकऱ्यांना चॅट करता येईल. तसेच शेतकऱ्याचा आवाज ओळखून त्याच्यासोबत संवाद साधण्याची सुविधादेखील लवकरच उपलब्ध होणार आहे. भविष्यात या ओपन नेटवर्कचा वापर अनेक सेवा प्रदात्यांना Open Standards Registry आधारे शेतकऱ्यांना त्यांच्या सेवा सुरक्षितपणे प्रदान करण्यासाठीदेखील होईल. महाविस्तारच्या जडणघडणीमध्ये एकस्टेप फाऊंडेशन या संस्थेचा मोलाचा वाटा राहिला आहे. महाविस्तार हे शाश्वत शेती, डिजिटल सक्षमीकरण आणि समृद्ध गावे या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी शेतीला डिजिटल तंत्रज्ञानाची जोड देऊन अचूक माहिती व सल्ला मिळवण्यासाठी महाविस्तार - AI चा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

महाविस्तार ॲप डाऊनलोड करण्यासाठी वर दिलेला QR code स्कॅन करावा.

अन्नसुरक्षा, पुरवठा साखळीतील पारदर्शकता, अन्न गुणवत्ता हमी आणि शेतमालाला जागतिक बाजारपेठ मिळावी यासाठी AI, ब्लॉकचेन आणि QR कोड तंत्रज्ञानावर आधारित राज्यव्यापी शोधक्षमता व गुणवत्ता प्रमाणिकरण (Traceability व Quality Certification) प्लॅटफॉर्म उभारण्यात येईल. या प्लॅटफॉर्मद्वारे शेतापासून ग्राहकापर्यंतच्या प्रवासात पिकांना दिलेली खते व औषधे, शेती पद्धती, कापणीपश्चात प्रक्रिया व गुणवत्ता प्रमाणपत्र इत्यादी बाबींचे डिजिटल आणि जिओ-टॅग केलेली नोंदवही तयार करेल. सुरुवातीला निवडक व निर्यातक्षम पिकांसाठी हे सुरू करून त्याचा टप्प्याटप्प्याने अन्य पिकांपर्यंत विस्तार केला जाईल. शेतकरी उत्पादक संस्था, निर्यातदार, पॅक हाऊसेस, गुणवत्ता प्रमाणपत्र देणाऱ्या संस्था, लॉजिस्टिक्स व ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म यांना या प्रणालीशी जोडले जाईल. यामध्ये IoT व मोबाइल आधारित शोधक्षमता, कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे प्रमाणित दाव्यांची पडताळणी, QR कोड निर्मिती आणि आंतरराष्ट्रीय मानकांचे पालन (APEDA, Codex, EU Farm-to-Fork) यांचा समावेश असेल. या प्लॅटफॉर्ममुळे शेतकऱ्यांना अधिक चांगले दर मिळतील, निर्यातीत विश्वासार्हता वाढेल आणि स्थानिक व जागतिक बाजारात स्वीकारार्हता वाढेल.

राज्य कृषी विद्यापीठे, तांत्रिक संस्था आणि संशोधन भागीदारांमध्ये AI/ML व कृषी तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाईल. कृषी विभागातील अधिकाऱ्यांसाठी विशेष कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण टूलकिट तयार करण्यात येतील. शेतकरी आणि शेतकरी उत्पादक संस्थांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता वापराबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण, डिजिटल साधने आणि मदत कक्ष उपलब्ध करून दिले जातील. तंत्रज्ञान संस्था व उद्योग क्षेत्रासोबत भागीदारी करून प्रशिक्षणाचा दर्जा व उपयुक्तता वाढवली जाईल. वेळोवेळी शेतकऱ्यांचे अभिप्राय घेऊन प्रशिक्षण व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर स्थानिक गरजेनुरूप व उपयुक्त ठरेल, याची काळजी घेतली जाईल.

दरवर्षी जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन (Global AI in Agriculture Conference and Investor Summit) आयोजित करण्यात येणार आहे. या परिषदेत जागतिक तज्ज्ञ, तंत्रज्ञान कंपन्या, संशोधन संस्था गुंतवणूकदार, शासकीय प्रतिनिधी, आणि शेतकरी उत्पादक संघटनांचा सहभाग असेल. या परिषदेद्वारे धोरण चर्चासत्रे, नवउत्पादनांचे सादरीकरण, प्रात्यक्षिके, आणि गुंतवणूकदारांशी थेट संवाद घडवून आणला जाईल. राज्यातील विविध भागांत ही जागतिक परिषद चक्रीय पद्धतीने घेतली जाईल.

**शब्दांकन : संध्या गरवारे–खंडारे,**
विभागीय संपर्क अधिकारी



**शेती ही महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. खरीप हंगाम हा राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, या हंगामात घेतल्या जाणाऱ्या निर्णयांचा थेट परिणाम अन्नसुरक्षा, शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि ग्रामीण विकासावर होतो. राज्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावून शेतकरी राजा सुखी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. खरीप हंगाम २०२५ साठी मे महिन्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक उपक्रम व योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे काम सुरू आहे.**

# शाश्वत शेतीसाठी सज्ज!

**संध्या गरवारे-खंडारे**

नाशिक, ठाणे, नागपूर, अमरावती, कोल्हापूर आणि पुणे विभागातील प्रयोगशील आणि प्रगतिशील शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला. या परिसंवादात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन आपल्या अडचणी व विशिष्ट पिकांसंबंधी आवश्यक असलेल्या सुधारणांवर चर्चा केली. शेतकऱ्यांच्या या समस्या व सूचनांची दखल घेण्यात आली असून, त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या संवादातून शेतकऱ्यांच्या अडचणी व त्यांच्या नावीन्यपूर्ण सूचना शासनामार्फत स्वीकारून लवकरच त्यावर सकारात्मक धोरणात्मक बदल होऊन राज्यातील कृषी क्षेत्राला नवी दिशा मिळेल.

## नियोजनाची तयारी

भारतीय हवामान विभागाकडून २०२५-२६ यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामुळे खरीप हंगाम सुरळीत पार पडण्याची शक्यता असून, या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## पीक लागवडीचे नियोजन

खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये राज्यात १५६.७२ लाख हेक्टर क्षेत्रावर विविध तृणधान्य, कडधान्य, गळीत धान्य व कापूस या पिकांची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या क्षेत्रावर २०४ लाख मेट्रिक टन उत्पादनाचा लक्ष्यांक निर्धारित करण्यात आला असून, उत्पादन साध्य करण्याच्या दृष्टीने राज्यात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण निविष्ठा पुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यात १९.१४ लाख क्विंटल बियाण्यांची आवश्यकता असून, सद्य:स्थितीत २५.०८ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध आहे. सोयाबीन, भात, तूर, मूग, उडीद यांसारख्या पिकांचे पुरेसे साठे असून बियाण्यांच्या गुणवत्ता नियंत्रणासाठी बियाणे नमुन्यांची तपासणी केली जाणार आहे.




## 'साथी' पोर्टल

केंद्र सरकारने बियाण्यांच्या उत्पादन ते विक्रीपर्यंतच्या संपूर्ण व्यवस्थापनासाठी 'साथी' पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलमध्ये बियाण्यांची गुणवत्ता आणि त्यांची विक्रीप्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी विविध टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. 'साथी' पोर्टलमुळे शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे मिळण्यास मदत होईल आणि बियाणे बाजारातील अनियमितता कमी होण्यास मदत होईल.

## खत पुरवठा आणि गुणवत्ता नियंत्रण

राज्यात खरीप हंगाम २०२५ साठी एकूण ४६.८२ लाख मेट्रिक टन खत आवंटन मंजूर झाले आहे. सद्य:स्थितीत राज्यात ५२.५७ लाख मेट्रिक टन खतसाठा शिल्लक आहे. युरिया व इतर महत्त्वाच्या खतांबरोबर कंपन्या शेतकऱ्यांना गरज नसलेल्या निविष्ठा विक्री करण्यासाठी लिंकिंग करतात. त्यामुळे अनावश्यक व बनावट खते, औषधे लिंकिंग करणाऱ्या कंपन्यांवर कार्यवाहीसाठी कृषी विभागाने ठोस उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे.

खरीप हंगाम २०२५ मध्ये राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी व्यापक तयारी केली असून, बियाणे, खते व कीटकनाशके यांच्या पुरवठ्यावर लक्ष ठेवण्यासाठी राज्यात ३९५ भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरणासाठी राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष व हेल्पलाइन सुरू केली आहे. अनधिकृत एच.टी.बी.टी. कापसाच्या बियाण्यांवर बंदी व कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. शेतकऱ्यांमध्ये योग्य माहिती पोहोचविण्यासाठी विविध माध्यमांतून जनजागृती मोहीम राबवली जात आहे.

## तंत्रज्ञानाचा वापर

खरीप हंगाम २०२५ मध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शेती अधिक उत्पादनक्षम

बनवण्यासाठी ३४ विविध मोहिमांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यामध्ये माती परीक्षण, पीक व्यवस्थापन, बीज प्रक्रिया, बियाणे उगवण क्षमता तपासणी, हुमणी कीड नियंत्रण, क्रॉपसॅप व व्हॉट्सॲपद्वारे मार्गदर्शन, डिजिटल शेतीशाळा, एससी/एसटी शेतकऱ्यांचा सहभाग, फळबाग लागवड, आपत्कालीन पीक नियोजन, कापूस बोंड अळी व गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन, पीक उत्पादनासाठी तंत्रज्ञान प्रसार, हिरवळीचे खत निर्मिती आणि पीक स्पर्धा यांसारख्या अनेक उपक्रमांचा समावेश आहे. या मोहिमांचा उद्देश कमी खर्चात प्रभावी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे आणि अनुदानासोबत तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यावर विशेष भर देणे हा आहे. या मोहिमांच्या संनियंत्रणासाठी खरीप मोहीम ॲप तयार करण्यात आले आहे.

## सुधारित लाभार्थी निवड प्रक्रिया

आतापर्यंत कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने केली जात होती. २०२५-२६ पासून प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (First Come First Serve) या नवीन धोरणानुसार, लाभार्थ्यांची निवड होणार आहे. यामुळे निवडप्रक्रिया अधिक पारदर्शक, जलद आणि कार्यक्षम होईल. विविध योजनांची प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, शेतीशाळा यांची गटाद्वारे अंमलबजावणी करण्यात येणार असून या गटांची निवड आता प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (एफसीएफएस) प्रणालीद्वारे होईल.

## ॲग्रीस्टॅक नोंदणी

कृषी व कृषी संलग्न योजनांचा लाभ घेण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. पीएम किसानमधील लाभार्थ्यांना ॲग्रीस्टॅक नोंदणीशिवाय पुढील हप्ता मिळणार नाही. महाडीबीटी प्रणालीवरील; तसेच सर्व कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठीदेखील ॲग्रीस्टॅक नोंदणी करणे अनिवार्य आहे.

## भांडवली गुंतवणूक

कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढीसाठी ठिबक/तुषार सिंचन, कृषी यांत्रिकीकरण, हरितगृह, शेडनेट, पॅकहाऊस, शेततळे, शेततळे प्लास्टिक अस्तरीकरण, शीतगृह इत्यादी योजना राबविण्यावर भर देण्यात येणार आहे.

## फलोत्पादन

फलोत्पादन विभागामार्फत २०२५-२६ साठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना फळबाग लागवड कार्यक्रमासाठी ५०,००० हेक्टर लक्ष्यांक निश्चित करण्यात आला असून भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत १०४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात येणार आहे.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी सानुग्रह अनुदान

खरीप हंगाम २०२५ पासून पीक कापणी प्रयोग आधारित पीक विमा योजना राबविण्यात येणार आहे. गोपीनाथ मुंडे शेतकरी सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या वारसदारांना निधी प्राप्त होण्यासाठी नियोजन केले आहे.



## स्मार्ट प्रकल्प

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प हा महाराष्ट्र शासनाचा हवामान परिवर्तनाशी जुळवून घेणारा शेती विकास प्रकल्प असून, यास जागतिक बँकेचे सहकार्य लाभले आहे. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात आधुनिक तंत्रज्ञान, लोकसहभाग, सुधारित शेती पद्धती, महिला सक्षमीकरण आणि दुर्गम भागातील शेतकऱ्यांचा समावेश यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत मूल्यसाखळी विकास, विविध पायाभूत सुविधांसाठी ६०% अनुदान देण्यात येते.

## मागील वर्षातील उपलब्धी

कृषी विभागाच्या विविध योजना आणि उपक्रमांमुळे राज्यातील कृषी उत्पादन व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून कृषी क्षेत्राचा विकास साधणे शक्य झाले आहे.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेत (PMFME) वैयक्तिक प्रक्रिया युनिट स्थापनेत देशात प्रथम क्रमांक, SNA - Sparsh प्रणालीत विविध योजनांमध्ये केंद्राकडून चौथा हप्ता प्राप्त, ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी नोंदणीत देशात दुसरा क्रमांक, सोयाबीन घरगुती बियाणे वापराबाबत जनजागृतीतून शेतकऱ्यांची सुमारे ७०० कोटी रुपयांची बचत, डाळिंब, केळी, द्राक्षे, फुलशेती, भाजीपाला निर्यातीत राज्य प्रथम क्रमांकावर, महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत उच्चांकी फळबाग लागवड, सूक्ष्म सिंचन योजनेत मोठे अनुदान वितरण, Fruitnet व Vegnet अंतर्गत शेतकऱ्यांच्या नोंदणीत देशात प्रथम क्रमांक आणि ३७ पिकांना GI मानांकन प्राप्त अशा अनेक महत्त्वपूर्ण उपलब्धी विभागाच्या नावावर आहेत. AIF योजनेत ४,००० कोटींपेक्षा जास्त कर्जावर ३ टक्के व्याजदरात सवलत देण्यात आली.

शाश्वत शेतीसाठी दिशा देणारे हे खरीप हंगाम २०२५चे नियोजन महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.

- आयुक्त कार्यालयामार्फत क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी कामकाज आणि नियोजन सुलभ होण्यासाठी एकत्रित वार्षिक दिनदर्शिका तयार करण्यात आली आहे.
- 'डिजिटल शेतशाळा' संध्याकाळच्या वेळेत घेतली जात आहे.
- पोक्रा आणि स्मार्ट प्रकल्पांमुळे शेतमाल साठवणूक क्षमता आणि गोदामांची संख्या वाढली आहे.
- खर्च कमी करण्यासाठी प्रशिक्षण आणि गटशेतीवर भर दिला जात आहे.
- अधिक अचूक व शाश्वत शेतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे.
- शेती क्षेत्रात संशोधन व नवनवीन प्रयोगांना चालना देण्यासाठी विविध तज्ज्ञ संस्थांशी सामंजस्य करार (MoU) केले जात आहेत.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

सर्वांसाठी सुरक्षित आणि परवडणारी घरे २०३० पर्यंत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने २०२५ मध्ये नवीन राज्य गृहनिर्माण धोरण जाहीर केले आहे. राज्याच्या विकासात पायाभूत सुविधांप्रमाणेच गृहनिर्माण क्षेत्राचा मोठा हातभार आहे. या धोरणामुळे राज्याच्या गृहनिर्माण क्षेत्राला गती मिळेलच, त्याचप्रमाणे आर्थिक विकासालाही चालना मिळेल.

# घराच्या स्वप्नपूर्तीसाठी राज्य गृहनिर्माण धोरण!

**नंदकुमार वाघमारे**

मंत्रिमंडळाच्या २० मे २०२५ रोजीच्या बैठकीत राज्याच्या गृहनिर्माण धोरण २०२५ला मंजुरी देण्यात आली. सुमारे १८ वर्षांनंतर जाहीर झालेल्या या धोरणात विदाआधारित निर्णयप्रक्रिया, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, गतिमानता व पारदर्शकता आणि सामाजिक समावेशकता यावर भर दिला आहे. या धोरणाच्या 'माझे घर, माझा अधिकार' या ब्रीदवाक्यातून 'सर्वांसाठी घरे' या स्वप्नांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने वाटचाल होईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'सर्वांसाठी घरे' या संकल्पावर आधारित हे धोरण असून यामध्ये सामाजिक समावेशकता, शाश्वतता, परवडणारी घरे व पुनर्निर्माणशीलता या मूलभूत तत्त्वांचा विचार केला आहे.

नव्या गृहनिर्माण धोरणात नोकरदार महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि औद्योगिक कामगारांसाठी गृहनिर्माण प्रस्तावित असून प्रधानमंत्री यांनी दिलेली 'वॉक टू वर्क' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहे. जुन्या इमारतींचा पुनर्विकास हे या धोरणाच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी एक. मुंबई व मुंबईबाहेरील पुनर्विकासास चालना देण्याकरिता धोरणात मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. ज्यामुळे पुनर्वसन प्रक्रिया गतिशील होऊन अस्तित्वातील सदनिकाधारकांच्या हिताचेही रक्षण होणार आहे. तसेच विद्यमान असलेल्या रहिवाशांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी तत्त्वे सुनिश्चित केली आहेत.

झोपडपट्टीमुक्त मुंबई हे स्वप्न सत्यात उतरवण्याकरिता या धोरणामध्ये प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी संयुक्त विद्यमाने प्रकल्प घेणे यासारख्या बाबींचा समावेश केला गेला आहे. या धोरणानुसार येत्या पाच वर्षांत सुमारे ७० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून ३५ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट आहे. यातून या धोरणाचे राज्याच्या आर्थिक विकासातील महत्त्व लक्षात येईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'सब का साथ, सब का विकास' या संकल्पपूर्तीच्या दिशेने या धोरणाच्या माध्यमातून वाटचाल होत आहे.





### गृहनिर्माण क्षेत्राचा सर्वसमावेशक, शाश्वत आणि सातत्यपूर्ण विकासाचा विचार

महाराष्ट्र शासनाने सर्वंकष गृहनिर्माण धोरण २०२५ जाहीर केले आहे. या धोरणात राज्यातील गृहनिर्माण क्षेत्राचा सर्वसमावेशक, शाश्वत आणि सातत्यपूर्ण विकास होण्याच्या दृष्टीने विचार करण्यात आला आहे. गृहनिर्माण क्षेत्र आर्थिक विकासाला चालना देणारे महत्त्वाचे क्षेत्र आहे, या बाबींचा विचार करून धोरण आखण्यात आले आहे.
किफायतशीरपणा, सर्वसमावेशकता, आव्हानांना तोंड देण्याची क्षमता आणि पर्यावरणपूरकता या चार महत्त्वाच्या गोष्टींचा या धोरणात प्राधान्याने विचार केला आहे.

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**



सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात घरे देऊन त्यांच्या स्वप्नांची पूर्ती करण्याला नेहमीच प्राधान्य राहिले आहे. त्या दृष्टीने एक सर्वसमावेशक गृहनिर्माण धोरण तयार करण्याच्या सूचना गृहनिर्माण विभागाला दिल्या होत्या. त्यानुसार या धोरणाला मूर्तस्वरूप मिळाले आहे. मला खरोखरच या गोष्टीचा खूप आनंद वाटतो की, सर्वसामान्य, दुर्बल, गोरगरीब अशा सर्व घटकांना हक्काचे घर देणारे हे धोरण देशात क्रांतिकारी ठरेल. नव्या गृहनिर्माण धोरणात केवळ घरेच उपलब्ध करून देत नाही, तर या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येऊन महाराष्ट्राची एक ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था बनविण्यास मोठे बळ मिळणार आहे.

**- एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री**



नव्या राज्य गृहनिर्माण धोरणामुळे राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना त्यांचे हक्काचे घर मिळणार असून त्यांच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. हे धोरण केवळ बांधकाम क्षेत्रापुरते मर्यादित न राहता, नागरिकांच्या मूलभूत गरजा, सामाजिक न्याय, पर्यावरणपूरकता आणि आर्थिक समावेशकतेचा विचार करणारे आहे. या महत्त्वाकांक्षी आणि व्यापक गृहनिर्माण धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शासन, खासगी क्षेत्र, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था; तसेच राज्यातील प्रत्येक जागरूक नागरिकांचे समन्वय व सहकार्य अत्यावश्यक ठरणार आहे.

**- अजित पवार, उपमुख्यमंत्री**

## धोरणाची वैशिष्ट्ये

राज्याचे यापूर्वीचे गृहनिर्माण धोरण २००७ मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर सुमारे १८ वर्षांनी गृहनिर्माण धोरणास मंजुरी मिळाली आहे. या धोरणाची रचना आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि आपत्तीशी संबंधित आव्हानांची पूर्तता करण्यासाठी घरे परवडणारी, सर्वसमावेशक, शाश्वत आणि पुनर्निर्माणशील अशा चार मार्गदर्शक तत्त्वांभोवती करण्यात आली आहे.

सामाजिक समावेशन २०३० पर्यंत ३५ लाख घरांचे उद्दिष्ट, राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल (SHIP), निवासी वापरासाठी योग्य शासकीय जमिनींची भूमी अधिकोष आधारसामग्रीची निर्मिती (Land Bank), विशेष घटकांकरिता गृहनिर्माण, वॉक टू वर्क (Walk-to-Work), सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांमध्ये समावेशक घरे योजना (Inclusive housing scheme), राज्यस्तरीय सर्वोच्च तक्रार निवारण समिती, स्वयंपुनर्विकास कक्ष, महाआवास निधी, परवडणारी भाडेतत्त्वावरील घरे, हरित इमारत उपक्रम (ग्रीन बिल्डिंग), आपत्तीरोधक इमारती, बांधकाम तंत्रज्ञान अनुसंधान केंद्र स्थापन करणे, पुनर्विकास धोरणे, सामाजिक गृहनिर्माणासाठी सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर), ज्ञान भागीदार (Knowledge partners) म्हणून नियुक्ती, झोपडपट्टी पुनर्वसनासाठी केंद्र सरकारच्या जमिनीचा वापर, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रकल्पांसाठी माहिती तंत्रज्ञान (IT) आधारित पद्धती, झोपडपट्ट्यांसाठी समूह (Cluster) पुनर्विकासाला प्रोत्साहन, झोपडपट्टी पुनर्वसनासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीचा (CSR) वापर, विकास कराराची नोंदणी बंधनकारक, पुनर्वसन क्षेत्रात सामायिक भागांचा समावेश, धोकादायक इमारतींचा पुनर्विकास, रखडलेल्या योजनांसाठी नवीन विकासकांची निवड, संयुक्त भागीदारीद्वारे (Joint Venture) योजना अशा सर्वंकष वैशिष्ट्यांचा समावेश या धोरणात करण्यात आला आहे.

## धोरणाच्या उपलब्धी

नवीन गृहनिर्माण धोरणामुळे गरीब, अल्प उत्पन्न गट (LIG) व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) यांना कमी किमतीत घरे उपलब्ध होणार असून मध्यमवर्गीय कुटुंबांनाही हप्त्यांमध्ये घर घेणे शक्य होणार आहे. यामुळे सर्वसामान्यांना परवडणाऱ्या घरांची स्वप्ने पूर्ण होण्यास मदत होईल. यासोबतच शहरातील झोपडपट्ट्यांचा नियोजनबद्ध पुनर्विकास करून रहिवाशांना पक्की घरे, पाणी, वीज, स्वच्छता अशा सुविधा मिळणार आहेत. त्यातूनच झोपडपट्टीमधील नागरिकांचे राहणीमान उंचावून झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासोबतच झोपडपट्टीमुक्त शहराकडे वाटचाल होईल. ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरक्षित निवास अंतर्गत वृद्धांसाठी सुसज्ज आणि सुरक्षित घरे उपलब्ध होणार असून वृद्धाश्रमासारख्या संकल्पनांऐवजी स्वतंत्र; पण साहाय्यभूत निवास व्यवस्थांचा प्रसार होईल. तसेच गृहनिर्माण प्रकल्पांमुळे बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार असून प्लंबिंग, वीज, सुरक्षारक्षक, देखभाल अशा साहाय्यक सेवादेखील वाढतील. त्याचप्रमाणे पर्यावरणपूरक बांधकाम, ऊर्जा कार्यक्षम घरे, डिजिटल सोयींसह शहरांची रचना तयार होणार असून स्मार्ट सिटी तत्त्वानुसार शहरांचा नियोजनबद्ध विस्तार होण्यास हातभार लागणार आहे.

महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदवल्यास अतिरिक्त सवलतीसोबतच महिलांसाठी सुरक्षित गृहनिर्माण वसाहतींना प्रोत्साहन मिळणार आहे. ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, प्राधान्य यादी, प्रकल्पांची माहिती यामुळे भ्रष्टाचार कमी होईल. लाभार्थ्यांना माहिती सहज मिळण्यास मदत होईल.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

**राज्याची प्रगती अधिक गतिमान करण्यात दळणवळण सुविधांची व्यापक उभारणी महत्त्वाची बाब आहे. त्याला प्राधान्य देत शासन नागरिकांच्या प्रवास सुविधेच्या दृष्टीने अनेक प्रकल्प गतीने पूर्ण करत आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाचा ठरलेला ७०१ कि.मी. लांबीचा 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' आता अंतिम टप्प्यासह पूर्णपणे सुरू झाला आहे.**

# समृद्ध महाराष्ट्राची भाग्यरेषा!

**वंदना थोरात – वारेगावकर**

विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील २४ जिल्ह्यांना कलाटणी देणाऱ्या या हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या नागपूर ते शिर्डी या ५२० कि.मी. लांबीच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ डिसेंबर २०२२ रोजी पार पडले. दुसऱ्या टप्प्याचे अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी (कोकमठाण) ते नाशिक जिल्ह्यातील भरवीर इंटरचेंज दरम्यान एकूण ८० कि.मी. लांबीचे लोकार्पण २६ मे २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले, तर समृद्धी महामार्गाच्या भरवीर इंटरचेंज ते इगतपुरीपर्यंतच्या २५ कि.मी. तिसऱ्या टप्प्याचे लोकार्पण ४ मार्च २०२४ रोजी तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे यांच्या हस्ते झाले होते. एकूण ७०१ कि.मी.पैकी ६२५ कि.मी. लांबीचा हा महामार्ग सध्या वाहतुकीस सुरू असून आतापर्यंत जवळजवळ दोन कोटी वाहनधारकांनी समृद्धी महामार्गाचा वापर केला आहे. सद्य:स्थितीला हा समृद्धी महामार्ग पूर्ण झाला असून, या मार्गाच्या उर्वरित ७६ कि.मी. लांबीचे म्हणजे इगतपुरी ते आमणे (ता.भिवंडी) मार्गाचे लोकार्पण ५ जून २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

हा महामार्ग दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्ग, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट आणि शिर्डी,





छायाचित्र : मनोज अहिरे

अजिंठा - वेरुळ लेणी, लोणार सरोवर आणि इतर पर्यटन स्थळांना जोडणारा आहे. देशाचे ग्रोथ इंजिन असणाऱ्या महाराष्ट्रासाठी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या समृद्धीची भाग्यरेषा ठरणार आहे.

## प्रकल्पाची व्याप्ती

राज्याच्या पाच महसूल विभागाच्या १० जिल्ह्यातील २६ तालुक्यांमधील ३९२ गावांमधून जाणारा हा सहा पदरी महामार्ग ग्रीनफिल्ड संरेखन आहे. समृद्धी महामार्गामुळे नागपूर, वर्धा, अमरावती, वाशिम, बुलढाणा, जालना, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक व ठाणे ही १० जिल्हे प्रत्यक्षरीत्या जोडली जातात. तसेच समृद्धी महामार्गामुळे चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, अकोला, हिंगोली, परभणी, नांदेड, बीड, धुळे, जळगाव, पालघर व रायगड ही १४ जिल्हे अप्रत्यक्षरीत्या जोडली जातात. जुन्या नागपूर-मुंबई मार्गावरून मुंबईकडे येण्यास १७-१८ तासांचा कालावधी लागत असे. नवीन ग्रीनफिल्ड एक्सप्रेस-वेने हा प्रवास साधारणत: ८ तासात करणे शक्य झाले आहे. आता मुंबईतील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ते नागपूरस्थित मिहान यांना जोडणाऱ्या या महामार्गामुळे बंदरावरून जलद वाहतूक करून आवश्यक माल भारतभर वेळेवर पोहोचवणे शक्य होणार आहे. हा प्रकल्प देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गुंतवणुकीच्या आधारे राज्यातल्या ग्रामीण भागास महत्त्वाचा ठरलेला आहे.

## वैशिष्ट्यांनी समृद्ध महामार्ग

राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असेलला समृद्धी महामार्ग हा अभियांत्रिकी कौशल्यासह अनेक वैशिष्ट्यांनीही समृद्ध असा महामार्ग आहे. दळणवळणाची गतिमान घोडदौड साध्य करत पर्यटन, उद्योग, शेतमाल कमी वेळेत बाजारपेठेत पोहोचवण्यास साहाय्यक ठरत असलेल्या समृद्धी महामार्गावरून आतापर्यंत अंदाजे दोन कोटी वाहनांनी प्रवास करत सुखद, रहदारीमुक्त सुलभ, गतिमान प्रवासाचा अनुभव घेतला आहे.



छायाचित्र : मनोज अहिरे

## सर्वाधिक लांबी व रुंदीचा बोगदा

समृद्धी महामार्गाच्या तिसऱ्या टप्प्यातील ७६ कि.मी.ची लांबी ही नाशिक व ठाणे या दोन जिल्ह्यांत येते. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधून खडतर मार्ग काढत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने अभियांत्रिकी आव्हान पेलले. या टप्प्यामध्ये एकूण पाच दुहेरी बोगदे असून या बोगद्यांची लांबी १०.७३ कि.मी. (दोन्ही मार्गिका मिळून एकूण लांबी २१.४६ कि.मी.) आहे. त्यातील पॅकेज १४ (इगतपुरी) येथील बोगदा आठ कि.मी. लांबीचा असून हा महाराष्ट्रातील सर्वाधिक लांबी रुंदीचा (१७.६१ मीटर) बोगदा असून या बोगद्याची उंची ९.१२ मीटर आहे.

## प्रथमच बोगद्यात अग्निशमन यंत्रणा

अग्निसुरक्षेसाठी भारतातील कोणत्याही बोगद्यात प्रथमच वापरण्यात येणारी अग्निशमन यंत्रणा इगतपुरीमधील सर्वात लांबीच्या बोगद्यामध्ये बसवण्यात आलेली आहे. या बोगद्यामुळे अंदाजे आठ मिनिटात इगतपुरी ते कसारा हे अंतर पार करता येते. त्यातून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ नाशिक महामार्गावरील कसारा घाटाला पर्यायी मार्ग उपलब्ध झाल्यामुळे वाहतूक अधिक जलद झाली आहे.

## सर्वाधिक लांबीचा पूल

भौगोलिक परिस्थितीतून मार्ग काढत महामार्गाचे काम पुढे नेत असताना नाशिक व ठाणे या जिल्ह्यातील ७६ कि.मी.च्या डोंगरदऱ्यांमुळे व्हायाडक्ट (मोठे पूल) व

बोगदे बांधणे हे मोठे जिकिरीचे होते. काही ठिकाणी कठीण खडकात ३० ते ४० मिटरपर्यंत खोदकाम करावे लागले. या टप्प्यात एकूण १७ व्हायाडक्ट (मोठे व्हॅली पूल) असून त्याची एकूण लांबी १०.५६ कि.मी. (दोन्ही मार्गिका मिळून एकूण लांबी २१.१२ कि.मी.) आहे. या टप्प्यात सर्वाधिक लांबीचा पूल (व्हायाडक्ट) २.२८ कि.मी. लांबीचा आहे. या टप्प्यात एका ठिकाणी (व्हायाडक्ट-२) पुलाच्या काही खांबांची उंची ८४ मिटरपर्यंत आहे.



छायाचित्र : मनोज अहिरे

## इंटरचेंजेस

या टप्प्यात इगतपुरी, खुटघर व आमणे येथे इंटरचेंज येतात. या शेवटच्या टप्प्यात मोठ्या प्रमाणात उच्च व कमी दाबाच्या विद्युत वाहिन्या स्थलांतरित करण्यात आल्या असल्याने त्यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या कमी दाबाच्या ६२ वाहिन्या स्थलांतरित करण्यात आलेल्या आहेत. तसेच टोरेंट पॉवरच्या पाच विद्युत वाहिन्या व पॉवरग्रीडची एक विद्युत वाहिनी स्थलांतरित करण्यात आली असून, या टप्प्यात एक रेल्वे ओलांडणी पूल बांधण्यात आला आहे.


छायाचित्र : मनोज अहिरे

## पर्यावरणपूरक

समृद्धी महामार्गाच्या प्रकल्पामध्ये वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली एकूण १०० बांधकामांची रचना वन्यजीव संरक्षणासाठी करण्यात आली आहे. वन्यजीवांच्या वावरासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या ठिकाणी 'ध्वनिरोधकां'ची तरतूद असून समृद्धी महामार्गाच्या दुतर्फा ११ लाख ३१ हजार झाडे लावण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच या प्रकल्पामध्ये एकूण २०३ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती प्रस्तावित आहे.

## प्रवासातील सुलभता

इगतपुरी (जि. नाशिक) ते आमणे (ता. भिवंडी) हा ७६ कि.मी.चा तिसरा टप्पा वाहतुकीस सुरू झाल्यामुळे ठाणे (आमणे) ते नागपूरपर्यंतचा प्रवास आठ तासात करणे सहजतेने शक्य होत आहे. तसेच ठाणे, मुंबई परिसरातून शिर्डी येथे जाणाऱ्या भाविकांनाही या महामार्गामुळे आपला प्रवास सुलभरीत्या व जलदपणे करणे शक्य होत आहे. त्यासोबतच शिर्डी, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील सिन्नर व इगतपुरी परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल सुलभतेने कमी कालावधीत मोठ्या बाजारपेठांपर्यंत पोहोचवणे सोयीचे झाले आहे. शेतकरी, उद्योजक, प्रवाशांना मुंबई महानगर प्रदेशात कामानिमित्त वरचेवर येणे -जाणे हे अधिक सोईस्कर होत असून शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक संधीचे क्षेत्र विस्तारण्याच्या दृष्टीनेदेखील हा महामार्ग निश्चितच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या साहाय्यक ठरणारा आहे.

राज्याच्या उपराजधानीला राज्याच्या राजधानीपर्यंत जोडणारा नागपूर ते मुंबई दरम्यानचे अंतर अवघ्या आठ तासांवर आणणारा समृद्धी महामार्ग निश्चितच महाराष्टाच्या औद्यागिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासालाही गतिमान करणारा ठरेल, यात शंका नाही.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

**किनारपट्टीवरील धोरणात्मक स्थानांचा वापर करून राज्याला एक प्रमुख जहाज बांधणी, दुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर केंद्र व समृद्ध हरित, शाश्वत सागरी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी संशोधन आणि विकासाद्वारे आधुनिक पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि उद्योग कौशल्यास प्रोत्साहन देण्यासाठी या धोरणाचा उपयोग होणार आहे.**

# सागरी अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण

**नितेश राणे,** बंदरे विकास मंत्री



राज्याच्या सागरी क्षेत्राच्या विकासाला चालना देऊन पायाभूत सुविधा निर्माण करणे ही काळाची गरज आहे. हे उद्दिष्ट समोर ठेवून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती व जहाज पुनर्वापर सुविधा विकास धोरण-२०२५ला अधिकृत मान्यता दिली आहे. या धोरणानुसार खासगी क्षेत्राच्या सहभागास प्रोत्साहन, भांडवली अनुदान, कौशल्य विकास; तसेच संशोधन व तंत्रज्ञान विकासासाठी साहाय्य यांचा समावेश आहे. राज्यातील किनारपट्टीवर जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्याच्या उद्देशाने हे धोरण तयार केले आहे. यामध्ये गेल्या अनेक दशकांमध्ये जहाज बांधणी उद्योगाचे युरोपमधून आशियाकडे भौगोलिक स्थानांतरण झाले आहे. जहाज बांधणी उद्योग हा मजबूत उत्पादन घटक असल्याने त्यामध्ये पोलाद, इलेक्ट्रॉनिक्स, अभियांत्रिकी आणि बंदर पायाभूत सुविधा या उद्योगांचा वाटा आहे. तसेच रोजगाराच्या मोठ्या संधीही या क्षेत्रात आहेत. यामध्ये जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर असे तीन भाग आहेत.

देशातील जहाज बांधणी, दुरुस्ती व पुनर्वापर उद्योगाला मजबूत करणे, हे मेरिटाईम इंडिया व्हिजन - २०३० आणि मेरिटाईम अमृत काल व्हिजन - २०४७ चे उद्दिष्ट आहे. किनारी, आंतरदेशीय आणि जागतिक व्यापारासाठी जहाजांच्या निर्मितीला प्रोत्साहन देऊन परदेशी जहाजांवरील अवलंबित्व कमी करण्याचा आणि सागरी वाहतूक, ऊर्जा सुरक्षा; तसेच राष्ट्रीय स्वावलंबन वाढवण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे.

सागरी धोरणाबाबत महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्राचा विचार करता, राज्याला लाभलेला ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा, भक्कम औद्योगिक आणि सागरी पाया, उद्योगासाठी प्रशिक्षित तसेच पात्र मनुष्यबळ या बाबींमुळे राज्य सागरी क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावण्यास सज्ज आहे. देशातील सर्वात जास्त जीडीपी योगदान, थेट परकीय गुंतवणुकीचा मोठा ओघ, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता, सागरी व्यापारामध्ये राज्याचा वाटा १५ टक्के, पूरक उद्योग, बंदरांना जोडणाऱ्या पायाभूत सुविधांचे उत्कृष्ट जाळे आणि सर्वात महत्त्वाचे साहाय्यकारी शासकीय धोरण या मोठ्या संधी आहेत.

किनारपट्टीवरील धोरणात्मक स्थानांचा वापर करून राज्याला एक प्रमुख जहाज बांधणी, दुरुस्ती आणि पुनर्वापर केंद्र व समृद्ध हरित, शाश्वत सागरी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी संशोधन आणि विकासाद्वारे आधुनिक पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि उद्योग कौशल्यास प्रोत्साहन देण्यासाठी या धोरणाचा उपयोग होणार आहे. या धोरणाद्वारे मेरिटाईम इंडिया व्हिजन - २०३० आणि मेरिटाईम अमृत काल व्हिजन - २०४७ मधील देशाच्या जहाज बांधणी, दुरुस्ती व पुनर्वापर उद्दिष्टांपैकी ३३ टक्के वाटा उचलणे, शिपयार्ड खर्चातील तोटा दूर करणे, कौशल्य आणि उत्पादकतेवर भर देणारे कुशल मनुष्यबळ तयार करणे, तांत्रिकदृष्ट्या प्रगत क्षेत्राला प्रोत्साहन देणे, संशोधन आणि विकासामध्ये महत्त्वपूर्ण गुंतवणूक आणि सहकार्याद्वारे नावीन्यपूर्णतेस चालना देणे ही या धोरणाची उद्दिष्टे आहेत. तसेच या क्षेत्रात राज्यात २०३० पर्यंत ६,६०० कोटी रुपये गुंतवणूक आणि ४० हजारपेक्षा जास्त रोजगाराची क्षमता, तर २०४७ पर्यंत १८ हजार कोटींची गुंतवणूक आणि १ लाख ४० हजार रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.



## धोरणाची वैशिष्ट्ये

**तीन मॉडेलवर विकास :** राज्याच्या किनारपट्टीवर सागरी शिपयार्ड क्लस्टर, एकल शिपयार्ड प्रकल्प आणि बंदर प्रकल्पांतर्गत जहाजबांधणी हे तीन मॉडेल स्वीकारण्यात आले आहेत. यामध्ये जहाज बांधणी, जहाज दुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर केंद्रांच्या माध्यमातून

आनुषंगिक उद्योग, कौशल्य सुविधा, शिपयार्डसाठीच्या सुविधा, पायाभूत सुविधा सक्षम करणे याचा समावेश आहे. तसेच प्रशिक्षित मनुष्यबळ, संशोधन सुविधा आणि सामायिक पायाभूत सुविधा, यामुळे वाहतूक खर्च कमी होऊन कच्चा माल, उपकरणे आणि घटक उपलब्ध होतील.

यामध्ये सुकी गोदी, स्लीप-वे, शिप लिफ्ट, तरंगती सुकी गोदी, फॅब्रिकेशन कार्यशाळा, गोदामे, ब्लास्टिंग आणि पेंटिंग चेंबर्स, पाईप फॅब्रिकेशन कार्यशाळा, एकात्मता सुविधा, फिनिशिंग विभाग, उपकरणे, क्रेन्ससह आवश्यक सर्व सुविधांसह शिपयार्ड असेल. तसेच जहाज पुनर्वापर सुविधांमध्ये नौकानयन उपकरणे, दळणवळण, सुरक्षा उपकरणे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे यासह लागणारी इतर उपकरणे निर्मिती करणारे उद्योग उभारण्यास प्रोत्साहन देण्यात येणार आहे. तसेच कुशल मनुष्यबळ, अभियांत्रिकी सुविधा आणि संशोधन विकास केंद्र, चाचणी सुविधा, कामगार, त्यांच्यासाठी घरे, आरोग्य सेवा, शिक्षण व इतर आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध असणार आहेत.

**भांडवली अनुदान १५%** : खासगी गुंतवणूकदारांना प्रकल्प किमतीच्या १५% इतके भांडवली साहाय्य दिले जाणार असून, बांधकाम प्रगतीनुसार हप्त्यांमध्ये हे अनुदान दिले जाईल. विकासकाने बँक हमी दिल्यानंतर बांधकाम कालावधीमध्ये चार समान हप्त्यांमध्ये भांडवली अनुदान दिले जाईल. चौथा आणि शेवटचा हप्ता प्रकल्पाचे कार्यचालन सुरू झाल्यानंतर देण्यात येईल.

**कौशल्य विकासासाठी प्रोत्साहन** : जहाज क्षेत्रातील कामगारांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांना प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के किंवा जास्तीत जास्त पाच कोटी रुपयांपर्यंत भांडवली साहाय्य देण्यात येईल, तर कौशल्य वाढीसाठी एक कोटी रुपयांपर्यंत मदत मिळणार आहे.

जहाज बांधणी, दुरुस्ती आणि पुनर्वापर क्षेत्रात नौदल्य स्थापन, जहाज आरेखन, सागरी, यांत्रिकी आणि विद्युत अभियांत्रिकी, उत्पादन व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञान अशा शाखांमध्ये कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. वेल्डर, फिटर, इंजिन फिटर, सुतारकाम व अंतर्गत सजावट कामगार, गुणवत्ता निरीक्षक, सागरी चित्रकार, क्रेन ऑपरेटर यांसह अनेक व्यवसायांचे कौशल्य आवश्यक असते. या व्यवसायातील कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयआयटी), पॉलिटेक्निक, अभियांत्रिकी महाविद्यालय, सागरी विद्यापीठे आणि नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत



करार करून विकास केंद्र स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्याचाही या धोरणात समावेश आहे. यामुळे राज्यात कुशल मनुष्यबळाची निर्मिती होण्यास मदत होणार आहे. तसेच युवकांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होण्यासाठीही याचा फायदा होणार आहे. त्याशिवाय इतर उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध झाल्यामुळे राज्यात गुंतवणुकीत नक्कीच वाढ होईल.

**संशोधन आणि विकासाला चालना** : नवीन तंत्रज्ञान, डिजिटायझेशन आणि पर्यावरणपूरक प्रक्रियांवर आधारित संशोधन प्रकल्पांना पाच कोटी रुपयांपर्यंत भांडवली साहाय्य मिळणार आहे. तसेच संशोधन आणि विकास केंद्रे, इन्क्युबेशन सेंटर उभारण्यासाठी पाठिंबा, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत सहकार्यातून संशोधन यांना पाठिंबा देणे या बाबी धोरणात समाविष्ट आहेत. यामुळे राज्यात संशोधक तयार होण्यास मदत होऊन नवनवीन तंत्रज्ञान विकासास हातभार लागणार आहे. तसेच तंत्रज्ञान निर्यातीसही चालना मिळून अर्थव्यवस्थेत भर पडेल.

केंद्र सरकारच्या 'मेरिटाईम इंडिया व्हिजन-२०३०'चा भाग या नव्या धोरणाद्वारे महाराष्ट्र राज्याने केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मेरिटाईम इंडिया व्हिजन - २०३०' आणि 'अमृत काल व्हिजन - २०४७' या कार्यक्रमांतील १/३ लक्ष्य उचलण्याचे ठरवले आहे. राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन बनवण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या धोरणाचा मोठा फायदा होणार आहे. यामुळे गुंतवणूक वाढ, रोजगारासोबतच संशोधन क्षेत्राला चलना मिळाल्यामुळे त्याचा फायदा सर्वच उद्योगांना होईल आणि अर्थव्यवस्था वाढीसाठी त्याचा नक्कीच फायदा होईल.

दिघी - राजपूर खाडी येथे २,५५० एकर क्षेत्रावर शिपयार्ड क्लस्टर असणार आहे. जयगड येथे जयगड खाडीजवळ एक हजार ३३७ एकर क्षेत्रावर क्लस्टर असेल, दाभोळ येथे वाशिष्ठी खाडीमध्ये ९३१ एकर क्षेत्र विकसित करण्यात येईल. नांदगाव येथे खुल्या समुद्रात २,६६९ एकर जागेवर क्लस्टर तयार करण्यात येणार असून तिथेही एक कि.मी. लांबीचा सागर किनारा असणार आहे. विजयदुर्ग येथेही खुल्या समुद्रात १,३७१ एकर क्षेत्रामध्ये क्लस्टर विकसित करण्यात येणार आहे. बाणकोट येथे सावित्री नदी येथे ८५६ एकर जागेवर क्लस्टर याठिकाणी संभाव्य सागरी शिपयार्ड समूहांसाठी नियोजन करण्यात आले आहे.

वैतरणा नदीवर वैतरणा येथे रेल्वे पुलाच्या पूर्व व पश्चिम बाजूस, मारंबळ पाडा जेटी येथे विरार पूर्व व पश्चिमेला, रेती बंदर विरार येथे, कुंडलिका नदीवर भोनांग गाव येथे, साळाव बंदराजवळील रेवदंडा येथे, अंबा नदीवरील मानकुळेगाव, शहाबाज, राजपुरी खाडीमध्ये आडी-ठाकूर आगरदांडा, जयगड नदीवर रोहिले व काताळे गाव, वाघोटन नदीवरील विजयदुर्ग जेट्टी येथे एकल शिपयार्ड नियोजित आहेत.

जहाज बांधणी, दुरुस्ती व पुनर्वापर धोरणामुळे महाराष्ट्र सागरी क्षेत्रात देशात अग्रगण्य होण्यासोबतच उद्योगजगत, संशोधक, प्रशिक्षण संस्था आणि स्थानिक कामगार यांच्यासाठी या धोरणामुळे संधीची अनेक दारे खुली होणार हे निश्चित.

**शब्दांकन : हेमंतकुमार चव्हाण,**
विभागीय संपर्क अधिकारी.

**आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आयुष्य अधिक सशक्त, सक्षम आणि प्रेरणादायी करण्यासाठी नवोपक्रमांद्वारे शाळा आणि शिक्षक यांचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. आदिवासी भागात शिक्षण हा विकासाचा मुख्य मार्ग बनत असून, 'सशक्त विद्यार्थी – सक्षम समाज' हे ध्येय प्रत्यक्षात उतरवले जात आहे. आदिवासी आश्रमशाळांमधील शैक्षणिक व्यवस्थेला अधिक सक्षम व प्रभावी बनवण्यासाठी विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोनाला प्राधान्य देण्यात येत आहे.**

# सशक्त विद्यार्थी : सक्षम समाज!

**डॉ. अशोक वुईके,** आदिवासी विकास मंत्री



आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये या आश्रमशाळांची महत्त्वाची भूमिका असून आश्रमशाळांचे योगदानही उल्लेखनीय आहे. राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना आश्रमशाळेच्या माध्यमातून शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. आधुनिक काळातील बदलत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी या शाळांमध्ये आमूलाग्र बदल केले जात आहेत. शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याने आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आश्रमशाळांमध्ये विविध नवोपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्यात येत आहे.

### आदर्श आश्रमशाळा

राज्यातील शासकीय आश्रमशाळांना आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने त्यामध्ये अत्याधुनिक भौतिक व शैक्षणिक सुविधा प्रदान केल्या जात आहेत. यामध्ये सुसज्ज इमारत, डिजिटल क्लासरूम, सायन्स लॅब, ग्रंथालय, कला व संगीत कक्ष, निवास व्यवस्था, भोजनालय, क्रीडांगण, अपंगांसाठी सुविधा, स्वच्छ पिण्याचे पाणी, सीसीटीव्ही यांचा समावेश आहे. शैक्षणिकदृष्ट्या कौशल्ये जसे की, समीक्षात्मक विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवैधानिक मूल्ये, संवाद व सहकार्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित केली जात आहेत. पूरक वाचन, स्वअध्ययन, गट अध्ययन, कृती आधारित व आनंददायी शिक्षण; तसेच भाषण, लेखन, अभिनय, गायन आदी सहशालेय उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडवले जात आहे.



### राघोजी भांगरे गुणगौरव पुरस्कार

इयत्ता १०वी व १२वी च्या परीक्षांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी 'राघोजी भांगरे गुणगौरव पुरस्कार योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, नामांकित शाळा, सैनिकी शाळा; तसेच एकलव्य मॉडेल रेसिडेन्शिअल शाळांमधील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या योजनेनुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेतलेल्या परीक्षांमध्ये राज्यस्तरावर प्रावीण्य मिळविणाऱ्या प्रत्येकी पाच मुले व पाच मुलींना; तसेच प्रत्येक नऊ विभागीय शिक्षण मंडळातील प्रथम तीन मुले व तीन मुलींना पारितोषिक देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेच्या माध्यमातून पुढे जाण्याची प्रेरणा निर्माण होणार असून, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

### शाळा प्रवेशोत्सव

राज्यात एकूण ४९७ शासकीय आश्रमशाळा आणि ५५४ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. आदिवासी विकास विभागामार्फत राज्यातील सर्व शासकीय आश्रमशाळांमध्ये १६ जून २०२५ या दिवशी नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात शाळा प्रवेशोत्सव या कार्यक्रमाद्वारे उत्साहात झाली. या दिवशी प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी लोकप्रतिनिधी; तसेच प्रशासकीय अधिकारी हे उपस्थित होते. प्रवेशाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांसाठी

केवळ औपचारिक न राहता आनंद, आत्मीयता आणि प्रेरणा देणारा क्षण ठरावा, हा त्यामागील मुख्य हेतू होता. नाशिक जिल्ह्यातील मुंडेगाव येथील शासकीय आश्रमशाळेत १६ जून रोजी शाळा प्रवेशोत्सवासाठी मी स्वतः उपस्थित राहून शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

### 'संवाद चिमुकल्यांशी'

राज्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सामाजिक जीवनातील अडचणी समजून घेण्यासाठी, तसेच त्यांच्याशी थेट संवाद साधून त्यांच्या विकासासाठी उपाययोजना करण्याच्या उद्देशाने 'संवाद चिमुकल्यांशी' हे अभिनव अभियान राज्यभर ७ फेब्रुवारी २०२५ राबविण्यात आले. या उपक्रमाद्वारे आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची हमी, उपलब्ध सेवांची गुणवत्ता आणि आरोग्यविषयक सोयी यांचे मूल्यमापन करून त्यात सुधारणा करण्यावर भर देण्यात आला.

या उपक्रमांतर्गत राज्यातील प्रत्येक दुर्गम आश्रमशाळेत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी थेट भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांची उपस्थिती, उपलब्ध सुविधा, स्वयंपाकाची व्यवस्था, आर.ओ. पाणी प्रणाली, स्वच्छता व स्वयंपाकासाठी लागणाऱ्या साधनांची पाहणी करण्यात आली. यात आढळलेल्या त्रुटींवर तातडीने कार्यवाही करून सुधारणा करण्याचे आदेश दिले आहेत. या संवादातून विद्यार्थ्यांच्या मनात शासन प्रणालीबाबत विश्वास व आपुलकी निर्माण झाली.

### वसतिगृह समन्वय समिती

वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह आरोग्य, सुविधा आणि प्रशासन यामधील सुसंवाद वाढवण्यासाठी 'वसतिगृह समन्वय समिती' गठित करण्यात आली आहे. ही समिती वसतिगृह स्तरावर कार्यरत राहून विद्यार्थ्यांच्या समस्या तातडीने सोडविण्याचा प्रयत्न करेल. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रश्न प्रकल्प कार्यालय स्तरावरच मार्गी लागण्यास मदत होणार आहे.



### प्रत्येक शाळेसाठी एक परिचारिका

विद्यार्थ्यांच्या आरोग्याची निगा राखण्यासाठी प्रत्येक आश्रमशाळेत एक परिचारिका (नर्स) नियुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याची नियमित देखरेख करणे शक्य होणार आहे. आश्रमशाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने ६ वर्षांवरील वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी दक्ष राहणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर शाळेत नर्सची उपलब्धता अत्यंत आवश्यक होती. आरोग्यविषयक तक्रारी उद्‌भवल्यास परिचारिकांमार्फत विद्यार्थ्यांना तत्काळ प्राथमिक उपचार देता येणार असून आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ल्याच्या माध्यमातून प्रथमोपचार देण्यात येणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यासही मदत होईल.

विद्यार्थ्यांच्या तक्रारी दूर व्हाव्यात, त्यांचे प्रश्न वसतिगृह व प्रकल्प कार्यालय स्तरावरच सुटावेत; तसेच विद्यार्थी आणि प्रशासनात समन्वय राहावा, वसतिगृहांमध्ये दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा वाढावा, या सर्व बाबींसाठी वसतिगृह समन्वय समितीची मदत होणार आहे.

### 'पवित्र पोर्टल'द्वारे शिक्षक भरती

विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये शिक्षक भरती प्रक्रियेसाठी आता 'पवित्र पोर्टल' या ऑनलाइन प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून सुधारित संच मान्यतेचे निकष जाहीर करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे अनुदानित आश्रमशाळांमध्ये होणारी शिक्षक भरती पारदर्शक, निकोप आणि गुणवत्ताधारित होणार आहे. यामुळे पात्रताधारक उमेदवारांना समान संधी उपलब्ध होणार आहे. 'पवित्र पोर्टल'द्वारे निवडले जाणारे सर्व शिक्षक 'शिक्षक अभियोग्यता चाचणी' (TET) उत्तीर्ण करणारे असणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत निश्चितच वाढ होणार आहे. या निर्णयामुळे शिक्षक भरती प्रक्रियेवरील विश्वासार्हता वाढून, विद्यार्थ्यांना अधिक प्रशिक्षित व पात्र शिक्षक लाभणार आहेत. राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याच्या दृष्टीने हा निर्णय दिशादर्शक ठरणार आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आयुष्य अधिक सशक्त, सक्षम आणि प्रेरणादायी करण्यासाठी नवोपक्रमांद्वारे शाळा आणि शिक्षक यांचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. आदिवासी भागात शिक्षण हा विकासाचा मुख्य मार्ग बनत असून, 'सशक्त विद्यार्थी - सक्षम समाज' हे ध्येय प्रत्यक्षात उतरवले जात आहे. आदिवासी आश्रमशाळांमधील शैक्षणिक व्यवस्थेला अधिक सक्षम व प्रभावी बनवण्यासाठी विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोनाला प्राधान्य देण्यात येत आहे.

**शब्दांकन : शैलजा पाटील,**
(विभागीय संपर्क अधिकारी)

**‘लोककल्याण’ हे एकमेव ध्येय समोर ठेवून तिसऱ्यांदा स्थापन झालेल्या केंद्रातील सरकारने ११ वर्षांत नागरिकांच्या मनात घर केले आहे. या ११ वर्षांच्या काळात सरकारकडून अनेक जनकल्याणकारी निर्णय घेण्यात आले. केंद्र सरकारच्या कृषी, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, रोजगार, दळणवळण, सिंचन, माहिती तंत्रज्ञान, ग्रामविकास, ऊर्जा व सामाजिक न्याय यांसारख्या विविध लोकाभिमुख विषयांना प्राधान्य देत महाराष्ट्र गतिमानतेने प्रगती करत आहे. केंद्र शासनाने गेल्या ११ वर्षांत राबविलेल्या लोककल्याणकारी योजनांचा महाराष्ट्रातील नागरिकांना लाभ मिळत आहे. केंद्र शासनाच्या जनकल्याणकारी योजनांच्या प्रवासात महाराष्ट्राच्या गतिमानतेचा आढावा घेणारा हा लेख...**

# केंद्राच्या योजनांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर!

**वर्षा फडके-आंधळे**

देशातील आर्थिक समावेशनाच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल टाकत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २८ ऑगस्ट २०१४ रोजी प्रधानमंत्री जनधन योजनेचा प्रारंभ केला. बँकिंग सेवेपासून वंचित असलेल्या सामान्य नागरिकांना आर्थिक प्रवाहात आणण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न यशस्वी ठरला. अगदी शून्य शिल्लक खात्यांची संकल्पना, मोफत रूपे डेबिट कार्ड, अपघात विमा आणि थेट लाभ हस्तांतरण (DBT) यासारख्या सुविधांमुळे ही योजना अल्पावधीतच लोकप्रिय झाली. ३१ मे २०२५ पर्यंत ५५.४४ कोटी बँक खाती प्रधानमंत्री जनधन योजनेतून उघडण्यात आली आहेत, हीच या योजनेच्या प्रचंड यशाची साक्ष देणारी बाब आहे. या खात्यांपैकी ३०.९४ कोटी खाती महिलांच्या नावे आहेत, जे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जाते. तसेच ३६.९८ कोटी खाती ग्रामीण आणि निम्नशहरी भागांमध्ये उघडण्यात आली आहेत. ज्यामुळे दुर्गम भागातील लोकांना औपचारिक बँकिंग सेवेचा लाभ मिळू लागला आहे. योजनेंतर्गत आजवर ३८.२० कोटी लाभार्थ्यांना ‘रूपे डेबिट कार्ड’ देण्यात आले आहे. ज्यामुळे डिजिटल व्यवहार आणि आर्थिक व्यवहार सुलभ झाले आहेत.

### प्रधानमंत्री उज्ज्वला योजना

पूर्वी स्वयंपाकघरातून निघणाऱ्या धुरामुळे माता भगिनींचे आयुष्य अंधारमय झाले होते. मात्र प्रधानमंत्री उज्ज्वला योजनामुळे ग्रामीण भागातील महिलांचे आयुष्य धूरमुक्त होऊन त्यांच्या आयुष्यात नवी पहाट उदयास आली आहे. १ मार्च २०२५ पर्यंत साधारण १० कोटी ३३ लाख कुटुंबांना स्वयंपाकाच्या गॅसची जोडणी देण्यात आली आहे. या योजनेचा विस्तार करत २०२५-२६ पर्यंत आणखी ७५ लाख गॅस जोडण्या देण्यास मान्यता देण्यात आली आहे. अशाप्रकारे ही केवळ गॅस जोडणी नसून प्रधानमंत्री यांनी महिलावर्गाला दिलेली सन्मानाची, आरोग्याची आणि आत्मनिर्भरतेची भेट आहे. ग्रामीण भागातील महिलांना दिलेली ही भेट त्यांच्या आयुष्यात एक मोठा बदल घडवून आणत आहे.

### आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जनआरोग्य योजना

आरोग्य ही खरी संपत्ती आहे. अचानक एखाद्याला घरात गंभीर आजार झाला, तर आयुष्यभराची जमापुंजी काही दिवसांत खर्च होऊन जाते; पण या दुःखद वास्तवाला बदलणारी एक क्रांतिकारी योजना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सुरू करण्यात आली ती म्हणजे ‘आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जनआरोग्य योजना’. ही योजना केवळ आरोग्य विमा नव्हे, तर गरिबांच्या आरोग्यासाठी संजीवनी ठरली आहे. या योजनेंतर्गत मे २०२५ अखेर नऊ कोटी ५६ लाख ७३ हजार ९५५ लोकांवर उपचार करण्यात आले असून, यासाठी १.३ लाख कोटी इतका निधी खर्च झाला आहे. मार्च २०२५ अखेर ३६.९ कोटी आयुष्मान कार्डचे वाटप करण्यात आले.




कोरोना संकटकाळानंतर देशभरातील रुग्णालयातील आयसीयू बेडची संख्या १.४५ लाखांपर्यंत वाढवण्यात आली होती. ७८ कोटी ३९ लाख ८० हजार लोकांचे आभा कार्ड तयार करण्यात आले आहेत. अशाप्रकारे 'आरोग्य हक्क' या संकल्पनेला बळ देणारी ही योजना आहे.

## प्रधानमंत्री स्वनिधी योजना

कोरोना काळात सगळं थांबलं; पण सर्वात आधी थांबली ती होती जगण्यासाठी चाललेली रोजची धावपळ. हातगाडीवाले, भाजीवाले, चहा विक्रेते, पादचारी, बाजारात काम करणारे हजारो छोटे व्यावसायिक अचानक बेरोजगार झाले. उत्पन्नाचे साधन हरवले आणि उदरनिर्वाहाचे संकट उभे राहिले. मोलमजुरी करणाऱ्यांना उदरनिर्वाह कसा करायचा हा प्रश्न होता. अशा वेळी या उपेक्षित, मेहनती वर्गासाठी आशेचा किरण बनून आली प्रधानमंत्री स्वनिधी योजना. तारणशिवाय, कोणत्याही मध्यस्थांशिवाय थेट मदतीचा हात देणारी ही योजना, आज लाखो कुटुंबांच्या ऊर्जेचा स्रोत ठरली आहे. आजपर्यंत १३,७९० कोटी रुपयांची कर्जे मंजूर करण्यात आली असून एकूण ९६ लाख ७ हजार २१४ लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत १०,०००/-, २०,०००/- आणि ५०,०००/- रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज देण्यात आले आहे.

## महिला सक्षमीकरणाच्या योजना

आजची मुलगी केवळ घरासाठीच नाही तर समाज, देशासाठी उज्ज्वल भविष्य घडवत आहे. नारीशक्ती सक्षमीकरणासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने घेतलेल्या दूरदृष्टीपूर्ण पावलांची ही फलश्रुती आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या अभियानामुळे भारतात लिंग गुणोत्तर १०२० पर्यंत वाढले आहे. ही केवळ आकडेवारी नाही, तर बदललेल्या मानसिकतेचे प्रमाण आहे. आजवर ४ कोटींहून अधिक 'सुकन्या समृद्धी योजना' खाती उघडण्यात आली आहेत. २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात १२.२८ कोटी मुलींच्या नावाची नोंद शालेय शिक्षणासाठी झाली असून, यामध्ये २.०१ कोटींहून




अधिक मुलींनी प्रथमच उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. पगारी बाळंतपण रजा १२ आठवड्यांवरून २६ आठवड्यांपर्यंत वाढविण्यात आली आहे. मुद्रा योजनेंतर्गत महिलांना १४.७२ लाख कोटी रुपयांचे कर्ज वाटप झाले आहे, ज्यातून अनेक महिला उद्योजिकांमध्ये रूपांतरित झाल्या आहेत. हा आर्थिक सक्षमीकरणाचा एक नवा अध्यायच आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. शाळांमध्ये मुलींसाठी राबविलेल्या स्वच्छ विद्यालय अभियानामुळे स्वतंत्र स्वच्छतागृहे उभी राहिली आहेत. यामुळे त्यांना शिक्षणाची वाट आता अधिक सुरक्षित आणि सन्मानाने चालता येण्याजोगी झाली आहे. सोबतच लोकसभा व विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय माता भगिनींच्या नेतृत्वाला नवीन उंचीवर घेऊन जाणारा आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना

चार भिंती, एक छप्पर आणि एक सुरक्षित छोटेसे विश्व! अर्थात आपलं स्वतःचं घर हे सर्वांचे स्वप्न असते; पण देशातील कोट्यवधी गोरगरिबांसाठी हे घर म्हणजे केवळ एक स्वप्न होते. हे स्वप्न वर्षानुवर्षं अपूर्णच राहत होते. याच स्वप्नाला वास्तवात उतरवण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली आवास योजना. मे २०२५ पर्यंत देशात चार कोटींहून अधिक घरे या योजनेंतर्गत उभारण्यात आली आहेत. यामध्ये शहरी भागासाठी प्रधानमंत्री आवास शहरी योजनेंतर्गत एक कोटी १६ लाख ९७ हजार घरांना मंजुरी देण्यात आली असून त्यातील ९३ लाख घरे पूर्णपणे बांधून तयार झाली आहेत. त्याचप्रमाणे ग्रामीण भागासाठी प्रधानमंत्री आवास ग्रामीण योजनेंतर्गत तीन कोटी ७२ लाख ६४ हजार ८२० घरे मंजूर झाली असून त्यातील दोन कोटी ७७ लाख ७४ हजार घरे पूर्णतः बांधली गेली आहेत.

## स्टार्टअप इंडिया

एखादी कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी योग्य मार्गदर्शन, भांडवल आणि यंत्रणेत नव्या विचारांना जागा देऊन 'स्टार्टअप इंडिया'ने हे चित्र पूर्णपणे बदलून टाकले आहे. आज तरुणाईकडे फक्त पदव्या नाहीत, तर स्वतःचा बिझनेस उभा करण्याची ताकद, आत्मविश्वास आणि शासनाचा आधार आहे. मे २०२५ पर्यंत १.७६ लाख स्टार्टअप्सना मान्यता देण्यात आली असून, यापैकी ११८ स्टार्टअप्स 'युनिकॉर्न' म्हणजे हजारो कोटींची उलाढाल करणारे उद्योग! जानेवारी २०२५ अखेरपर्यंत १६.६ लाख नोकऱ्या स्टार्टअप्समुळे निर्माण झाल्या आहेत. केवळ २०२२ मध्येच २६.५ हजारांहून अधिक स्टार्टअप्सना मान्यता देण्यात आली. तांत्रिक स्टार्टअप्समुळे २३ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार २०१७ ते २०२१ या काळात निर्माण झाले, असे नॅसकॉमच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या योजनेमुळे आता युवक 'नोकरी मागणारे' नव्हे, तर 'नोकरी देणारे' बनत आहेत.

कधी काळी दुर्गम भागातील गावापर्यंत पोहोचणारा रस्ता म्हणजे केवळ स्वप्न वाटायचे. पावसाळ्यात चिखलात अडकलेली गाडी, रस्त्यांच्या अभावामुळे रुग्णवाहिकेसाठी होणारा विलंब आणि शिक्षणासाठी मैलोन्‌मैल चालणारी पावले ही सर्व परिस्थिती गेल्या दशकात झपाट्याने बदलली आहे. रस्ते केवळ गावे जोडत नाहीत, ते आर्थिक विकास, शिक्षण, आरोग्य आणि संधी याचे दार उघडतात.

गेल्या १० वर्षांत साधारण ३.९६ लाख किलोमीटर लांबीचे ग्रामीण रस्ते उभारण्यात आले असून या रस्त्यांनी दूरवरच्या खेड्यांना शहराशी जोडत, विकासाची वाट खुली केली आहे. त्याचबरोबर गेल्या ५ वर्षांत ३,६०० किलोमीटर लांबीचे हायस्पीड कॉरिडोर्स बांधले गेले, जे उद्योग, व्यापार आणि दैनंदिन वाहतुकीच्या गतीला नवे पंख देत आहेत. भारताच्या अभियांत्रिकी क्षमतेची किमया म्हणजे 'अटल टनेल'. जगातील सर्वाधिक लांबीचा बोगदा (१०,००० फूट) खोदला आणि भारताने जगासमोर आपली तांत्रिक ताकद अधोरेखित केली. मुंबईतील अटल सेतू आणि कोस्टल रोड यांसारख्या प्रकल्पांनी लाखो वाहनचालकांचा वेळ वाचवला. या अटल सेतुमुळे ज्यातून वाहतुकीचा वेग आणि कार्यक्षमता प्रचंड वाढली आहे.

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे तर संधी, स्वप्नं आणि स्वतःचं आयुष्य घडवण्याची ताकद! भारतातील कोट्यवधी विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण ही एक दूरची गोष्ट वाटायची; पण गेल्या काही वर्षांत देशात शिक्षण क्षेत्रात झालेली क्रांती ही नव्या युगाच्या भारताची पायाभरणी करणारी आहे. देशात आता केवळ 'शिकणे' नाही, तर 'उत्कृष्टतेकडे वाटचाल' सुरू झाली आहे. २०१४ नंतर आठ नव्या आयआयएम (व्यवस्थापन शास्त्र) संस्थांची स्थापना झाली. देशातील एम्स संस्थांची संख्या तीनपट वाढून आता २३ झाली आहे, जो आरोग्य शिक्षणाच्या क्षेत्रातील ऐतिहासिक टप्पा आहे. २०१४ पर्यंत १६ आयआयटी होत्या. आता सात नवीन आयआयटी सुरू करण्यात आल्या आहेत. जे भविष्यातील तंत्रज्ञ व संशोधक घडवत आहेत. इतकंच नव्हे, तर देशभरात अंदाजे ५७० नव्या विद्यापीठांची स्थापना करण्यात आली आहे. यामुळे उच्च शिक्षणाची दारे ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थ्यांसाठीही खुली झाली आहेत. वैद्यकीय शिक्षणाच्या जागांची संख्याही दुपटीहून अधिक झाली आहे. २०१४ मध्ये ५१ हजार ३४८ जागा होत्या, त्या वाढून १ लाख १८ हजार १८९ वर पोहोचल्या आहेत. ही प्रगती नवभारताच्या उज्ज्वल भविष्याची नांदी आहे.

## डिजिटल सशक्तीकरण

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेली 'डिजिटल इंडिया' ही केवळ तांत्रिक नव्हे, तर विश्वासाची क्रांती ठरली. डीबीटी (Direct Benefit Transfer) मुळे केंद्र शासनाच्या योजना आता थेट गरजूंच्या बँक खात्यात पोहोचू लागल्या. आजपर्यंत ४४ लाख कोटी रुपये थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. यामुळे केवळ पारदर्शकता वाढली नाही, तर ३.४८ लाख कोटी रुपयांची सरकारी बचतही झाली




आहे. २०१४ मध्ये भारत एक रोख व्यवहारप्रधान अर्थव्यवस्था असलेला देश २०१६ मध्ये युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (UPI) सुरू झाल्यानंतर मोठ्या शहरांपासून ते छोट्याशा गावातला चहावालासुद्धा डिजिटल व्यवहार करू लागला आहे. आज सामान्य नागरिक बँकेच्या रांगेत न उभा राहता मोबाइलवरून पैसे पाठवतो, अनुदान मिळवतो, व्यवसाय वाढवतो हीच तर खरी 'डिजिटल सशक्तीकरण' आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुतार, लोहार, मेस्त्री, शिल्पकार, चटई-झाडू-टोपल्या बनवणारे; तसेच लघुउद्योग करणारे अशा १८ प्रकारच्या पारंपरिक कामगारांना प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेंतर्गत तीन लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जात आहे. मे २०२५ पर्यंत २९ लाख ९० हजार ५८३ कारागिरांना हे कर्ज मंजूर झाले असून दोन कोटी ७० लाखांहून अधिक कारागिरांनी नावनोंदणी केली आहे.

प्रधानमंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर केंद्र शासनाच्या वतीने पहिल्या १०० दिवसांत पायाभूत सुविधा विकासाचे तीन लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू करण्यात आले. त्यात महाराष्ट्रातील वाढवण बंदराचा समावेश आहे. आजवर कधीच रस्त्याने जोडली गेली नाहीत, अशी २५ हजार गावे रस्त्याने जोडण्याची ४९ हजार कोटी रुपयांची योजना सुरू करण्यात आली आहे. मध्यमवर्गाचे १२ लाख रुपयेपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करणे, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ७५ हजार नव्या जागा वाढवणे, बासमती तांदळावरील निर्यात मूल्य हटवणे, खरीप पिकांचे आधारभूत मूल्य १०० ते ५५० रुपयांपर्यंत वाढवणे, तरुणांसाठी दोन लाख कोटींचे पॅकेज, भांडवली खर्च ११ लाख ११ हजार कोटी रुपयापर्यंत वाढवणे, आयुष्मान वय वंदना योजनेतून ७० वर्षांपुढील नागरिकांना पाच लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत देणे यांसारख्या अनेक निर्णयातून केंद्र शासनाच्या सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाच्या निर्धाराची प्रचिती येत आहे.

आजचा भारत बळकट सैन्य, आधुनिक शिक्षण, डिजिटल अर्थव्यवस्था, जागतिक मंचावर आत्मविश्वासाने उभा राहणारा युवा वर्ग आणि सर्वात महत्त्वाचे गरिबांच्या चेहऱ्यावर उमटलेला आशेचा प्रकाश याचे सुंदर प्रतिबिंब आहे. या शासनाची ११ वर्ष म्हणजे एक विश्वासाचा काळ आहे, जिथे शासन जनतेबरोबर भक्कमपणे उभे आहे. मागील ११ वर्षांत भारताने अमर्याद विकास गाठला आहे. या केंद्र शासनाने राबविलेल्या अनेक योजना हे दर्शवतात की, हे शासन सामान्य जनतेचा विचार करणारे आहे. त्याच्या प्रत्येक शब्दामागे कृती आहे. त्या कृतीतून माणसांच्या आयुष्यात बदल घडवत आहे.

(उपसंचालक (वृत्त))

जागतिक पर्यावरण दिन २०२५च्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या वतीने राज्यात पर्यावरण रक्षणासाठी एकल प्लास्टिकविरोधी अभियान मोहीम राबविण्यात आली. यामध्ये एकल वापर (सिंगल यूज) प्लास्टिकच्या वापराविरोधात जनजागृती, प्लास्टिक निर्मूलन स्वच्छता मोहीम, पर्यावरण रक्षणासंदर्भात धोरणात्मक विचारमंथन आणि लोकसहभागाने उपक्रम राबवण्यावर भर देण्यात आला. या संपूर्ण उपक्रमाचे नेतृत्व राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

# प्लास्टिकमुक्तीच्या दिशेने!

**नंदकुमार वाघमारे**

पर्यावरण दिनानिमित्त ५ जून रोजी मंत्रालयात पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात मंत्रालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी एकल वापर प्लास्टिक टाळण्याचा संकल्प केला. यावेळी कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले आणि सरकारी कामकाजात पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करण्यासाठी ठोस पावले उचलण्याचा निर्धार करण्यात आला. मंत्रालयात सुरू केलेल्या एकल वापरातील प्लास्टिकच्या विरोधातील या मोहिमेद्वारे एक प्रभावी संदेश दिला. 'मला शाल-श्रीफळ नको... त्याऐवजी मला ११ कापडी पिशव्या द्या!,' असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

मंत्रालयातील प्रत्येक विभाग एकल प्लास्टिकमुक्त झाला पाहिजे, असा प्रयत्न आहे. त्यासाठी मंत्रालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सहभाग घ्यावा, असेही आवाहन त्यांनी केले.

## प्लास्टिकमुक्तीचा संदेश संपूर्ण महाराष्ट्रात नेऊ : मुख्य सचिव

मंत्रालयात राबविण्यात आलेला पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम फक्त उपक्रम नसून हा एक जनसंदेश आहे. मंत्रालयात साडेनऊ हजार कर्मचारी कार्यरत असून या सर्वांनी एकल वापर प्लास्टिकमुक्तीचा हा संदेश संपूर्ण महाराष्ट्रात न्यावा. 'माझे कार्यालय, माझे घर प्लास्टिकमुक्त' ही फक्त घोषणा नसून त्याच्या अंमलबजावणीसाठी ठोस पावले उचलू या. 'प्लास्टिकमुक्त मंत्रालय' हा संकल्प मनात ठेवून सर्वांनी कागदाचा वापर टाळू व कागदविरहित प्रणाली वापरात आणू, असेही मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी यावेळी सांगितले.

## प्लास्टिक निर्मूलन स्वच्छता मोहीम

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ जून रोजी गिरगाव चौपाटीवर सकाळी प्लास्टिक निर्मूलन स्वच्छता मोहीम पार पडली. त्यावेळी 'आपण सर्वांनी सिंगल यूज प्लास्टिक वापरणे थांबवले पाहिजे आणि त्याचे पूर्णतः निर्मूलन केले पाहिजे. अशा प्लास्टिकला पर्यायी उपाय शोधण्याचे आणि पुनर्वापराचे प्रयत्न सुरू आहेत. अनेक संस्था व ट्रस्ट या उपक्रमात हातभार लावत आहेत,' असे मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले.

या प्लास्टिक निर्मूलन स्वच्छता मोहिमेत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, बृहन्मुंबई महापालिकेचे सफाई कर्मचारी, तसेच विद्यार्थ्यांनी एकत्र येत समुद्रकिनारा प्लास्टिकमुक्त केला. या अभियानामध्ये स्थानिक नागरिक, सफाई कर्मचारी, स्वयंसेवी संस्था आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. जोशी-बेडेकर कॉलेज, मुक्ताई सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट आणि अन्य संस्थांनी सहभाग घेतला. यावेळी पथनाट्य, घोषणाबाजी व चौपाटी स्वच्छता अशा माध्यमातून प्लास्टिकविरोधी जनजागृती केली.



## राज्यव्यापी पर्यावरण परिषदेतून धोरणात्मक दिशा

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बांद्रा येथे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या विद्यमाने राज्यस्तरीय पर्यावरण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे आदी यावेळी उपस्थित होते.

नागरिकांनी पर्यावरण संवर्धनाची सुरुवात स्वतःपासून करावी, असे आवाहन मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

पर्यावरणाचे रक्षण व संवर्धनाचा विचार गावागावांत पोहोचवण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग पर्यावरण विभागासोबत काम करेल, अशी ग्वाही सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी यावेळी दिली.

महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम म्हणाले की, एकल प्लास्टिक वापर कमी करण्यासाठी जनतेची साथ आवश्यक आहे.

राज्यात वातावरणीय बदलामुळे होणारे विविध परिणाम लक्षात घेता, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग पर्यावरणविषयक




श्रीमती मुंडे यांनी प्लास्टिक प्रदूषणावर धोरणात्मक कृती या विषयांवर भाष्य करत, शहरी व ग्रामीण भागातील एकल वापरातील प्लास्टिकबंदीच्या उपायांचे महत्त्व विषद केले. त्यासोबतच शाश्वत विकास व रोजगार निर्मितीचा समतोल राखणे गरजेचे असून रिड्यूस, रिसायकल, रियूज या त्रिसूत्रीवरदेखील त्यांनी भर दिला.

एकल वापरातील प्लास्टिक हा असूर असून त्याला पूर्णतः नष्ट करण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या माध्यमातून कार्य करत आहोत. या कामात जनतेचा सहभाग आवश्यक आहे. यासाठी

विविध अधिनियमांच्या अंमलबजावणी बरोबरच विविध उपाययोजना राबवत असल्याचे विभागाच्या सचिव जयश्री भोज यांनी सांगितले.

राज्यव्यापी पर्यावरण परिषदेत अनेक तज्ज्ञांनी सहभाग घेतला. या परिषदेत शहरी नियोजन ते घरगुती जीवनातील पर्यावरणीय वस्तूंचा समावेश यापर्यंतचा एक समग्र आणि दीर्घकालीन धोरणात्मक आराखडा सादर केला गेला. यामुळे महाराष्ट्रातील पर्यावरण संवर्धनाला नवीन गती मिळणार आहे.

## वातावरणीय बदल कृतिआराखडा व महापर्यावरण ॲपचे अनावरण

महाराष्ट्र राज्य वातावरणीय बदल कृती आराखडा, माझी वसुंधरा अभियान ६.० टूल किट; तसेच सल्फरडाय ऑक्साईड इमिशन ट्रेडिंग स्किमच्या संकल्पनेचे अनावरण करण्यात आले. प्रदूषणासंदर्भातील तक्रारींसाठी तयार करण्यात आलेल्या 'महा पर्यावरण' ॲप्लिकेशनचे अनावरणही मंत्री श्रीमती मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

## धार्मिक स्थळांवर एकल प्लास्टिकविरोधात जनजागृती

राज्यातील विविध संस्था तसेच धार्मिक स्थळांवर जाऊन पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी स्वतः 'एकल प्लास्टिक वापरबंदी' व प्रदूषणाबाबत जनजागृती अभियानात सहभाग घेतला. त्यांनी पुण्यातील दगडूशेठ गणपती, मुंबईतील सिद्धीविनायक मंदिर, परळीतील वैजनाथ मंदिर, तुळजापुरातील श्री तुळजाभवानी माता मंदिर, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ मंदिर, गाणगापूर येथील श्री गजानन महाराज मंदिर आदी धार्मिक स्थळांवर जाऊन तेथील मंदिर परिसरातील दुकानदारांशी संवाद साधला व प्लास्टिक न वापरण्याचे आवाहन केले. यावेळी व्यापाऱ्यांना मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात येत असलेले हे अभियान एक भावनिक आणि धोरणात्मक एकात्मतेचे उदाहरण ठरत आहे. एकल वापर प्लास्टिकमुक्त राज्य घडवण्यासाठी शासन, संस्था आणि नागरिकांनी मिळून पुढाकार घेतल्यामुळे ही चळवळ लोकचळवळ बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

जागतिक पर्यावरण दिन २०२५चे हे आयोजन म्हणजे केवळ एक कार्यक्रम नसून, पर्यावरणपूरक भविष्यासाठीची एक ठोस आणि प्रेरणादायी सुरुवात आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**(सहायक संचालक (माहिती))**

**महाराष्ट्र राज्याची भौगोलिक विविधता, बदलते हवामान आणि वाढते शहरीकरण यामुळे गेल्या काही वर्षांत महाराष्ट्र राज्याने विविध आपत्तींचा सामना केला आहे. या आपत्तींमुळे जनजीवन प्रभावित झाले असून, त्याचा एकूण आर्थिक व्यवस्थेवरदेखील परिणाम झाला आहे. भविष्यात नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींमुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी शासनाद्वारे विविध स्तरावर उपक्रम राबविण्यात येत आहेत.**

# आपत्कालीन परिस्थितीसाठी शासनाचे प्रभावी नियोजन

**सतीशकुमार खडके,** संचालक

आपत्ती म्हणजे अशी घटना की ज्यामुळे प्रभावित परिसरातील जनजीवन, पर्यावरण आणि मालमत्तेची हानी होते. त्यामुळे एकूण समाजव्यवस्था, संपर्क, दळणवळण कोलमडून पडते व स्थानिक जनता या परिस्थितीचा मुकाबला करण्यास असमर्थ असते. नैसर्गिक आणि मानवनिर्मित असे दोन मुख्य प्रकार आपत्तीमध्ये येतात. यामध्ये भूकंप, चक्रीवादळ, वीज कोसळणे, पूर, अतिवृष्टी, समुद्राचे उधाण, ढगफुटी या सारख्या आपत्तींचा समावेश नैसर्गिक आपत्तीमध्ये होतो, तर मानवनिर्मित आपत्तीमध्ये युद्ध, प्रदूषण, अणुस्फोट, आग, धोकादायक पदार्थांचा संपर्क, स्फोट आणि वाहतूक अपघात यांचा समावेश होतो.

## आपत्ती व्यवस्थापन म्हणजे...

आपत्ती व्यवस्थापनामध्ये आपत्ती सौम्यीकरण, पूर्वतयारी क्षमता बांधणी, प्रतिसाद आणि मदत, पुनर्प्राप्ती आणि पुनर्बांधणी हे चार प्रमुख टप्पे आहेत. हे सर्व टप्पे आपत्तींचे नियोजन, प्रतिसाद आणि त्यातून सावरण्याची एक सतत प्रक्रिया दर्शवतात. ज्यामध्ये प्रत्येक टप्पा मागील टप्प्यावर आधारित असतो.

आपत्ती व्यवस्थापन हे केवळ धोका ओळखणे किंवा नुकसानभरपाईपुरते मर्यादित नसून तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी क्षमता निर्माण करणे, आपत्तीमुळे होणारी हानी टाळण्यासाठी विविध उपाययोजना राबवणे, आपत्तीनंतर विस्कळीत झालेले जनजीवन पूर्वपदावर आणणे यांचाही समावेश होतो. राज्यामध्ये या सर्व स्तरांवर विविध उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत.




## संस्थात्मक संरचना

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये आपत्ती व्यवस्थापनाची संस्थात्मक संरचना चार स्तरावर केली आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे (NDMA) अध्यक्ष हे प्रधानमंत्री, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे (SDMA) अध्यक्ष राज्याचे मुख्यमंत्री, तर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे (DDMA) अध्यक्ष जिल्हाधिकारी असतात. या प्राधिकरणाद्वारे आपत्तीचे स्वरूप आणि तीव्रतेनुसार विविध यंत्रणांशी समन्वयाने कार्य केले जाते.

## आधुनिक यंत्रणेसह सुसज्ज राज्य आपत्कालीन केंद्र

राज्यस्तरावर आपत्कालीन परिस्थितीमध्ये विविध यंत्रणांशी समन्वय साधून आणि त्या अनुषंगाने शीघ्र प्रतिसाद देण्यासाठी राज्य आपत्कालीन कार्य केंद्र हे कार्य करते. मुख्यमंत्री यांच्या हस्ते ८ एप्रिल २०२५ रोजी अद्ययावत राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे उद्घाटन करण्यात आले आहे. अद्ययावत राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामध्ये आपत्तीचा प्रकार, तीव्रता व व्याप्तीनुसार शासकीय व इतर यंत्रणांशी समन्वय साधून संसाधन व आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य व तत्पर वापर केला जातो. API Integration द्वारे आपत्तीच्या पूर्वसूचना देणाऱ्या भारतीय हवामान विभाग (IMD), राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्र (NCS), राष्ट्रीय जल आयोग (CWC), इंडियन नॅशनल सेंटर फॉर ओशन इन्फॉर्मेशन



सर्व्हिसेस (INCOIS), Mahavedh या सारख्या यंत्रणांकडून (API Integration) राज्य आपत्ती कार्यकेंद्रास Real Time Alert मिळतात. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे विकसित करण्यात आलेल्या सचेत ॲप्लिकेशनच्या माध्यमातून वेळोवेळी आपत्तीविषयी पूर्वसूचना एसएमएसद्वारे पाठविल्या जातात.

एखादी आपत्ती घडल्यानंतर राज्य आपत्कालीन कार्य केंद्राद्वारे विविध यंत्रणा उदा. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF), राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF), विविध शासकीय यंत्रणा उदा. सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, पोलीस, अग्निशमन यंत्रणा, स्थानिक पातळीवरील प्रतिनिधी आणि स्वयंसेवक यांच्याशी समन्वय साधला जातो.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामध्ये विविध यंत्रणांशी अविरत संवाद आणि समन्वय साधण्यासाठी दूरध्वनी, पोलीस वायरलेस हॉट लाइन, सॅटेलाइट फोन, HAM Radio, Social Media यासारखी विविध आधुनिक संवाद साधने सुसज्ज आहेत. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्तीच्या तीव्रता व व्याप्ती पाहता आपत्तीची श्रेणी अंतर्गत प्रतिसादाची आखणी करून तत्सम प्रतिसाद यंत्रणांना पाचारण केले जाते. याच पार्श्वभूमीवर जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्राचेही अद्ययावतीकरण विभागांमार्फत करण्यात येणार आहे.

## राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलांना पूर्वतैनात करणे

मागील काही वर्षांच्या अनुभवांवरून पूरप्रवण आणि दरडप्रवण भागासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) यांना पूर्वतैनात करण्यात येते. त्यामुळे अशा भागात तत्काळ मदतकार्य करण्यास अधिक सुलभ होते. तसेच स्थानिक पातळीवर सर्व यंत्रणांची क्षमता अधिक वृद्धिंगत होण्यासाठी वेळोवेळी आपत्ती संबंधित प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो.



## आधुनिक शोध व बचाव साहित्य पुरवठा

विभागाद्वारे सर्व संबंधित राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, यंत्रणाना आधुनिक शोध व बचावाचे साहित्य उदा. तात्पुरते निवारा केंद्र (टेंट), IRB Boat, लाइफ जॅकेट, फायर बाइक अशा विविध साहित्याचा पुरवठा आणि त्याच्या वापरासंबंधित प्रशिक्षण देऊन यंत्रणांची आपत्तीमध्ये शीघ्र प्रतिसाद देण्याची क्षमता वाढविण्यात आली आहे.

## मान्सूनपूर्व आढावा

आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाद्वारे राज्यस्तरावर आणि जिल्हास्तरावर जिल्हाधिकारीद्वारा मान्सून पूर्व तयारी अंतर्गत सर्व विभाग आणि यंत्रणांचा आढावा दरवर्षी घेतला जातो. या वर्षीची मान्सूनपूर्व तयारीची राज्यस्तरीय आढावा बैठक २१ मे २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. मान्सून पूर्व आढावा बैठकीमध्ये पुरामुळे प्रभावित होणाऱ्या गावांची माहिती संकलित करून त्यांना आवश्यक खबरदारी घेण्याचे निर्देश वेळोवेळी दिले जातात. विविध आपत्तीनुसार नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी याबाबत सातत्याने विविध माध्यमांद्वारे जनजागृती करण्यात येते. उदा. गडचिरोली, कोल्हापूर सारख्या पूरप्रवण जिल्ह्यांमध्ये गरोदर स्त्रियांचे, आजारी व्यक्तींचे स्थलांतर सुरक्षित ठिकाणी प्राधान्याने केले जाते. पूरप्रवण भागात मान्सून कालावधीसाठी आगाऊ रेशन दिले जाते. त्यामुळे vulnerable घटकांना मदत होते. आपत्ती व्यवस्थापन आराखड्यामध्ये या सर्व बाबींचा समावेश केला जातो.

## आपत्तीत शून्य मृत्यू उद्दिष्ट गाठणे

प्रधानमंत्री यांच्या दहा कलमी कार्यक्रमांतर्गत आपत्ती जोखीम व्यवस्थापनात स्थानिक क्षमता आणि उपक्रमांची उभारणी आणि विशेषकरून महिलांचे नेतृत्व निर्माण करण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला आहे. मागील काळामध्ये २० जिल्ह्यांमध्ये ७,९०० आपदा मित्रांना प्रशिक्षित करण्यात आले होते. या वर्षी उर्वरित १६ जिल्ह्यांमध्ये ५,४०० आपदा मित्रांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच आपदा मित्रांना आधुनिक शोध व बचाव संबंधित व्यक्तिगत कीट आणि विमा सुरक्षा देऊन अधिक सक्षम करण्यात आले आहे. हे आपदा मित्र वेळोवेळी स्थानिक पातळीवरील बचाव कार्यात सहभागी झाल्यामुळे तत्काळ प्रतिसाद देण्यास अधिक सुकर झाले आहे.

याबरोबरच २० जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय कॅडेट कॉर्प, भारत स्काऊट आणि गाईड, नेहरू युवा केंद्र यांच्या १८ ते ४० या वयोगटातील १९,९३० स्वयंसेवकांनादेखील युवा आपदा मित्र अंतर्गत प्रशिक्षित करण्यात येणार आहे.

विभागाद्वारे पहिल्या टप्प्यात एक हजार आपत्तीप्रवण गावांसाठी आपत्ती व्यवस्थापन कीट देण्यात आल्या आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर प्रतिसाद देण्यासाठी अधिक मदत मिळेल.

## आपत्ती सौम्यीकरण

आपत्तीमुळे होणारी जीवित व वित्तीय हानी टाळण्यासाठी आपत्ती सौम्यीकरणाचे २८८ प्रकल्प कोकण भागात आणि १,३८८ प्रकल्प उर्वरित महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. यामध्ये धूप व खार प्रतिबंधक बंधारे, बहुउद्देशीय निवारा केंद्र, भूमिगत विद्युत वाहिनी, दरड व पूर प्रतिबंधक कामे इत्यादींचा समावेश आहे.

## मुंबईसाठी खास तयारी

मुंबई महानगरपालिकेद्वारे पूरप्रवण व दरडप्रवण क्षेत्रांची माहिती संकलित करून संबंधित उपाययोजना राबवत आहेत. यामध्ये होल्डिंग टँक तयार केले आहेत. दरडप्रवण भागात दरड प्रतिबंधक कामे सुरू आहेत. तसेच मुंबई महानगरपालिकेने संवाद चाचण्या आणि यंत्रणांची सज्जता सुनिश्चित केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका व राज्य आपत्कालीन कार्य केंद्र एकत्रितपणे नागरिकांना वेळोवेळी सतर्कतेच्या सूचना देतात.

## अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था (NIDM) आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे (NDMA) आपत्तीशी निगडित विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. यासाठी विभागाद्वारे अधिकाऱ्यांचे नामनिर्देशन केले जाते. आपत्ती व्यवस्थापन आणि विविध मॉक ड्रिल विविध स्तरावर आयोजित केले जातात. नजीकच्या काळात, राज्यात आपत्ती व्यवस्थापनाशी निगडित विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था (SIDM) नागपूर येथे स्थापन करण्यासाठी मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यामुळे भविष्यात सर्व स्तरावर आपत्तीविषयी प्रशिक्षण देण्यास चालना मिळेल. राज्यामध्ये NDRF आणि SDRF यांच्याकडूनही विविध स्तरावरील अधिकारी आणि नागरिकांची विविध आपत्तींमध्ये घ्यायची काळजी आणि शोध व बचाव कार्याचे प्रात्यक्षिक आयोजित केले जाते. राज्यामध्ये स्थानिक पातळीवर आपदा मित्रांना प्रशिक्षित केले जाते.



## 'सचेत' प्रणालीद्वारे इशारा

सचेत हे ॲप्लिकेशन पूर, भूकंप, चक्रीवादळ, वीज कोसळणे, उष्मालाट यांसारख्या विविध नैसर्गिक आपत्तींबद्दल रिअल टाईम, जिओ-टॅग केलेले अलर्ट प्रदान करते. यामुळे नागरिकांना आपल्या भागातील संभाव्य आपत्तीची पूर्वसूचना तत्काळ एसएमएसद्वारे मिळते. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना वेळीच पूर्वसूचना मिळाल्यामुळे त्यांना योग्य खबरदारी घेता येऊन संभाव्य हानी टाळता येते. प्रधानमंत्री यांनी आपल्या 'मन की बात' या २७ एप्रिल २०२५ रोजीच्या कार्यक्रमामध्ये कोणत्याही आपत्तीमध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे की, स्वत:ला सुरक्षित ठेवणे. सचेत ॲप्लिकेशनचा नागरिकांनी जास्तीत जास्त वापर करावा, असेही आवाहन त्यांनी केले.

## नागरिकांना आवाहन

राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामध्ये विविध आपत्तीविषयी माहिती संकलित केली जाते. यामध्ये प्रामुख्याने असे आढळून येते की, आपल्या राज्यात मोठ्या प्रमाणावर वीज कोसळल्यामुळे व्यक्ती आणि जनावरांचा मृत्यू झाला आहे. वीज पडून होणारे मृत्यू टाळण्यासाठी नागरिकांना 'दामिनी' या ॲप्लिकेशनचा जास्तीत जास्त वापर करावा. 'दामिनी' ॲप्लिकेशनद्वारे ज्या क्षेत्रांमध्ये वीज कोसळणार आहे, त्याविषयी पूर्वसूचना दिली जाते. त्यामुळे नागरिक स्वत:ला तसेच जनावरांना सुरक्षित ठिकाणी म्हणजे जेथे वीज कोसळण्याची शक्यता कमी आहे, अशा ठिकाणी ठेवू शकतील. तसेच झाडांखाली आसरा घेणे टाळावे.

आता पावसाळा सुरू झाला आहे. सोशल मीडियामुळे नागरिक धबधबे, नदी, ओढे या ठिकाणी जातात, पुरेशी सावधगिरी न बाळगल्यामुळे अपघात घडतात. अशा ठिकाणी जाताना नागरिकांनी सावधानता बाळगून निसर्गसौंदर्याचा आनंद घ्यावा.

आपत्तीसंदर्भात मदतीसाठी हेल्पलाइन ११२, १०७०, राज्य नियंत्रण कक्षाला संपर्क ०२२-२२०७९९०, ०२२-२२७९४२२९, ९३२१५८७१४३, ई-मेल - controlroom@maharashtra.gov.in करावा.

आपत्तीचे व्यवस्थापन हे केवळ शासनाचे नाही, तर प्रत्येक नागरिकाचे सामूहिक कर्तव्य आहे. महाराष्ट्र राज्याने आपत्तीमध्ये 'शून्य मृत्यू'चे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आपत्ती व्यवस्थापनाची एक सशक्त आणि तंत्रज्ञानावर आधारित यंत्रणा उभारली आहे. आपत्ती कमी करणे, सज्जता, शीघ्र प्रतिसाद आणि दीर्घकालीन पुनर्प्राप्ती ही चतु:सूत्री आपण सर्वांनी मिळून प्रभावीपणे राबवून आपत्तीवर मात करू या.

**शब्दांकन : एकनाथ पोवार,**
(विभागीय संपर्क अधिकारी)

**राज्यातील पॉलिटेक्निक संस्थांमध्ये प्रवेशप्रक्रिया सध्या सुरू आहे. विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद, अभ्यासक्रमातील बदल, उद्योगाभिमुख शिक्षण आणि नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP २०२०) होणारे नवसंवर्धन याबाबत तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर यांच्याशी साधलेला संवाद.**

# उद्योगाभिमुख अभ्यासक्रम

**डॉ. विनोद मोहितकर,** तंत्रशिक्षण संचालक



दहावीचा निकाल लागल्यानंतर २० मे पासून डिप्लोमा प्रवेशासाठी नोंदणी सुरू झाली. १० जूनपर्यंत सुमारे ९८ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षी ही संख्या १.०८ लाख होती. या वर्षी ती १.१० लाखांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. प्रवेशप्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन असून अर्ज भरणे, मेरिट लिस्ट, ऑप्शन फॉर्म आणि CAP राऊंडद्वारे प्रवेश निश्चित केला जातो. यावर्षीदेखील तुलनेने मागणी जास्त असणार आहे.

## प्रवेशप्रक्रियेतील नवे बदल

मागील वर्षी तीन CAP राऊंड होते, परंतु काही विद्यार्थी जागा वाटप होऊनही शेवटपर्यंत प्रवेश घेत नाहीत. जागा ब्लॉक होते; तसेच अधिकाधिक विद्यार्थ्यांना कॅपच्या फेरीचा फायदा व्हावा, या बाबी लक्षात घेता यंदा चार CAP राऊंड ठेवण्यात आले आहेत. पहिल्या राऊंडमध्ये गुणवत्तेनुसार मिळालेला पर्याय बंधनकारक असेल, तर दुसऱ्या राऊंडमध्ये पहिल्या तीन पर्यायांपैकी एक पर्याय मिळाल्यास तो बंधनकारक असेल, तर तिसऱ्या राऊंडमध्ये टॉप सहापैकी एक पर्याय बंधनकारक असेल आणि चौथ्या राऊंडमध्ये सर्व पर्याय बंधनकारक असतील, यात मिळालेला पर्याय विद्यार्थ्यांना स्वीकारावा लागेल. या बदलामुळे जास्तीत जास्त प्रवेश CAP राऊंडमधून पूर्ण होतील. यामुळे प्रक्रिया पारदर्शक आणि विद्यार्थ्यांसाठी सोपी झाली आहे.

## ई-स्क्रूटीनी प्रक्रिया कशी आहे?

विद्यार्थ्यांना dte.maharashtra.gov.in संकेतस्थळावर किंवा मोबाइल ॲपद्वारे नोंदणी करता येते.

**कागदपत्र पडताळणीसाठी दोन पर्याय :** फिजिकल स्क्रूटीनी, ई-स्क्रूटीनी (ऑनलाइन अपलोड). उमेदवार ऑनलाइन नोंदणी करून ई-स्क्रूटीनी पद्धतीचा पर्याय निवडू शकतील. या पद्धतीमध्ये उमेदवार कोणत्याही ठिकाणावरून इंटरनेटशी जोडलेल्या संगणक/स्मार्टफोनद्वारे ऑनलाइन अर्ज भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड करतील. तसेच उमेदवाराला अर्जाच्या पडताळणी व निश्चितीसाठी कोठेही प्रत्यक्ष जाण्याची आवश्यकता नाही.

उमेदवाराचा अर्ज व कागदपत्रे सुविधा केंद्राद्वारे (एफसीद्वारे) पडताळले जाऊन निश्चित केले जातील. काही त्रुटी असल्यास ई-मेल अथवा SMS द्वारे सूचना दिल्या जातात. वेबसाईटवरील हेल्पलाइन, समन्वयक, प्राचार्य आणि सुविधा केंद्रांमार्फतही मार्गदर्शन मिळू शकते.

## शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत अभ्यासक्रमातील बदल

डिप्लोमा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून तो चार टप्प्यांमध्ये विभागलेला आहे. बेसिक नॉलेज, प्रॅक्टिकल व ॲप्लिकेशन बेस्ड शिक्षण, सॉफ्ट स्किल्स व सर्वांगीण विकास, उद्योगातील ट्रेंड्सवर आधारित मार्गदर्शन ५० टक्के अभ्यासक्रम स्किल-बेस्ड आहे. १२ आठवड्यांची इंटर्नशिप अनिवार्य आहे.

केंद्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय (MeitY) सोबत सामंजस्य करार केलेला असून या करारांतर्गत राज्यातील शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अद्ययावत सुविधायुक्त



उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत. शिक्षण फक्त वर्गखोल्यांपुरते मर्यादित न राहता, आता क्लासरूमबाहेरचे शिक्षण अधिक प्रभावी बनले आहे.

### विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्यांचा लाभ

आठ लाखांपेक्षा कमी कौटुंबिक आर्थिक उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते.

- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
- डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

मुलांना ५० टक्के शिक्षण शुल्क व ५० टक्के परीक्षा शुल्क शिष्यवृत्ती मिळते. मागील वर्षापासून मुलींना मोफत शिक्षण म्हणजेच १०० टक्के शिक्षण शुल्क व १०० टक्के परीक्षा शुल्क माफ आहे. त्यामुळे मागील वर्षापासून विद्यार्थिनींची प्रवेश घेण्याची संख्या वाढलेली आहे.

### K-स्कीम म्हणजे काय?

मंडळाच्या K-स्कीममध्ये मुख्यत्वे SCES (Skilling, Career, Employability Self-learning) या घटकांचा विचार करून अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्वतः शिकण्याची सवय लागावी यावर भर दिला जाऊन शिक्षक मार्गदर्शक आणि मूल्यांकनकर्ते असतील. यामध्ये उद्योगांना गरजेच्या कौशल्यांशी सुसंगत शिक्षण दिले जाते.

### मातृभाषेचा समावेश

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन मराठी व इंग्रजी यांचा समन्वय साधलेला अभ्यासक्रम तयार केला आहे. संस्था व विद्यार्थ्यांना माध्यमाचे स्वातंत्र्य दिले आहे. विद्यार्थी व संस्थांना पर्याय उपलब्ध करून दिला जातो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना फायदा होतो. शिक्षणात मातृभाषेचा आधार घेऊन सहज समजणारे शिक्षण देण्याचा प्रयत्न आहे. यासाठी शैक्षणिक सामग्रीसुद्धा उपलब्ध आहे.



### नोकरीच्या संधी

पदविका उत्तीर्ण झाल्यानंतर अनेक संधी उपलब्ध आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर मागील वर्षी शासकीय तंत्रनिकेतन नागपूर या संस्थेतील तीन विद्यार्थ्यांना व्होल्टास या कंपनीने १.०४ लाख दरमहा पॅकेज देऊ केले आहे. या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाली आहे. त्याचप्रमाणे काही कंपन्या डिप्लोमाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निवड करून ट्रेनी म्हणून नोकरी देतात. बिट्स पिलानी या संस्थेत पुढील शिक्षणासाठी ३० ते ४० हजार स्कॉलरशिप देत आहे. ही फक्त उदाहरणे असून विद्यार्थ्यांना सर्व ठिकाणी चांगल्या संधी मिळत आहेत. उद्योगधंद्यामध्ये त्यांचे स्वागत केले जात आहेत.

### संस्थांचा दर्जा सुधारण्यासाठी उपक्रम

**फेसलिफ्टिंग उपक्रम :** परिसर व शैक्षणिक वातावरणात बदल, सेंटर ऑफ एक्सलन्सः प्रयोगशाळा व आधुनिक साधनसामग्री उद्योगांच्या सहकार्याने तंत्रनिकेतनमध्ये गुरुकुलसदृश वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न शासनामार्फत NEP २०२० च्या अनुषंगाने करण्यात येत आहेत.

**अभ्यासक्रमात सुधारणा :** दहावी नंतरचा डिप्लोमा म्हणजे रोजगार क्षमता वाढवणारी आणि पुढील शिक्षणाची संधी देणारी अत्यंत उपयुक्त वाट आहे. डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर थेट उद्योगात प्रवेश किंवा पुढील स्नातक अभ्यासक्रमात प्रवेश दोन्ही पर्याय खुले असतात.

### प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना संदेश

लाइफलाँग लर्निंगची प्रेरणा, व्यावसायिक कौशल्ये आणि सामाजिक दक्षता एकत्रितपणे विकसित होते. आजचे शिक्षण हे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित नसून ते विद्यार्थ्यांना उद्योग आणि समाजासाठी उपयुक्त नागरिक बनवण्यासाठी आहे. डिप्लोमा अभ्यासक्रम हे दहावीनंतरचे करिअर सशक्त करणारे व्यासपीठ ठरत आहे.

दहावीनंतर आवश्यक कौशल्ये आत्मसात करून रोजगारक्षमता वाढवणारा त्याचबरोबर शिक्षणाची पुढची संधी उपलब्ध करून देणारा डिप्लोमा हा उत्तम अभ्यासक्रम आहे. विद्यार्थ्यांनी यामध्ये प्रवेश घेऊन आपले व्यक्तिमत्त्व घडवावे आणि राज्याच्या व देशाच्या विकासात हातभार लावावा.

**शब्दांकन : काशीबाई थोरात-धायगुडे,**
(विभागीय संपर्क अधिकारी)

**भारतीय प्रशासकीय सेवेबरोबरच भारतीय वन सेवा ही अतिशय महत्त्वाची मानली जाते. १८६५ मध्ये ब्रिटिशांनी सुरू केलेल्या इंपीरियल फॉरेस्ट सर्व्हिसचा प्रवास आज 'वने, वन्यजीव संरक्षण; तसेच पर्यावरण संवर्धनात महिलांची महत्त्वाची भूमिका' येथपर्यंत येऊन पोहोचला आहे. त्यामुळेच राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख शोमिता विश्वास यांच्या संकल्पनेतून 'वनक्षेत्रातील महिला' या विषयावर ५ व ६ जून रोजी 'वनशक्ती २०२५' या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी या परिषदेचे उद्‌घाटन केले. यावेळी अपर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर उपस्थित होते. तसेच दोन दिवसीय या परिषदेमध्ये वन क्षेत्रात कार्यरत देशाच्या विविध भागांमधील महिलांनी हजेरी लावली होती.**

# महिलांची वनशक्ती

**राजेश येसनकर**

चंद्रपूर येथे वनविभागात कार्यरत असलेल्या महिलांची झालेली राष्ट्रीय परिषद ही उल्लेखनीय परिषद म्हणता येईल. सद्य:स्थितीत राज्याच्या मुख्य सचिव, पोलीस महासंचालक व वनबल प्रमुख या तीन मुख्य पदांवर महिला विराजमान आहेत. तसेच मंत्रालयात मोठ्या प्रमाणात महिला सचिव म्हणून कार्यरत आहेत. महिलांचे वनविभागाच्या क्षेत्रातील यशस्वी योगदान पाहून या दोन दिवसीय कार्यशाळेतून एक नवीन आत्मविश्वास जागृत होण्यास मदत होईल, असे वनमंत्री गणेश नाईक परिषदेच्या उद्‌घाटनाप्रसंगी म्हणाले.

वनविभाग हा एक परिवार असून या परिवारांमधील सर्वांची काळजी घेणे, ही माझी जबाबदारी आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वर्षी १० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये वनविभाग अग्रेसर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच वन विभागाच्या पुढील भरतीमध्ये ५० टक्के भरती महिलांची करण्यात येईल. सध्या जिल्हास्तरावर मानद वन्यजीव रक्षक कार्यरत असून हे पद प्रत्येक तालुक्यात नेमण्यात येईल. तसेच महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या माध्यमातून चांगले प्रकल्प वनविभागात राबविण्यात येणार आहेत. वन विभागाने तीन-चार अधिकाऱ्यांची टीम तयार करून वनांशी संबंधित अभ्यास करण्यासाठी त्यांना विदेशात पाठवावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या. भारतीय वनसेवेत १९८० हे वर्ष महिलांसाठी मैलाचा दगड ठरले. याच वर्षी पहिल्यांदा फक्त तीन महिला अधिकारी भारतीय वनसेवेत दाखल झाल्या होत्या. तेव्हापासून महिलांनी मागे वळून पाहिले नाही. आज देशात आय.एफ.एस. सेवेत महिलांचे कॅडर ३००च्या पुढे गेले आहे. भारतीय वन सेवेच्या अधिकाऱ्यांपासून वनरक्षक, रक्षक, वनपाल, पर्यटक, मार्गदर्शक आणि संरक्षित क्षेत्रांभोवती पर्यावरण विकास आणि वन्यजीव क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून महिला शक्ती उदयास येत आहे. तरीसुद्धा हवामान बदल आणि जैवविविधतेच्या नुकसानामुळे आव्हान अधिक तीव्र होत असताना, वनीकरणात महिलांच्या भूमिका ओळखणे, त्यांना बळकटी देणे, त्यांच्या संवादाला चालना देणे, अनुभवांची देवाणघेवाण करणे आणि धोरणात्मक विकास करणे हे या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट होते.

'वनीकरणातील महिला' या प्रमुख संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात चर्चासत्रांच्या माध्यमातून महिलांच्या



वनक्षेत्रातील अनुभवांची देवाणघेवाण, नेतृत्वातील अडचणींची चर्चा आणि वनक्षेत्रात महिलांच्या सहभागासाठी धोरणात्मक मार्गदर्शन, यावर विशेष भर देण्यात आला. सोबतच महिलांचे वनक्षेत्रातील नेतृत्व, वन्यजीव क्षेत्रातील सहभाग यांसारख्या विषयांवर चर्चा झाली. परिषदेच्या शेवटी महिलांचा वनक्षेत्रातील सहभाग आणि नेतृत्व वाढवण्यासाठी एक धोरणपत्र तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पहिल्या दिवशी ५ जून रोजीच्या चर्चासत्रात पद्मश्री 'बीज माता' राहीबाई पोपेरे, कर्नाटक वन विभागाचे सेवानिवृत्त वनअधिकारी मधू शर्मा, मोहर्लीच्या सरपंच सुनीता काटकर, बांबू क्षेत्रातील सामाजिक उद्योजक मिनाक्षी वाळके सहभागी झाल्या होत्या, तर दुसऱ्या चर्चासत्रात आंध्र प्रदेश वन विभागाचे सेवानिवृत्त विशेषज्ज्ञ प्रधान मुख्य वनसंरक्षक सी. एस. रामलक्ष्मी, तेलंगणा वन विभागाच्या सुनीता भागवत आणि शिवानी डोगरा, केरळ वन विभागाच्या सेवानिवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रकृती श्रीवास्तव, मध्य प्रदेश वन विभागाच्या सेवानिवृत्त अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. गोपा पांडे, तेलंगणा वन विभागाच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि वन दल प्रमुख शोभा रॉयुरू यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी ६ जून रोजी आरईएसक्यू चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष नेहा पंचमिया, गुजरात वन विभागाच्या रेंज फॉरेस्ट ऑफिसर रसिलाबेन वाढेर, मध्य प्रदेश वन विभागातील पन्ना व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालक अंजना तिर्की, पर्यावरण पत्रकार आणि संवर्धन जीवशास्त्रज्ञ बहार दत्त सहभागी झाले होते. दोन दिवसीय 'वनशक्ती २०२५' परिषदेमध्ये जगप्रसिद्ध ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पाची सफारी, श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी बोटॅनिकल गार्डनला भेट देण्यात आली.

चंद्रपुरातील वन अकादमीमध्ये झालेल्या 'वनशक्ती-२०२५' या महिला वनाधिकाऱ्यांच्या राष्ट्रीय परिषदेत वन आणि पर्यावरण संवर्धनासाठी महिला शक्तीचा जागर प्रतिबिंबित झाल्याचे दिसून आले.

**(जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर.)**

# प्रशासनातील नवा टप्पा : ई-मंत्रिमंडळ बैठक

**ब्रिजकिशोर झंवर**

प्रशासनाची गतिमानता वाढवण्यासाठी राज्य शासनामार्फत आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेतली जात आहे. याचाच एक भाग म्हणून २४ जून २०२५ रोजी 'ई-मंत्रिमंडळा'च्या बैठकीचा शुभारंभ झाला. मनुष्यबळ आणि कागदांची मोठ्या प्रमाणात बचत होण्याबरोबरच 'ई-मंत्रिमंडळ' प्रणाली कार्यक्षम आणि पारदर्शक प्रशासनाचा पुढचा टप्पा ठरणार आहे.



उत्तराखंड, उत्तर प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आंध्र प्रदेश आणि त्रिपुरा यांच्यानंतर 'ई-कॅबिनेट' प्रणाली लागू करणारे महाराष्ट्र हे देशातील सहावे राज्य ठरले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या '१०० दिवसांच्या कार्यक्रम' व 'डिजिटल इंडिया' अभियानाच्या अनुषंगाने, शासनाने नागरी सेवा डिजिटल स्वरूपात अधिक प्रभावीपणे पुरवण्याचा संकल्प केला होता. महाराष्ट्राने डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून कागदविरहित (paperless) ई-गव्हर्नन्सच्या दिशेने उल्लेखनीय प्रगती केली आहे.

'ई-ऑफिस', 'सेंट्रल रजिस्ट्री युनिट', 'आपले सरकार' व 'जिल्हास्तरीय सुशासन निर्देशांक' यांसारख्या अनेक प्रणालींमुळे ही प्रगती शक्य झाली आहे. याशिवाय प्रशासन अधिक गतिमान व पारदर्शक करण्यासाठी लिपीक वर्गापासून ते मंत्र्यांपर्यंत ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर शासकीय यंत्रणेतील सर्वच स्तरांवर करण्यात येत आहे. गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व आमदार सभागृहातील कामकाजासाठी टॅबलेटचा वापर करत आहेत. 'ई-मंत्रिमंडळ' प्रणालीमुळे मंत्रिमंडळ बैठकीचे नियोजन, संदर्भ शोधणे, निर्णयांची अंमलबजावणी व त्या अनुषंगाने कार्यपद्धतींचे परीक्षण अधिक सोप्या पद्धतीने करता येणार आहे. बैठकीदरम्यान ठेवण्यात येणाऱ्या अतिरिक्त विषयांचाही या प्रणालीत समावेश करण्यात आला आहे. 'ई-मंत्रिमंडळ' प्रणालीमुळे बैठकीची कार्यसूची व संबंधित विषयांची माहिती एकाच क्लिकमध्ये मंत्रिमहोदयांना उपलब्ध होणार आहे. मागील मंत्रिमंडळ बैठकांचे इतिवृत्तदेखील तत्काळ पाहता येणार आहे. मंत्रिमहोदय मुंबईबाहेर असतानाही माहिती उपलब्ध होणे शक्य झाले आहे. यामुळे त्यांना संबंधित विषयांचा सखोल अभ्यास करून प्रत्यक्ष मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये संबंधित विषयांबाबत प्रभावीपणे चर्चा करता येईल. यासोबतच सर्व माहिती ऑनलाइन असल्यामुळे अपवादात्मक परिस्थितीत मंत्री प्रत्यक्ष बैठकीस उपस्थित नसले तरी देखील त्यांना दूरदृश्यप्रणालीद्वारे मंत्रिमंडळ बैठकीतील चर्चेमध्ये भाग घेणे; तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने दस्तऐवजांची वाचनीयता सुनिश्चित करणे शक्य होईल. ई-मंत्रिमंडळाच्या पूर्वतयारीबाबत मंत्रालयातील सर्व विभागांचे सचिव, सहसचिव, उपसचिव, मंत्र्यांचे खासगी सचिव यांचे एकदिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी सर्वांना मार्गदर्शन करून ही प्रणाली कार्यक्षम, पारदर्शक प्रशासनाचा पुढचा टप्पा आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रशासन व्यवस्थेतील 'मैलाचा दगड' ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

**एका जिल्ह्यातील कोणत्याही भागातील दस्त त्या जिल्ह्यातील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात नोंद करण्याची सुविधा नागरिकांना उपलब्ध झाली आहे. ती राज्यात 'एक जिल्हा एक नोंदणी' या कार्यक्रमाच्या माध्यमातून. यामुळे हे करीत असतानाच गैरप्रकार रोखण्यालादेखील प्राधान्य देण्यात आले आहे.**

# एक जिल्हा : एक नोंदणी!

**ब्रिजकिशोर झंवर**

महसूल विभागाने घेतलेल्या लोकहिताच्या अनेक निर्णयांमुळे राज्य शासनाच्या गतिमान आणि पारदर्शक कामांची प्रचिती येते. यामध्ये प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान, जिवंत सातबारा, नवीन वाळू निर्गती धोरण, दस्त नोंदणीसाठी सलोखा योजना, स्वामित्व योजना, जमिनींचे जिओ टॅगिंग, तुकडेबंदी कायद्यात सुधारणा, पेट्रोल पंपांच्या परवानगीसाठी एक खिडकी योजना आदी विविध योजनांचा समावेश आहे. विभागाच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमामध्ये 'एक राज्य एक नोंदणी' (One State One Registration) हा कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात येऊन जिल्हास्तरावर 'एक जिल्हा एक नोंदणी' या कार्यक्रमाची अंमलबजावणी १ मे २०२५ पासून सुरू करण्यात आली आहे. यामुळे एका जिल्ह्यातील कोणत्याही भागातील दस्त त्या जिल्ह्यातील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीची सुविधा नागरिकांना उपलब्ध झाली आहे. ही सुविधा काही ठरावीक दस्तांसाठी सुरू करण्यात आली आहे.



'एक राज्य एक नोंदणी' (One State One Registration) या कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरावर दस्त नोंदणीचे सामायिक क्षेत्र (Common Jurisdiction) केले आहे. दस्त नोंदणीमध्ये काही गैरप्रकार तसेच अनियमितता होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. यात प्रामुख्याने दस्त नोंदणी करताना बनावट व्यक्तीस उभे करून दस्त नोंदणी करून घेणे, मृत व्यक्तीस जिवंत असल्याचे दाखवून दस्त नोंदणी करून घेणे, शेतकऱ्यांच्या विशेषतः डोंगरी भागातील मोठ्या प्रकल्पांच्या लगतच्या जमिनी शेतकऱ्यांची फसवणूक करून खरेदी व विक्री करणे, एकाच कुटुंबातील मालमत्तेचे हिस्से निश्चित झालेले नसताना एका भावाने कुटुंबातील व्यक्तीचे हिस्से विकणे, सामायिक मालकीच्या इमारतीत एकाच हिस्सेदाराने लीज डीड करणे, रेरा नोंदणीकृत नसणारे बेकायदा बांधकामातील फ्लॅटस व प्लॉट विक्री करणे, ७/१२ वर इतर अधिकारात सरकारचे नाव असताना दस्त नोंदणी करणे, भू-संपादनाचे सरकारी शिक्के पडलेले असताना दस्त नोंदणी करणे, धर्मादाय संस्थाच्या मिळकती विकणे, अशा मिळकती भाड्याने देण्यासाठी धर्मादाय आयुक्त यांची परवानगी आवश्यक असताना विश्वस्तांनी अधिकार नसताना न्यासाच्या मिळकती विकणे अगर भाड्याने देणे, देवस्थानच्या जमिनी पुजारी/गुरव यांच्या नावावर असल्याने त्याचे बेकायदा दस्त करणे, अडाणी व निरक्षर लोकांना धनादेश (Cheque) न देता दस्तामध्ये मोबदला नमूद नसणे, दस्तास योग्य मुद्रांक लावलेला नसणे, कमी मुद्रांक शुल्काचे दस्त नोंदवून शासनाचा महसूल बुडवणे, सहकारी गृहरचना संस्थांच्या जमिनीत साईड मार्जिनची जागा, इमारतीचे कॉमन पार्किंग, व्हिजिटर्स पार्किंग, बेसमेंट, टेरेस विक्रीचे दस्त करणे, विकासक व सोसायटी अध्यक्ष सचिव यांनी विकणे आदी स्वरूपाच्या अनेक तक्रारी वेळोवेळी शासन, महसूल व पोलीस इत्यादी विभागांकडे दाखल होत असतात.



दस्त नोंदणीतील गैरप्रकारांना व अनियमिततेस प्रतिबंध घालण्याकरिता व त्यावर प्रभावी उपाययोजना करण्याकरिता नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिनस्थ सर्व

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ / मुद्रांक जिल्हाधिकारी / सह दुय्यम निबंधक वर्ग-२ / दुय्यम निबंधक यांना शासनामार्फत विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.

यामध्ये प्रामुख्याने दस्त नोंदणी करताना, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ व नोंदणी अधिनियम १९०८ मधील सर्व तरतुदी, महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ व महाराष्ट्र राज्य व केंद्र शासनाचे इतर अधिनियम, नियम; तसेच नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकांतील सूचना व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे. दस्तास कमी मुद्रांक शुल्क आकारणी होणार नाही व शासनाचा महसूल बुडणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. दस्त नोंदणी करताना गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीकडून नागरिक व शेतकरी यांची फसवणूक होणार नाही, याची काळजी घ्यावी. ज्या प्रकरणात नोंदणी अधिनियमातील कलम ८२ व ८३ नुसार कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे निष्पन्न झाल्यास अशा प्रकरणात दोषीविरुद्ध सात दिवसांत गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल. सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्थ दुय्यम निबंधक कार्यालयांची तपासणी करून दर १५ दिवसांनी शासनास अहवाल सादर करावा. याशिवाय दस्त नोंदणीमध्ये होणाऱ्या विविध गैरप्रकारांचे प्रकार, स्वरूप व कार्यपद्धती लक्षात घेऊन प्रभावी उपाययोजना याअंतर्गत करण्यात आल्या आहेत.



नागरिक आणि शेतकरी यांची फसवणूक होणार नाही, याची दक्षता घेऊन त्यांना योग्य लाभ मिळवून देण्याच्या अनुषंगाने या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. या सूचनांचे उल्लंघन केल्यास किंवा सूचनांचे पालन करण्यास टाळाटाळ केल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाईदेखील करण्यात येणार असल्याचेदेखील त्यांनी स्पष्ट केले आहे.

## शेतजमिनीची सलोखा योजना

शेतजमीन हा प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा व संवेदनशील विषय असल्यामुळे त्यातील वादांमुळे कौटुंबिक नात्यांमध्ये एकमेकांबद्दल असंतोषाची भावना व दुरावा निर्माण झाला आहे. या वादांमुळे अनेक पिढ्यांचे नुकसान झाले असून, आजच्या पिढीचाही खर्च व वेळेचा अपव्यय होत असून अशा प्रकारचे वाद संपुष्टात येण्यामध्ये म्हणावी अशी प्रगती झालेला दिसत नाही. यासाठी शासनाने शेतजमिनीचा ताबा व मालकीबाबत शेतकऱ्यांतील आपापसांतील वाद मिटविण्यासाठी व समाजामध्ये सलोखा निर्माण होऊन एकमेकांमधील सौख्य व सौहार्द वाढीस लागण्यासाठी सलोखा योजनेची अंमलबजावणी करत आहे.

महाराष्ट्रामध्ये किंबहुना देशामध्ये जमिनीच्या वादाबाबतची कोट्यवधी प्रकरणे विविध न्यायालयांमध्ये वर्षानुवर्ष प्रलंबित आहेत. त्यामध्ये मुख्यतः मालकी हक्काबाबतचे वाद, शेतबांधावरून होणारे वाद, जमिनीच्या ताब्याबाबतचे वाद, रस्त्याचे वाद, शेतजमीन मोजणीवरून होणारे वाद, अधिकार अभिलेखातील चुकीच्या नोंदीमुळे होणारे वाद, शेतीवरील अतिक्रमणावरून होणारे वाद, शेती वहिवाटीचे वाद, भावा-भावांतील वाटणीचे वाद, शासकीय योजनेतील त्रुटी किंवा प्रस्ताव अमान्यतेबाबतचे वाद इत्यादी कारणांमुळे समाजामध्ये वाद आहेत. शेतजमिनीचे वाद हे अत्यंत क्लिष्ट स्वरूपाचे व गुंतागुंतीचे असल्याने न्यायालय व प्रशासनातील पुरेशा यंत्रणेअभावी हे वाद वर्षानुवर्षे सुरू आहेत.

शेतजमिनीच्या ताबा व मालकीबाबत असणारे वाद जसे, एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनाचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीनधारकांचे अदलाबदल दस्तांसाठी मुद्रांक शुल्क नाममात्र एक हजार रुपये व नोंदणी फी नाममात्र एक हजार रुपये आकारून मुद्रांक शुल्क व नोंदणी फीमध्ये सवलत देण्याची 'सलोखा' योजना राबविण्यास शासनाने जानेवारी २०२३ मध्ये दोन वर्षांसाठी मान्यता दिली होती. या योजनेची मुदत संपल्यानंतर शेतजमिनीचा ताबा व वहिवाटीबाबत शेतकऱ्यांचे आपापसांतील वाद मिटवण्यासाठी व समाजामध्ये सलोखा निर्माण होऊन एकमेकांमधील सौख्य व सौहार्द वाढीस लागण्यासाठी सलोखा योजनेचा कालावधी आणखी दोन वर्षांनी म्हणजेच १ जानेवारी २०२७ पर्यंत वाढविण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

सलोखा योजनेमुळे शेतजमिनीबाबतची दस्त नोंदणी सवलतीमध्ये होत असल्याने या अनुषंगाने निर्माण होणारे वाद संपुष्टात येतील, असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

**इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन व व्यापक प्रमाणावर वापरास या धोरणाच्या माध्यमातून चालना देण्यात येणार आहे. चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांचा विस्तार करीत पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ व ऊर्जा सुरक्षिततेमध्ये योगदान देणाऱ्या शाश्वत आणि नावीन्यपूर्ण परिवहन उपाययोजनांना प्रोत्साहन देण्याचाही समावेश आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या प्रगतीमध्ये महाराष्ट्र राज्याला भारतातील एक आघाडीचे केंद्र म्हणून स्थापित करण्याचा दृष्टिकोनही या धोरणात आहे.**

# ईव्ही युगाच्या दिशेने वाटचाल!

**प्रताप सरनाईक,** परिवहन मंत्री

जागतिक स्तरावर वाहन क्षेत्रात बदलाचे वारे झपाट्याने वाहत आहेत. या बदलांचा देशातील वाहन क्षेत्रातही शिरकाव झाला आहे. कुठलाही अनुकूल बदल अंगीकारून त्यामध्ये आघाडी घेण्याचा महाराष्ट्राचा हातखंडा वाहन क्षेत्रातील बदलांमध्येसुद्धा दिसून आला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या बदलांना मूर्तरूप देण्यासाठी घेतलेले निर्णयही महत्त्वाचे आहेत. या निर्णयांमध्ये एक क्रांतिकारी आणि आमूलाग्र बदल घडविणारा निर्णय म्हणजे महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण राबवण्याचा होय. कार्बन उत्सर्जन कमी करून पर्यावरण संवर्धनासाठी इलेक्ट्रिक वाहन धोरण राबविण्याचा राज्याने घेतलेला हा निर्णय नवीन दिशा देणारा ठरणार आहे.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने २३ जुलै २०२१ रोजी महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ जाहीर केले. या धोरणाच्या अंमलबजावणीचा कालावधी ३१ मार्च २०२५ पर्यंत होता. त्यामुळे १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०३० या पाच वर्षांच्या कालावधीकरिता महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५ लागू केले आहे.



इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन व वापरास व्यापक प्रमाणावर या धोरणाच्या माध्यमातून चालना देण्यात येणार आहे. चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांचा विस्तार करत पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ व ऊर्जा सुरक्षिततेमध्ये योगदान देणाऱ्या शाश्वत आणि नावीन्यपूर्ण परिवहन उपाययोजनांना प्रोत्साहन देण्याचाही समावेश आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या प्रगतीमध्ये महाराष्ट्र राज्याला भारतातील एक आघाडीचे केंद्र म्हणून स्थापित करण्याचा दृष्टिकोनही या धोरणात आहे.

## धोरणाची वैशिष्ट्ये

प्रोत्साहन आणि पायाभूत सुविधांचा विकास करून वाहनांच्या सर्व प्रवर्गात इलेक्ट्रिक वाहनांच्या स्वीकाराला चालना देणे, नावीन्यपूर्ण संशोधनाची आणि कौशल्य विकासाची जोपासना करून महाराष्ट्रातील इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता मजबूत करणे, शहरी व ग्रामीण भागात इलेक्ट्रिक वाहनांच्या सुरळीत परिचालनासाठी (Seamless) चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांची व्यापक उपलब्धतेची खातरजमा करणे, बॅटरीच्या पुनर्चक्रण व पुनर्वापर (Battery Recycle and Reuse) करण्यावर भर देऊन अर्थव्यवस्थेस चालना देणे, वाहनांच्या सायलेन्सरमधून हरितगृह वायूंचे शून्य उत्सर्जन करून स्थानिक हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी बसेस, मालवाहतूक वाहने, शहरी उपयोगिता वाहने, वाहनांचा ताफा, मोठ्या प्रभावी प्रवर्गावर या धोरणात लक्ष केंद्रित करणे, सार्वजनिक वाहतुकीचे विद्युतीकरण करण्यासाठी मोठी क्षमता असलेल्या व अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांवर विशेष भर देणे, ही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

राज्याच्या शहरी व ग्रामीण भागात तसेच महत्त्वाच्या महामार्गांवर इलेक्ट्रिक वाहने सहज उपलब्ध असण्यासाठी संपूर्ण राज्यात इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगचे मजबूत जाळे विकसित करणे, सवलती व धोरणात्मक पाठबळाच्या आधारे इलेक्ट्रिक वाहनांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देणे, इलेक्ट्रिक वाहनांची पुरवठा साखळी मजबूत करणे, बॅटरीच्या विकासनावर लक्ष केंद्रित करणे, बॅटरीचे पुनर्चक्रण आणि त्याच्या घटकांचे उत्पादन करणे, राज्यातील इलेक्ट्रिक वाहनाच्या संशोधन आणि विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी या क्षेत्रात नवकल्पना, कौशल्य व प्रतिभा विकसित करणे, २०३० पर्यंत महाराष्ट्रातील वाहतूक क्षेत्रातून ३२५ टन पीएम २.५ उत्सर्जने आणि १ दशलक्ष टन हरितगृह वायू (GHG) उत्सर्जने रोखण्याचे उद्दिष्टही निश्चित करण्यात आले आहे.

## धोरणाची उद्दिष्टे

उद्दिष्टांनुसार इलेक्ट्रिक वाहनांचे अंतर्वेशन आणि चार्जिंगविषयक पायाभूत सुविधा विकसित करणे आवश्यक आहे. यामध्ये सर्व वाहने ३० टक्के, इलेक्ट्रिक दुचाकी वाहने ( एल १ व एल २) ४० टक्के, इलेक्ट्रिक तीनचाकी वाहने ४० टक्के, इलेक्ट्रिक तीनचाकी मालवाहू वाहने ४० टक्के, इलेक्ट्रिक चारचाकी वाहने ३० टक्के, इलेक्ट्रिक चारचाकी मालवाहू वाहने २५ टक्के, इलेक्ट्रिक चारचाकी



मालवाहू वाहने २० टक्के, राज्य/शहरी परिवहन उपक्रमातील इलेक्ट्रिक बसेस ४० टक्के, खासगी राज्य/शहरी परिवहन उपक्रमातील इलेक्ट्रिक बसेस १५ टक्के, शेतीसाठीचे ट्रॅक्टर आणि एकत्रित कापणी यंत्रे १० टक्के करण्याचे उद्दिष्टे आहे. शासकीय वाहनांच्या ताफ्याचे इलेक्ट्रिक प्रकाराकडे टप्प्याटप्प्याने संक्रमण, ताफ्याचे परिचालक व समुच्चयकांकडून इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार, चार्जिंगविषयक पायाभूत सुविधा, महामार्गांवर दर २५ किलोमिटर अंतरावर चार्जिंग सुविधा निर्माण करण्यात येणार आहे.

## प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना पथकर माफ

या धोरणामुळे मुंबई-पुणे व मुंबई-नागपूर या शहरांच्या दरम्यान शाश्वत परिवहन मार्ग शक्य होणार आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग या महामार्गांवर आणि अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूवर प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना १०० टक्के पथकर माफ करण्यात आला आहे. तसेच राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उर्वरित राज्य मार्गांवर इलेक्ट्रिक वाहनांना पथकर माफी देण्याबाबतचा निर्णय लवकरच घेण्यात येणार आहे.

## चार्जिंगविषयक पायाभूत सुविधा

राज्यभरात इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार होण्यासाठी राज्यामध्ये चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांचा भक्कम विकास करण्यात येईल. राज्य व राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येक २५ किमी अंतराने इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधांची उभारणी समाविष्ट असणार आहे. तांत्रिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून, राज्य व राष्ट्रीय महामार्गावरील सर्व सध्या अस्तित्वात असलेल्या व नवीन इंधन स्थानकांवर इलेक्ट्रिक वाहनांसाठी किमान एक चार्जिंग सुविधा असेल. तसेच राज्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची सर्व बस स्थानके, बस थांब्यांवर किमान एक जलद चार्जिंग स्थानक उभारण्यात येईल. महामार्गांवर इलेक्ट्रिक वाहनांना उच्च ऊर्जा चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांच्या सुरळीत कार्यान्वयनासाठी दिष्ट धारा (Direct Current) जलद चार्जिंग स्थानकांच्या स्थापनेसाठी संरचित ढाचाची राज्यात स्थापना करण्यात येईल.

## चार्जिंग सुविधांसाठी सवलती

चारचाकी इलेक्ट्रिक वाहने, इलेक्ट्रिक बसेस व ट्रकसाठी चार्जिंग केंद्रात किमान चार चार्जिंग पॉईंट असणे आवश्यक आहे. दिष्ट धारा (Direct Current) ५० ते २५० किलोवॅट ऊर्जा श्रेणीत असून प्रति स्थानक कमाल मर्यादा ५ लाख रुपये आहे. सवलत द्यावयाच्या सार्वजनिक, निम्न सार्वजनिक चार्जिंग स्थानकांची कमाल संख्या १००० आहे. तसेच बस व ट्रक चार्जिंग केंद्रात किमान दोन चार्जिंग पॉईंट आवश्यक असून दिष्ट धारा (Direct Current) असलेली उच्च ऊर्जा २५० ते ५०० किलोवॅट असणे आवश्यक आहे. यासाठी प्रति स्थानक कमाल मर्यादा १० लाख रुपये आहे. सवलत द्यावयाच्या सार्वजनिक, निम्न सार्वजनिक चार्जिंग स्थानकांची कमाल संख्या ५०० आहे. महामार्गावरील इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्थानके सहजगत्या ओळखू येण्यासाठी स्थानक चालकांनी उंच व दूरवरून सहजपणे दिसून येणाऱ्या सूचनाफलकांचा उपयोग करावा. चार्जिंग केंद्र परिचालकाने एकात्मिक ऊर्जा पद्धतीचे अनुपालन करण्यासाठी हे धोरण प्रोत्साहन देईल. इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांच्या स्थापनेसाठी सुकरपणे मान्यता देण्यासाठी राज्यामध्ये कालबद्ध एक खिडकी ऑनलाइन मान्यता प्रणाली स्थापित करण्यात येईल.

## चार्जिंग सुविधा

वाहनतळातील सर्व जागा या इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधांनी सुसज्ज असण्याच्या दृष्टीने सर्व नवीन रहिवासी इमारतींची संरचना व बांधकाम करण्यात येईल. सर्व नवीन व्यावसायिक इमारतीतील वाहनतळाच्या जागेपैकी किमान ५० टक्के जागा ही इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी योग्य असून, त्यामध्ये भविष्यात चार्जरची उभारणी करण्यासाठी वाहनतळी तारांची रचना करण्याची व्यवस्था असेल. सामाईक वाहनतळ असलेल्या सद्य व्यावसायिक इमारतीत २० टक्के जागेत चालू स्थितीतील चार्जिंग स्थानके अस्तित्वात असणे आवश्यक आहे. प्रत्येक नवीन निवासी इमारतीत इलेक्ट्रिक वाहनांच्या सामूहिक चार्जिंगसाठी समर्पित चार्जिंग पॉईंट असणे अनिवार्य असेल. गृहनिर्माण संस्थेच्या किमान ५० टक्के सभासदांच्या मान्यतेच्या अधीन राहून व सर्व सुरक्षितता प्रमाणकाचे अनुपालन करून इलेक्ट्रिक वाहनांच्या सामूहिक चार्जिंगसाठी जागा देण्यात यावी.

चार्जिंगविषयक पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आणि इलेक्ट्रिक वाहनांतून दीर्घ पल्ल्याच्या प्रवासाला पाठबळ देण्यासाठी महाराष्ट्रातील महत्त्वाच्या राष्ट्रीय व राज्य महामार्गांचे विद्युतीकरण करण्यात येणार आहे. तसेच महामार्ग नियोजनाचा अविभाज्य भाग म्हणून राज्यातील सर्व नवीन हरित महामार्गांवर इलेक्ट्रिक वाहनासाठी चार्जिंग सुविधा विकसित करण्याचे नियोजन आहे.

## संशोधन व विकसन

इलेक्ट्रिक वाहने, चार्जिंगविषयक पायाभूत सुविधा, हायड्रोजन तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने संशोधन व विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर येथे सर्वोत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्यात येतील. लिथियमवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सोडियम आयन बॅटरीसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा विकास करून ऊर्जा कार्यक्षमतेत सुधारणा करण्यात येईल. आयात कमी करून आणि पुरवठा साखळीची लवचिकता वाढवण्यासाठी पॉवर इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक वाहन पुरवठा उपकरणे यांचे स्वदेशीकरण, परिवहन क्षेत्रात निकार्बनीकरणाला पाठबळ देण्यासाठी बायोमासवर आधारित हरित हायड्रोजन निर्मिती करण्यास प्रोत्साहन देणे, इलेक्ट्रिक वाहन उत्पादन उद्योग कौशल्यपूर्ण विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळाने विशेष अभ्यासक्रमाची आखणी करून उद्योगाच्या गरजा आणि जागतिक स्तरावरील सर्वोत्तम पद्धतींचा विचार करून या अभ्यासक्रमात इलेक्ट्रिक वाहनांची संरचना, बॅटरी तंत्रज्ञान, चार्जिंगविषयक पायाभूत सुविधा, पॉवर इलेक्ट्रॉनिक आणि ऊर्जा व्यवस्थापनाचा समावेश करावा. इलेक्ट्रिक वाहनकेंद्रित कार्यक्रम स्वीकारणाऱ्या संस्थांना सवलती देण्यात येणार आहेत.

**शब्दांकन : निलेश तायडे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २ ऑक्टोबर २०२४ रोजी या योजनेचा शुभारंभ करण्यात आला असून योजनेच्या अंमलबजावणीसाठी २५ प्राधान्य क्षेत्रे व १७ मंत्रालये निश्चित करण्यात आली आहेत. या अभियानासाठी राज्यातील ३२ जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून यामध्ये २१४ तालुक्यांचा व चार हजार ९७५ गावांचा समावेश करण्यात आला आहे. योजनेसाठी २०२४–२५ ते २०२८–२९ या पाच वर्षांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात ७९,१५६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**

# ‘धरती आबा’ जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान

**शैलजा पाटील**

देशातील आदिवासी समाजाच्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारकडून महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. ‘धरती आबा’ जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या जीवनात शाश्वत विकास घडवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राज्यात प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत धरती आबा लोकसहभाग मोहिमेचा शुभारंभ पालघर जिल्ह्यातील मनोर येथे १६ जून २०२५ रोजी करण्यात आला. भगवान बिरसा मुंडा यांना ‘धरती आबा’ असे म्हटले जात असे. पारतंत्र्याच्या काळामध्ये इंग्रज राजवटीविरुद्ध भगवान बिरसा मुंडा यांनी बंड करून आदिवासी समाजाला न्याय मिळवून दिला असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या अभियानाचा केंद्रबिंदू म्हणजे ‘धरती आबा लोकसहभाग योजना’, ज्यामध्ये एकात्मिक विकासाचा दृष्टिकोन आहे. या योजनेत राज्यातील अहिल्यानगर, अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, बीड, भंडारा, बुलडाणा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, धाराशिव, पालघर, परभणी, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सोलापूर, ठाणे, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या ३२ जिल्ह्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यांतील गावपातळीवर आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, वीज, गॅस, पिण्याचे पाणी, रस्ते, पोषण, महिला कल्याण, रोजगार यांसारख्या २५ महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २ ऑक्टोबर २०२४ रोजी या योजनेचा शुभारंभ करण्यात आला असून योजनेच्या अंमलबजावणीसाठी २५ प्राधान्य क्षेत्रे व १७ मंत्रालये निश्चित करण्यात आली आहेत. या अभियानासाठी राज्यातील ३२ जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून, यामध्ये २१४ तालुक्यांचा व चार हजार ९७५ गावांचा समावेश करण्यात आला आहे. योजनेसाठी २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात ७९,१५६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या अभियानामार्फत केंद्र आणि राज्य शासनाच्या पातळीवर विविध उपक्रमांशी संबंधित यंत्रणांमध्ये संरचित दृष्टिकोन आणि खात्रीशीर अभिसरण (convergence) करणे अपेक्षित आहे. अभियानामध्ये समाविष्ट उपक्रमांच्या संदर्भात लक्षित गावांमधील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांबाबत १००% संपृक्तता आणणे हे अभियानाचे उद्दिष्ट आहे.

अभियानामध्ये किमान ५०० अनुसूचित जमाती लोकसंख्या असलेली गावे किंवा जेथे अनुसूचित जमातींची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या किमान ५०% आहे किंवा आकांक्षित जिल्ह्यांसाठी (Aspirational Districts) अनुसूचित जमातींची किमान ५० लोकसंख्या असलेली गावे समाविष्ट असणार आहेत. या अभियानांतर्गत आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी आश्रमशाळा, वसतिगृहे, शासन/राज्य आदिवासी निवासी शाळांमध्ये पायाभूत सुविधांची सुधारणा करणे, १०० आदिवासी बहुउद्देशीय विपणन केंद्रांसाठीची तरतूद करण्यात आली आहे. सिकलसेल आजार, कौशल्य केंद्रांची स्थापना, तसेच सिकलसेल आजारासाठी समुपदेशन व जनजागृती करण्यात येणार आहे. वन हक्क कायदा (FRA) व्यवस्थापनमध्ये दावा प्रक्रियेचे डिजिटायझेशन व साहाय्य, ‘धरती आबा’ वनहक्क कायदा कक्षांची स्थापना करण्यात येणार आहे. संभाव्य क्षेत्र नकाशे व सामुदायिक वन संसाधन (CFR)





व्यवस्थापन योजना तयार करणे व अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

## विभागनिहाय उपक्रम व योजना

ग्रामीण विकास मंत्रालय-प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेंतर्गत पक्की घरे, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत आदिवासी वस्त्या/वाड्या/पाड्यांना मुख्य रस्त्यासोबत जोडणारे पक्के रस्ते, जलशक्ती मंत्रालय-जलजीवन मिशन अंतर्गत अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना घरगुती पाणीपुरवठा, जलजीवन मिशन अंतर्गत आदिम जातींचा अधिवास असलेल्या गावांमध्ये सामाईक नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा, ऊर्जा मंत्रालय - अनुसूचित जमातीच्या कुटुंबीयांसाठी वीज जोडणी, गावातील सार्वजनिक संस्था, ग्रामपंचायत, शाळा इत्यादींसाठी वीज जोडणी, नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय सौर ऊर्जेद्वारे अनुसूचित जमातीच्या कुटुंबीयांसाठी वीज जोडणी, सौर ऊर्जेद्वारे गावातील सार्वजनिक संस्था ग्रामपंचायत, शाळांसाठी वीज जोडणी, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय-राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मोबाईल मेडिकल यूनिटद्वारे आरोग्य सेवा, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत आयुष्मान भारत कार्डच्या लाभांचे वितरण, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय-प्रधानमंत्री उज्वला योजनेंतर्गत एल.पी.जी. गॅस जोडणी, महिला आणि बालविकास मंत्रालय-पोषण अभियानांतर्गत नवीन अंगणवाड्यांची उभारणी, पोषण अभियान अंतर्गत जुन्या अंगणवाड्यांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे.

## शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग

समग्र शिक्षा अभियान अंतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची उभारणी, आयुष मंत्रालय - राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत EMRS शाळांमध्ये पोषण वाटिकांचा विकास, दूरसंचार विभाग, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय-अनुसूचित जमातींचा अधिवास असलेल्या ३० जिल्ह्यांमध्ये कौशल्य विकास केंद्रांची स्थापना, कौशल्य भारत अभियानांतर्गत अनुसूचित जमातींच्या युवकांना; तसेच वन धन विकास केंद्रांशी संलग्न लाभार्थ्यांना कौशल्य आधारित प्रशिक्षण, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय - जनजातीय डिजिटल उपक्रम BISAGN (गतीशक्ती) पोर्टल, आदिप्रसारण पोर्टल, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय - एफआरए पट्टा धारकांसाठी शाश्वत शेतीला प्रोत्साहन DOAFW च्या अनेक योजना, मत्स्यव्यवसाय मंत्रालय - प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत सीएफआरधारकांसाठी विविध योजनांचा समावेश आहे.



## पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय

एफआरए पट्टाधारकांसाठी राष्ट्रीय पशुधन अभियान पशुधन संगोपनाच्या योजना, पंचायत राज मंत्रालय-राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (RGSA) अंतर्गत राज्य, जिल्हा, उपविभाग व गाव पातळीवरील अधिकारी-कर्मचारी यांची एफआरए संदर्भातील क्षमता बांधणी करण्यात येणार आहे.

पर्यटन मंत्रालयाच्या स्वदेश दर्शन योजनेंतर्गत अनुसूचित जमातींच्या लाभार्थींसाठी आदिवासी होम स्टे योजना, स्वदेश दर्शन योजनेंतर्गत गाव पातळीवरील सामुदायिक उपक्रम यांचा समावेश असणार आहे.


जनजातीय कार्य मंत्रालयाच्या आदिवासी आश्रम स्कूल आणि वसतिगृह यांचे बळकटीकरण, सिकलसेल, ॲनेमिया निर्मूलन अभियान अंतर्गत सेंटर ऑफ कॉम्पिटन्सची स्थापना व रुग्णांना समुपदेशन; तसेच औषधोपचार, CFR & FRA केंद्रांची स्थापना आणि व्यवस्थापन, प्रचार प्रसिद्धी आणि प्रकल्प व्यवस्थापन, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आदिवासी जिल्ह्यांसाठी २० लाख रुपये वार्षिक प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

(विभागीय संपर्क अधिकारी)

# पंढरीच्या वाटेवर ओथंबला भक्तीरस!


छायाचित्र : सतीश काळे



छायाचित्र : सतीश काळे


छायाचित्र : सतीश काळे


छायाचित्र : सतीश काळे


छायाचित्र : चंद्रकांत खंडागळे


छायाचित्र : चंद्रकांत पालकर


छायाचित्र : यशवंत नेमाडे


छायाचित्र : चंद्रकांत खंडागळे


छायाचित्र : चंद्रकांत खंडागळे


छायाचित्र : चंद्रकांत खंडागळे

**आयएनएस गुलदार ही नौदलातील सेवानिवृत्त युद्धनौका पाण्याखालील संग्रहालय आणि कृत्रिम प्रवाळमध्ये रूपांतरित होणार आहे. भारतातील हा पहिलाच उपक्रम असल्याने सागरी संवर्धन व पर्यटनाला चालना मिळणार आहे. समुद्रात विराजमान होणाऱ्या जहाजाभोवती प्रवाळ निर्मिती होऊन त्याद्वारे स्कुबा डायव्हिंग व भविष्यात पाणबुडीद्वारे पर्यटकांना या प्रवाळ व समुद्रतळाशी विराजमान जहाजाची सफर करता येणे शक्य होईल.**

# सागरी पर्यटनाला चालना

**संध्या गरवारे-खंडारे**

जगातील अनेक देशात समुद्रातील जहाजात कृत्रिम प्रवाळ निर्माण करून स्कुबा डायव्हिंग आणि पाणबुडी पर्यटन प्रकल्प वाढविण्याचे प्रकल्प तयार झाले आहेत. त्याच धर्तीवर भारतीय नौदलाच्या निवृत्त जहाजाचे कृत्रिम प्रवाळ निर्माण करून सिंधुदुर्ग जिल्ह्यात जागतिक दर्जाचे स्कुबा डायव्हिंग आणि पाण्याखालील संग्रहालय निर्माण करण्यात येणार आहे. हा प्रकल्प तयार करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या मान्यतेने भारतीय नौदलाने निवृत्त युद्धनौका महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास (MTDC) विना मोबदला उपलब्ध करून दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यटनमंत्री शंभूराज देसाई, मत्स्यव्यवसाय विकास मंत्री नितेश राणे यांच्या प्रयत्नातून हा प्रकल्प राज्यात साकारला जात आहे.

## वेंगुर्ल्यात साकारणार प्रकल्प

आयएनएस गुलदार ही नौदलातून सेवानिवृत्त झालेली युद्धनौका पाण्याखालील संग्रहालय आणि कृत्रिम प्रवाळमध्ये रूपांतरित होणार आहे. भारतातील हा पहिलाच उपक्रम असून यामुळे सागरी संवर्धन व पर्यटनाला चालना मिळणार आहे. समुद्रात विराजमान होणाऱ्या जहाजाभोवती प्रवाळ निर्मिती होऊन त्याद्वारे स्कुबा डायव्हिंग व भविष्यात पाणबुडीद्वारे पर्यटकांना या प्रवाळ व समुद्रतळाशी विराजमान जहाजाची सफर करता येणे शक्य होईल. केंद्र सरकारने ऐतिहासिक पाऊल उचलत भारतीय नौदलाचे निवृत्त जहाज आयएनएस गुलदार हे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) कडे सुपुर्द केले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील निवती रॉकजवळ समुद्रात पाण्याखालील या प्रकल्पाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते; उपमुख्यमंत्री एकनाथ



शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, मत्स्यव्यवसाय विकास मंत्री नितेश राणे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मंत्रिमंडळ सदस्य यांच्या उपस्थितीत या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

## सेवानिवृत्त जहाजाचे स्वरूप

आयएनएस गुलदार या जहाजाचे ११२० टन वजन असून ८३.९ मीटर लांबी, ९.७ मीटर रुंदी व ५.२ मीटर इतकी खोली आहे. हे जहाज १२ जानेवारी २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले आहे. भारत सरकारच्या वैशिष्ट्यपूर्ण पर्यटन स्थळांचा विकास करणे या योजनेंतर्गत स्पेशल असिस्टंट्स टू स्टेटस् फॉर कॅपिटल इन्व्हेस्टमेंट (पार्ट-३) (Special Assistance to States for Capital investment (Part-3) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा आयएनएस गुलदार सेवानिवृत्त युद्धनौका निवती रॉकजवळ समुद्रात संग्रहालय आणि कृत्रिम रीफमध्ये रूपांतरित करणे या प्रकल्पास केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने २७ डिसेंबर २०२४ रोजी ४६.९१ कोटी रुपयांस मान्यता दिली आहे. भारतीय नौदलाने हे निवृत्त जहाज पोर्टब्लेअर, अंदमान येथून कारवार नेव्हल बेस, कर्नाटक याठिकाणी स्वखर्चाने पोहोचवण्याची महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची विनंती मान्य केली. ज्यामुळे राज्य शासनाची आर्थिक बचत झाली आहे.

## प्रकल्पाचे टप्पे

भारतीय नौदलाकडून बोटीचा अधिकृतरीत्या २२ फेब्रुवारी २०२४ रोजी कारवार नेवल बेस येथे ताबा घेण्यात आला. कारवार येथून विजयदुर्ग जिल्हा सिंधुदुर्ग येथे जहाज घेऊन (Tow) १६ मार्च २०२५ रोजी यशस्वीरीत्या कारवार येथून विजयदुर्ग येथील महाराष्ट्र सागरी मंडळाच्या जेट्टीवर सुरक्षितरीत्या आणण्यात आले.

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या (MMB) विजयदुर्ग येथील जेट्टीला विना मोबदला साधारणपणे सहा ते सात महिने हे जहाज सुरक्षितरीत्या ठेवण्याकरिता परवानगी देण्यात आली आहे. जहाजाची पर्यावरणीय साफसफाई करण्यासाठी नियुक्त केलेल्या संस्थेने हे जहाज १५ एप्रिल २०२५ रोजी पूर्णपणे पर्यावरणीयदृष्ट्या स्वच्छ करण्यात आले आहे. Ex-INS Guldar सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्राच्या तळाशी निवती रॉक येथे विराजमान करण्याकरिता (Scuttling) माजगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड यांना १६ एप्रिल २०२५ रोजी कार्यादेश देण्यात आला असून, वातावरण अनुकूल असेल त्या दिवशी प्रत्यक्षपणे ही कार्यवाही पार पाडली जाईल. समुद्रात विराजमान होणाऱ्या जहाजाभोवती प्रवाळ निर्मिती होऊन त्याद्वारे स्कुबा डायव्हिंग व भविष्यात पाणबुडीद्वारे पर्यटकांना या प्रवाळ व समुद्रतळाशी विराजमान जहाजाची सफर करण्याचे नियोजित आहे.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

# चला घडवू विकसित महाराष्ट्र!

## विकसित महाराष्ट्र २०४७ : महाराष्ट्राचे व्हिजन डॉक्युमेंट

विकसित महाराष्ट्र सर्वेक्षणात सहभागी होण्यासाठी दिलेल्या लिंक वर क्लिक करा अथवा स्कॅन करा




**विकसित महाराष्ट्राची रूपरेषा ठरविण्यास द्या आपला सहभाग**

**नागरिक सर्वेक्षण**
कालावधी
१८ जून ते १७ जुलै, २०२५



| देवेंद्र फडणवीस | एकनाथ शिंदे | अजित पवार | ॲड. आशिष जयस्वाल |
|---|---|---|---|
| मुख्यमंत्री | उपमुख्यमंत्री | उपमुख्यमंत्री | राज्यमंत्री, वित्त व नियोजन विभाग |

नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन


R.N.I.No. 14140

महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.

### अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**केशव करंदीकर**
उपसंचालक (प्रकाशने),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

प्रति / TO

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक केशव करंदीकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा. लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन. एम. जोशी मार्ग, मुंबई - ४०० ०११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह